म. ग्रं. सं. वाच

विषय नाटक

द. क्र. २०४०५

IRBK-0120405

२०४०४

15 APR 1999

[illegible] JUL 2000

30 FEB 2001

24 [illegible] 2001

4 MAR 2002

[illegible] SEP 200[illegible]

8 JUL 2003

# प्रेमाच्या गावा जावे

वसंत कानेटकर

वसंत
प्रेमाच्या गावा जावे

परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई चार

IRBK-0120405

**प्रेमाच्या गावा जावे**

आवृत्ती पहिली : डिसेंबर १९८३ / प्रकाशन क्रमांक : ५१६
सरकारी प्रमाणपत्र : डी. आर. एम्. ११७४ / १९८३

प्रकाशक : सौ. शुभदा विष्णू परचुरे / परचुरे प्रकाशन मंदिर / २०३/४ मेहता भवन / ३११, राजा राममोहन रॉय मार्ग / गिरगाव मुंबई ४०० ००४

मुद्रक : शशिकान्त महादेव देव / सुलभ मुद्रणालय
२९१ / शनिवार पेठ पुणे ४०० ०३०

मुखपृष्ठ सजावट / मोहन वाघ

मूल्य वीस रुपये

© 'प्रेमाच्या गावा जावे' या नाटकाच्या प्रयोगाचे, रूपान्तराचे, भाषान्तराचे, चित्रपटाचे, इ. सर्व हक्क सौ. उषा वसंत कानेटकर यांचे स्वाधीन आहेत.

आगाऊ परवानगी घेतल्याशिवाय या नाटकाचा कोणीही प्रयोग करू नये. तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी परवानगी आणि परवानगीमूल्य या संदर्भात सौ. उषा वसंत कानेटकर, शिवाई, शरणपूर रोड, नाशिक ४२२ ००२ या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा / दूरध्वनी क्रमांक ७३०९२

# प्रेमाच्या गावा जावे

वसन्त कानेटकर

'प्रेमा तुझा रंग कसा ?' नंतर जवळ जवळ वीस बावीस वर्षांनी पुन्हा एकदा पांढरपेशा मध्यमवर्गीय घरात घडणाऱ्या कौटुंबिक प्रसन्न खेळकर कॉमेडीला हात घालतो आहे. मला भेटलेल्या त्या खमंग, हसऱ्या आणि चिरतरुण वृद्धाचे रंगतदार चित्र उभे करीत असतानाच 'जनरेशन गॅप'चेही मजेदार चित्रण करण्याचा मी प्रयत्न केला आहे. तीन पिढ्या या नाटकात उभ्या करताना कोणालाही कसलाही उपदेश करण्याचा माझा हेतू तिळमात्रही नाही. पण त्रिविध मनोवृत्ती आणि ढासळणारी मूल्ये यांचा सामाजिक संदर्भात एक मजेदार आलेख काढण्याचा मी जरूर प्रयत्न केला आहे.

या माझ्या प्रयत्नात दिग्दर्शक आणि प्रमुख भूमिका करणारे श्री. अरविंद देशपांडे, तसेच निर्माते मोहन वाघ, ख्यातनाम क्रिकेटपटू श्री. बापू नाडकर्णी, नाटकातले इतर कलावंत आणि कार्यकर्ते यांनी बहुमोल मदत केली आहे. चंद्रलेखाच्या परिवारातील श्री. आणि सौ. शिरीष गुप्ते, श्री. आणि सौ. जयवंत, श्री. आणि सौ. लिमये, प्रकाश पटवर्धन, मनोहर कदम आणि हनुमान शिंदे या मित्रांनीही खूप मोलाच्या सूचना केल्या आहेत. माझे परमस्नेही श्री. आप्पासाहेब परचुरे यांच्या प्रचंड उत्साहामुळेच हे नाटक इतक्या देखण्या रूपात अवतरत आहे. या सर्व मित्रांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे.

वसन्त कानेटकर


'प्रेमाच्या गावा जावे' या नाटकाचा पहिला प्रयोग, चंद्रलेखा, मुंबई, या संस्थेने दि. २२ डिसेंबर १९८३ या दिवशी दुपारी चार वाजता दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह, विलेपारले, येथे सादर केला.

पहिल्या प्रयोगात भाग घेणारे कलावंत आणि कार्यकर्ते–

| | | |
|---|---|---|
| दिग्दर्शन | : | श्री. अरविंद देशपांडे |
| निर्माता, नेपथ्य, प्रकाश | : | श्री. मोहन वाघ |
| पार्श्वसंगीत | : | अनंत अमेंबल |
| रंगभूषा | : | कृष्णा बोरकर |
| निर्मिती साहाय्यक | : | हनुमान शिंदे |
| व्यवस्थापक | : | मनोहर कदम |
| प्रकाशयोजना आणि ध्वनिसाहाय्यक | : | सुरेश, मधू, पांडू घाडी |

**पात्रपरिचय**

| | | |
|---|---|---|
| बिंदुमाधवराव | : | अरविंद देशपांडे |
| चिंतामणराव | : | जगन्नाथ कांदळगावकर |
| टिट्टू | : | महेश चौधरी |
| गोट्या | : | संजय भालेकर |
| शिवाजी | : | सुधीर देशमुख |
| प्रेमानंदस्वामी | : | उपेंद्र दाते |
| तुकाराम | : | वसंत विचारे |
| नानू | : | ललित जाधव |
| कमळजा | : | रेखा कामत |
| सुमंगल | : | उषा लिमये |
| गौरी | : | निवेदिता जोशी |
| प्रिया | : | वंदना गुप्ते |



अंक पहिला

# अंक पहिला

क्र. २०४०५ दि. ७.१२।८।८४
वि. ५।१।८५

# अंक पहिला

[ मुंबई. पेडर रोडवरील 'अलीबाबा टॉवर्स' नावाची आभाळात घुसलेली एक उंच अलिशान इमारत. या इमारतीच्या तळमजल्यावर 'जनता बँक ऑफ इंडिया'चे ब्रँच ऑफिस थाटले आहे. अर्थात ही इमारत बँकेच्याच मालकीची आहे. तेराव्या मजल्यावरील एक भला मोठा फ्लॅट. इथे राहतात चिंतामण बिंदुमाधव सरनोबत, एम. ए., एम. कॉम., मॅनेजर– जनता बँक ऑफ इंडिया, ब्रँच पेडर रोड. अर्थातच हा फर्निश्ड फ्लॅट बँकेचे मॅनेजर म्हणून. सेवानिवृत्तीच्या काळापर्यंत अथवा बदली होईपर्यंत सरनोबत साहेबांना मिळाला आहे. फ्लॅटमधला ड्रॉइंग हॉल उत्तम रीतीने सजवलेला. अर्थात याचे श्रेय सुमंगलादेवींना.

पडदा वर जातो आणि रंगमंच उजळतो त्या वेळी दुपारचे बारा वाजले आहेत. हॉलमध्ये कोणीही नाही. मात्र पाच बेडरूम्स असलेल्या या फ्लॅटमध्ये कोठे तरी दूरच्या खोलीत बऱ्याच मंडळींचा जल्लोष चाललाय. टी. व्ही.वर रंगात आलेली क्रिकेट मॅच बघताना चालतो तसा. अशातच बाहेर दारावर डिंग डाँग बेल वाजते. पुन्हा पुन्हा थांबून वाजत राहते. पण आत रंगलेल्या मंडळींना जाग कशी येणार? त्यांची धमाल चालूच आहे. तरी पण काही वेळाने त्यांच्यातच बसलेल्या सुमंगलादेवींना घंटा ऐकू येते. तशी त्या ओरडतात— "गोट्या ऽ... ए गोट्या.... राजा बघ रे जरा बाहेर जाऊन कोण मेला भलत्या वेळी उगवलाय तो...." त्यावर गोट्या किंचाळतो. "हाई...फोर... ब्रॅहो दादा ब्रॅहो ऽ...." पुन्हा गलका. "ए जॉनी, बाहेर जाऊन बघ की जरा कोण फटूश आलाय तो. आपल्या कंपनीतला नसला तर परस्पर कटव साल्याला..." तोच पुन्हा गलका. "अरे गुड बॉल! हा,मोरू जाणार बरं का हात हालवीत...." "शुभ बोल नान्या, शुभ बोल..." "ए नानू, बाहेर जाऊन तू बघ की जरा कोण उलथलाय तो...." "एवढी ओव्हर संपू दे रे. तोवर बोंबलू दे लेकाला." त्यावर पुन्हा गलका. सुमंगलादेवी पुन्हा ओरडतात— "गोट्या ऽऽ अरे बाहेर जाऊन कोणी दार उघडणार आहे की नाही?"

त्यावर गोट्या म्हणतो— "ममी, मी सांगतो तो व्यंक्या नाही तर पक्या असेल. करू दे ठणाणा." "पुन्हा फोऽर." गलका; टाळ्या. "काय फटका मारलाय रे... सॉलीड रे!" बाहेर आता घंटेऐवजी कीडे

वाजण्याचा खडखडाट ऐकू येतो. तशी सुमंगलादेवी— " गोट्याऽ आता उठतोस की टी. व्ही. बंद करून टाकू ? "

त्यावर गोट्या खेकसतो— " नानू ! आता तू उठला नाहीस तर– साल्या "— " उठतो–उठतो–उठतो "— असे वैतागाने म्हणत नानू नावाचा कोणी एक पोरगेलासा तरुण गडबडीने बडबडत बाहेर येतो. " आयला, कोणाचं मढं सरणावरून उठून आलंय—" आणि दार उघडत खेकसतो— " कोण हो मिस्टर तुम्ही ? आणि काय हा ठणठणाट चालवलाय ? ही काय सिस्टिम झाली ? घटकाभर थांबलात तर काय—"

दार उघडून बाहेर उभ्या असलेल्या गृहस्थांना बघताच नानूचा स्वर मवाळतो आणि चक्रावून तो बघतच राहतो. कारण बाहेरून आत येतात चिंतामणराव सरनोबत. पन्नाशीचे. अत्यंत गंभीर आणि दगडी मुद्रेचे. पोशाख एकदम साहेबी थाटाचा. त्यांच्या मागे तुकाराम, बँकेचा पट्टेवाला, फायलींचा गठ्ठा घेऊन उभा आहे. चिंतामणराव नानूच्या खांद्यावर हात ठेवीत थंड शुष्क स्वरात म्हणतात – ]

**चिंतामणी :** यंग मॅन, मी या घराचा मालक. चिंतामणी बिंदुमाधव सरनोबत, एम.ए., एम.कॉम., मॅनेजर– जनता बँक ऑफ इंडिया, ब्रँच पेडर रोड, बॉम्बे सिक्स, या घरात या वेळी मी येण्याबद्दल आपली काही हरकत ?

**नानू :** (भेदरून पार कोकरू होत) हॅ.... हॅ... भलतंच काय ?....

**चिंतामणी :** ठीक. आता आपली ओळख ?

**नानू :** ( गोंधळून बोबडी वळत ) हॅ... हॅ.... आपलं कुठं काय ?.... काही नाही.... ( भेदरलेलं हसत ) क.... क... काहीसुद्धा नाही... म...म... मॅच बघतीय.... आमची कंपनी.... शहाण्णव धावा काढल्यात... ट...ट.... टी टी टिट्वेंनं....सेंचरी.... सेंचरी होणार बहुतेक...प... प....पण सांगतो तुम्ही आलायत ते. [ म्हणून आत पळायला लागतो, तोच चिंतामणराव त्याची मानगूट पकडून मागं खेचतात, आणि–]

**चिंतामणी :** ( सौम्य स्वरात पण जरबेनं ) दॅटस् नॉट द पॉइंट, यंग मॅन. मी माझी ओळख सांगितली तशी तुमची ओळख ? नाव, गाव, धंदा ?

**नानू :** म... म.... म... मी नानू... नानू... आपला नानू....

**चिंतामणी :** नानू... ? आपला नानू... म्हणजे ? नानू म्हणजे नाना का ? सबंध नाव काय तुमचं ?

**नानू :** तसा म्हणजे.... म... म.... मी... स.... सदा येवलेकर.

**चिंतामणी :** मघा नानू म्हणालात. आता सदा म्हणताय. नक्की कोण ? सदा म्हणजे सदानंद की सदाशिव ? आणि मधलं वडिलांचं नाव का गाळलंत ? लाज वाटते ?

**नानू :** छे छे. भलतंच काऽय ? प.... पण तशी ही नाहीये... म्हणजे सिस्टिम नाहीये आता. सगळे अशीच नावं लावतात....

**चिंतामणी :** तुमची ही सिस्टिम अत्यंत असभ्य आणि अर्वाच्य आहे. तरी पण तुम्ही मित्र कोणाचे ? विनायकाचे की गजाननाचे ?

**नानू :** ( बावचळून ) विनायक की गजानन ?—

**चिंतामणी :** ऊर्फ टिट्याचे की गोट्याचे ?

**नानू :** हां हां... हे बरोबर. गोट्याचे... आम्ही क्लासमेट आहोत.

**चिंतामणी :** म्हणजे वर्गमित्र. ठीक. म्हणजे दहावीचे परीक्षार्थी. असं, आज मंगळवार. शाळेला सुट्टी नाही. मग या वेळी तुम्ही इथं कसे ?

**नानू :** ( भेदरून ) क... क... कसे म्हणजे.... म्हणजे....

**चिंतामणी :** म्हणजे स्वच्छ सांगा की शाळेला दांडी मारून टी. व्ही.वर मॅच बघायला इथं आलात. गोट्याच्या निमंत्रणावरून; खरंय की नाही ?

**नानू :** खरंय.... पण शाळेत कोण्णी नाहीये. गणपुले सर देखील रजेचा अर्ज टाकून मॅच बघायला पळालेत. आणि हेडमास्तर तर ऑफिसातच शाळेचा टी. व्ही. लावून—

[ तोच आतून गोट्या ओरडत येतो. गोट्या सोळा वर्षांचा हीरो-छाप केश-वेश-भूषेतला पोरगा. " आयला, नानू. तुझी तर कमालच आहे यार. भोसडीच्या, त्या साल्याला ढुंगणावर लाथ मारून जिन्यातून सरळ खाली सोडायचास तेऽऽ ...प... प.... प... प.... पपाऽऽऽ तुम्हीऽऽऽ सॉरी सॉरी... ]

**चिंतामणी :** ( शान्तपणं पाठ फिरवून ) हूंऽऽ. हाणा लाथ, आणि द्या बापाला ढकलून जिन्याखाली. थांबलात का ? हाणा की लाथ. पुढं तेच करणार आहात; ते आजच करा....

**गोट्या :** ( घाबरून ) चुकलो पपा, माफी करा...

**चिंतामणी :** येवलेकर. यांच्या ममीला आणि सगळया टी. व्ही. दोस्तांना बोलवा बाहेर. त्यांना सांगा की हे दिव्यलक्षणी चिरंजीव आपल्या जन्मदात्याच्या पार्श्वभागी लाथ हाणून त्यांना घराबाहेर—

**गोट्या :** ( पाय धरीत रडव्या स्वरात ) चुकलो, चुकलो पपा. मी पाय धरतो तुमचे.... ( येवलेकर उघड्या दारातून पळून जातो. )

**चिंतामणी :** छः छेऽऽ आपण तरुण तुर्क. आपण कसे चुकाल ? चुकलेत ते सगळे आमच्यासारखे म्हातारे मूर्ख. काऽय ?

**गोट्या :** नाही हो पपाऽ ( उठत ) बाहेर तुम्ही या वेळी याल असं स्वप्नात-सुद्धा वाटलं नाही मला. कोणी तरी आमच्याच कंपनीतला दोस्त,—

**चिंतामणी :** म्हणून काय ' साल्या ' आणि ' भोसडीच्या ' ! ढुंगणावर लाथ ! कोणत्या घरातली संस्कृती ही ?

**गोट्या** : ते आपलं ऽ ऽ म्हणजे ऽ लाइट लाइटली.... विनोदानं....

**चिंतामणी** : कुठून पैदा केलीत ही विनोदबुद्धी ? वडील बंधूंच्याकडून ?

**गोट्या** : ( अजीजीनं ) पपा, मी चुकलो म्हणून माफी मागितलीय तुमची.

**चिंतामणी** : छे छे छे ऽ ऽ चूक आमची आहे बाळराजे. आम्ही तुमच्यासारख्या एका हीरोला जन्म दिला. तुम्ही मागितला नसताना. काऽय ?.... यू नेव्हर आस्क्ड टु बी बॉर्न....

**गोट्या** : पपा, पपा, मी असं कसं म्हणेन ? मी फक्त—

**चिंतामणी** : खोटं बोलू नका. मी या कानानं ऐकलंय मिस्टर—दिलीपकुमार, मनोजकुमार की किशोरकुमार ! आपण अर्ज केला होतात राजकपूरच्या घरात जन्म मिळवण्यासाठी; पण देवानं हे तुमचं पार्सल धाडलं सरनोबतांच्या पत्त्यावर. चूक कोणाची ? आमचीच. तुम्हाला हीरो बनायला स्टूडियोत जायचंय; पण आम्ही तुम्हाला शाळेत दामटतोय अभ्यासासाठी. चूक कोणाची ? अर्थात आमचीच.

**गोट्या** : नाही पपा... म... म.... मीच चुकलो. ( रडवेला होत ) चुकलो म्हटलं कीऽ ऽ ! आज दादाची टेस्ट मॅच होती म्हणून, ममीला विचारून एक दिवस घरी राहिलो. विचारा वाटलं तर— ( तळव्यानं तोंड झाकून हुंदका देतो तशी— )

**चिंतामणी** : चूप ! वर तोंड करून बोलू नकोस. माप पदरात घातलं की 'चुकलो' म्हणायचं, नाटकीपणानं रडायचं— भेकायचं, ममीच्या पाठीशी दडायचं, पण माझी पाठ वळली की गौरीला नाही तर टिटूला विचारायचं— ' थेरडा आहे कीऽ खपलाऽ ऽ ? ' अं ऽ .... काऽऽय ?

**गोट्या** : ( रडत ) नाही हो पपा.... असं कसं म्हणेन मी ? तुम्ही हवे आहात आम्हाला....

**चिंतामणी** : तुम्हाला बाप नकोय.... बापाच्या जिवावर चंगळ करायला तेवढी हवीय. तुझ्या ममीला बोलाव बाहेर—

[ हे ऐकताच सुमंगलादेवी प्रवेशतात. पंचेचाळीस वर्षांच्या. पण खूपच तरुण आणि देखण्या दिसतात. बोलणं चालणं ठसकेबाज. ]

**सुमंगल** : किती आरडाओरडा करायचा ? किती टोचून खोचून मुलांना बोलायचं ? त्याचे मित्र बिचारे घाबरून पळाले मागल्या दारानं.

**चिंतामणी** : पळू देत. पळवूनच लावायला हवेत. आपले हे चिरंजीव काय काय बडबडत होते आत्ता ते ऐकायला हवं होतंस तू.

**सुमंगल** : ऐकलं. नानूनं सांगितलं मला सगळं. पण चुकलो म्हणाला ना गोट्या ? पाय धरून माफी मागितली ना त्यानं तुमची ?

**चिंतामणी** : अरे वा ! चुकलो म्हणाला आणि पाय धरून माफी मागितली—

म्हणजे संपलं का सगळं ? -

**सुमंगल :** मग आणिक काय करायला हवं ? वाटल्यास पोराला उचला आणि तेराव्या मजल्यावरून खाली चौकात द्या भिरकावून. बघा तेवढ्यानं तरी—

**चिंतामणी :** त्याला कशाला ? तुमचा टी. व्ही. सेटच खाली चौकात भिरकावून द्यायचं ठरवलंय मी. घराची शिस्त बिघडली. शाळा-कॉलेजांची शिस्त बिघडली. बँकांची— ऑफिसांची शिस्त बिघडली. उभा देश बेशिस्त करून टाकलाय तुमच्या टी. व्ही.नं.

**गोट्या :** ( हळूच ) स्कोअर किती झाला ग ममी ?

**चिंतामणी :** बघ बघ, काही लाज आहे का त्याला ? मी इतका संतापलोय आणि हा निर्लज्जपणानं स्कोअर विचारतोय तुला !

**सुमंगल :** तुमची तरी कमालच आहे. अहो उभं जग टिटूच्या सेंचरीकडं डोळे लावून बसलं होतं. त्यांची केवढी निराशा झाली—

**गोट्या :** निराशा ? ममी, म्हणजे दादा औट झाला ?

**सुमंगल :** मग सांगतेय काय मेल्या ! अठ्याण्णवं रन्सवर औट झाला की आपला टिटू....

[ इतका वेळ फायलींचा गठ्ठा घेऊन दाराबाहेर तिष्ठत उभा असलेला—तुकाराम चटकन् आत येत गठ्ठा टीपॉयवर टाकीत—]

**तुकाराम :** पुन्हा एल. बी. डब्ल्यू. का बाई ?

**सुमंगल :** होय रे. पुन्हा एल. बी. डब्ल्यू. चक्क खोटा औट दिला !

**गोट्या :** मॅन ऑफ द मॅचचा चान्स गेला दादाचा. आता आपल्या टीमचंही काही खरं दिसत नाही. बघायलाच हवं. ( धावत बाहेर जातो. )

**चिंतामणी :** गोट्याऽऽ... अरे... गेलाच. काय म्हणावं या मुलाला ?

**सुमंगल :** इतका संताप झालाय माझा की असं जावं आणि त्या अंपायरला लाटण्यानं चांगलंऽ बदड बदड बदडावं !

**तुकाराम :** बाई, तो बुटका न् टकल्या अंपायर होता का ?

**सुमंगल :** होय रे, तोच.

**तुकाराम :** मग झालंच की, तो पहिल्यापासून तिरपाकडाच.

**चिंतामणी :** हा हाऽ तुकाराममहाराज, तुम्ही ऑन ड्यूटी आहात. (कोट काढून देत) हा वॉर्डरोबमध्ये हँगरला लाव. थांब, पळू नकोस; हा टाय घेऊन जा. [ तुकाराम टाय कोट घेऊन जातो ]. उगाच अंपायरच्या नावानं ठणाणा करण्यात काय अर्थ ? याच गाढवाची चुकी असली पाहिजे.

**सुमंगल :** (रागानं) तुम्हाला काय ठाऊक आहे हो ? मॅच पाहिलीत तरी तुम्ही ?

**चिंतामणी :** (बसून फायलींचं टीपॉय पुढं ओढत) मॅच कशाला बघायला हवी ?

कोणतंही काम शिस्तीनं, एकाग्रतापूर्वक, समर्पितपणं आणि कौशल्यानं करायचं याला कधी ठाऊक आहे का? बँकेत बघतोच आहे ना मी रोज?

**सुमंगल :** (तडकून) काय, काय बघताय हो?

**चिंतामणी :** सांगतो. ऐक, याच्याकडं डेली अकौंट्न्स तपासायला पाठवले तर तिथं सगळा बाजा. बेदुणे किती हे कळायला हा कॅल्क्युलेटर वापरतो. ड्रॅफ्टिंग-साठी पत्रं पाठवली याच्याकडं तर त्यात शेकडो इंग्लिशच्या चुका. स्टेनो याला संभाळून घेते आणिक—

**तुकाराम :** (आतून प्रवेशत) तीनच्या पुढं साहेब असतात कधी बँकेत? ते नेट प्रॅक्टिसला सरळ निघून जातात.

**सुमंगल :** त्याची जिम्मेदारी तुझ्यावर काय आली रे तुकाराम?

**तुकाराम :** नाही— आपलं सांगितलं एक बाई.

**सुमंगल :** चोंबडा मेला!

**तुकाराम :** (बाहेर जाऊ लागत) बाहेर बसायला स्टूल नाहीये मला साहेब.

**चिंतामणी :** ती खुर्ची घेऊन जा आणि बोलावल्याशिवाय आत येऊ नकोस पुन्हा. [ तुकाराम खुर्ची घेऊन जातो. सुमंगल दार फाट्कन् लावून घेते. ] त्याला चोंबडा म्हणण्यात काय अर्थ आहे? तो म्हणाला ते अक्षरशः खरं आहे. याच्या बेशिस्त वागण्यामुळं बँकेत मला कोणालाही शिस्त लावता येत नाही.

**सुमंगल :** मग काढून टाका की त्याला. नेमून घेतलात कशाला?

**चिंतामणी :** नेमून घ्यायला माझा विरोधच होता. पण—

**सुमंगल :** चेअरमन पोचखानवालांनी टिटूला नेमून घेतला. अगदी बोलावणं पाठवून तुमच्या हाताखाली ट्रेनी ऑफिसर म्हणून तुमच्या नाकावर टिच्चून ठेवला त्याला. फक्त क्रिकेटसाठी.

**चिंतामणी :** ही घोडचूक बँकेला फार भोवणार आहे.

**सुमंगल :** असं का?

**चिंतामणी :** तर काय? बँक म्हणजे काय क्रिकेटवाले आणि नाटकवाले पोसायचा पांजरपोळ आहे? बघावं तो सगळे क्रिकेटवीर आणि नटसम्राट सतत रजेवर आणि दौऱ्यावर. अरे काय आहे काय हे? बँका चालायच्या कशा?

**सुमंगल :** हे मला कशाला ऐकवता? तुमच्या बड्या साहेबांना जाऊन सुनवा की!

**चिंतामणी :** हो हो, सुनवीन. एकदा ठणकावून सांगणारच आहे मी पोचखानवाला साहेबांना. हा असला क्रिकेटशिरोमणी मला माझ्या ब्रँचवर नको. एक त्याची तरी बदली करा नाही तर—

**सुमंगल :** उगीच भलतं सलतं बोलून बसू नका. टिटू क्रिकेटियर आहे म्हणून इथंच राहील; तुमची मात्र ठाण्याला नाही तर भिवंडीला बदली होऊन बसेल.

**चिंतामणी** : बास बास, पुरे. ऑफिसच्या कामात बायकापोरांचा सल्ला घेणारा माणूस मी नाही. माझं ब्लडप्रेशर वाढवू नकोस. हा टिल्या मला मेला आणि मी त्याला मेलो!

**सुमंगल** : बघा बाई. आपणच हवं ते बोलायचं आणि—

**चिंतामणी** : ( फाइल उघडीत ) दोन कप चहा पाठव.

**सुमंगल** : पाठवते. ( जाऊ लागते; दाराशी थबकून, वळून ) बाबा, आई आल्यावरच तुम्ही जेवावला बसणार ना?

**चिंतामणी** : मॅच सोडून बाबा आई जेवायला परत येणार आहेत?

**सुमंगल** : लंच टाइम झाली की येतो म्हणालेत. प्रिया आहे बरोबर, तेव्हा नक्कीच येतील.

**चिंतामणी** : प्रिया? कोण प्रिया?

**सुमंगल** : इश्य असं काय करता हो? प्रिया नाडकर्णी, काही वर्षांपूर्वी तुमच्या बँकेत क्लार्क होती. आता प्रोफेसर आहे. टिटूची मैत्रीण होती. आपल्या घरी दोनतीनदा जेवायलासुद्धा आली होती.

**चिंतामणी** : हां हां ती ती... प्रियदर्शिनी नाडकर्णी. आलं लक्षात. नुसतं टिटूची मैत्रीण, बँकेतली क्लार्क आणि दोनतीन वेळा जेवायला घरी आली होती, यावरून मला काय बोध होणार, याला ढीगभर मैत्रिणी. अग, मॅचमध्ये ज्या वेगानं हा धावा काढतो त्याच्या दुप्पट वेगानं याच्या मैत्रिणींची संख्या वाढते. याची एक सिक्सर म्हणजे रन्स सहा, पण मैत्रिणी बारा!

**सुमंगल** : काही तरीच काय हो!

**चिंतामणी** : काही तरीच नाही. याचे सगळे फोन्स मीच घेतो ना बँकेत. त्या-वरून काढलेलं स्टॅटिस्टिक आहे हे. पण एके काळी टिटूचं आणि या प्रियदर्शिनीचं जे विशेष मेतकूट जमलं होतं ते आता कोरडं झालेलं दिसतंय.

**सुमंगल** : माझ्याही लक्षात आलंय ते. पण कशामुळं त्यांचं बिनसलं असेल हो?

**चिंतामणी** : ते तू त्याला जाऊन विचार की.

**सुमंगल** : विचारलं एकदा, तेव्हा म्हणाला—"जमलं होतं कधी म्हणून बिनसलं केव्हा ते विचारतेस?

**चिंतामणी** : ध्याऽऽ! पक्का बनेल आणि भामटा आहे हा पोरटा.

**सुमंगल** : मला एक सांगा, हा मुलगा सध्या दुसऱ्या कोणा मुलीशी सूत जुळवतोय का? तुम्हाला काही तरी सुगावा असलाच पाहिजे.

**चिंतामणी** : प्रश्न चुकला तुझा, सुमंगल. तू असं विचार, की सध्या टिटू कोणाकोणाशी 'सुतं' जुळवतोय?

**सुमंगल** : ( थक्क होत ) सुतंऽऽऽ? अगबाई! कोणाकोणाशी?

**चिंतामणी** : ती यादी अंमळ लांबलचक असून त्यात देशविदेशच्या युवतींचा

समावेश आहे. थोडक्यात, जिथे जिथे क्रिकेटच्या मॅचेस होतात तिथे तिथे आपल्या थोर चिरंजीवांची सूतकताई चालली आहेच.

**सुमंगल :** नसेल हो. त्या मैत्रिणी असतील टिट्र्च्या.

**चिंतामणी :** त्याचंही म्हणणं तेच आहे, की या सगळ्या त्याच्या मैत्रिणीच आहेत. फक्त अलीकडे मैत्रीची मर्यादा अंमळ लांबरुंद आणि ऐसपैस झालीय. तुला मला न मानवण्यासारखी.

**सुमंगल :** म्हणजे ? मी नाही बाई समजले.

**चिंतामणी :** थोडक्यात, चुंबनालिंगनादी अंगसंग आता मैत्रीमध्ये अगदी राजरोस बसतो !

**सुमंगल :** इश्श ! मला नाही हो खपायचा असला अनाचार !

**चिंतामणी :** यात तुला अनाचार दिसतो, मलाही अनाचार दिसतो, पण त्याला दिसत नाही. कारण हा जनरेशन गॅपचा परिणाम ! असं तो म्हणतो.

**सुमंगल :** मला तर काळजीच वाटायला लागलीय या पोराची. कुठं तरी हा घसरेल आणि एखादी घोरपड गळ्यात घेऊन बसेल.

**चिंतामणी :** तुला त्याची काळजी वाटते पण मी चिंतेनं हैराण झालोय ते या कारटीच्या पायी.

**सुमंगल :** उगीच काय बोलता हो. गौरीला एक तरी मित्र आहे का ?

**चिंतामणी :** मित्र नसतील. पण पायघोळ भगवे कफनीवाले गुरुबंधू तर रगड आहेत ? रुद्राक्षाच्या माळा काय घालतात, लॉकेटमध्ये स्वामीजींचा फोटो काय लावतात आणि मठात जाऊन हरेकृष्ण हरेराम करीत नाचत काय बसतात, सगळा अजब प्रकार आहे ! उडाणटप्पू लेकाचे. त्या स्वामी प्रेमानंद फुरसुंगीकर महाराजांच्या नादी लागल्यापासून गौरीचं डोकंच फिरलंय.

**सुमंगल :** मठात जाऊन अंमळ अध्यात्माची साधना केली मुलीनं तर एवढं बिथरायला काय झालं हो तुम्हांला ?

**चिंतामणी :** अध्यात्माची साधना ? बोडकं तिचं. अध्यात्म करायचं कारटीचं हे काय वय आहे ?

**सुमंगल :** प्रेमानंद स्वामी साक्षात्कारी संत आहे म्हणतात.

**चिंतामणी :** त्या छाकट्या स्वामीला पाहिला आहेस का तू ? पाच-पंचवीस शिष्यिणींना घेऊन एकान्तात साधना करतो म्हणे हा बोका. तुला बजावून ठेवतो, सुमंगल, एक दिवस हा स्वामी आपल्या पोरीला घोळात आणणार आहे !

**सुमंगल :** मला सांगताय ते तिला बजावा की !

**चिंतामणी :** एकदा नव्हे, शंभर वेळा बजावलं. तर ही ढालगज भवानी मला ठणकावते— तुमच्या माझ्या विचाराच्या वेव्हलेंग्थ्स जुळत नाहीत !

**सुमंगल :** वेव्हलेंग्थ्स जुळत नाहीत ?

**चिंतामणी :** हो. म्हणून आपल्यात 'डायलॉग' संभवू शकत नाही. हे ऐकल्यापासून ठरवून टाकलं की गौरी मला मेली आणि मी तिला मेलो !

**सुमंगल :** हे बरंय बाई तुमचं. मुलांचा विषय निघाला की तिरसटून शिव्या घाल घाल घालायच्या आणि शेवटी 'टिट्टू मला मेला, गौरी मला मेली, गोट्या मला मेला, इथं येऊन थडकायचं. तुम्हाला जिवंत तरी कोण कोण आहे हो ?

**चिंतामणी :** तोही एक प्रश्नच आहे. पण यापुढं आपल्या मुलांच्याबद्दल मी ढुंकून चौकशी करायचा नाही.

**सुमंगल :** हे नुसतं तोंडानं म्हणायपुरतं. काही नाही; माझी मुलं चांगली आहेत. तुमच्याच मनचं आहे हे सगळं.

**चिंतामणी :** तुझी मुलं संतसज्जन आहेत, मी त्यांचा बाप काय तो खडूस आहे ! मग तर झालं ?

**सुमंगल :** तुम्ही आपलं तरुणपण विसरलात का हो ? तुम्हाला कोणी मैत्रिणी नव्हत्या ?

**चिंतामणी :** आपल्या वेळी मुळी 'मैत्रिणी' हे प्रकरणच नव्हतं. होत्या त्या सगळ्या मानलेल्या बहिणीच.

**सुमंगल :** बहिणी ? सगळ्या मानलेल्या बहिणी ? मीसुद्धा ?

**चिंतामणी :** हो हो– तूसुद्धा. बघतेस काय अशी ? सेवादलात जात नव्हतो का आपण त्या काळी ? तिथंच आपली ओळख झाली. तू मला आप्पा म्हणायचीस; मी तुला आक्का म्हणायचो.... इलाजच नव्हता त्या काळात. पुढं लग्नाचं ठरलं तेव्हा नातं बदललं. तरी पण या पोरांच्यासारखा गोकुळकाला नव्हता केला कधी मी. बहीण तर बहीण पण तू एकच बहीण.

**सुमंगल :** या थापा कोणापुढं मारताय ? मग ती गोरीगोमटी, घाऱ्या डोळ्यांची मनी मांजरी कोण होती तुमची ?

**चिंतामणी :** गोरीगोमटी ? घाऱ्या डोळ्यांची ? हा हाऽऽ ती मनुताई भडकमकर ? छे छे, त्यात काही तथ्य नव्हतं. तुझा आपला काही तरीच गैरसमज—

**सुमंगल :** गैरसमज ? कोजागरीच्या रात्री शिबिरात तुम्हाला सैगलचं 'सो जा राजकुमारी' म्हणायचा कोणी आग्रह केला ? आणि दर्दभरी आवाजात नेत्र-पल्लवीसह ते गाणं कोणी म्हटलं ? आणि मग 'चिंतूभय्या, तुझा आवाज किती रे छान आहे ! डिट्टो सैगलच '— असं कोण कोणाला—

**चिंतामणी :** (उसळून) हे हे मात्र तुझं काही तरीच हं.

**सुमंगल :** होय का ? तर मग आणखी सांगते. 'श्यामची आई' पुस्तकातून मनीमांजरीला ज्या चिठ्ठया जात-येत होत्या—

**चिंतामणी :** ( गडबडून ) अग जाऊ दे... जाऊ दे... त्या वेळी आपलं हे

हे म्हणजे लग्नाचं काहीच ठरलं नव्हतं अजून. म्हणजे—

**सुमंगल :** म्हणूनच खडे टाकून पाहणं चाललं होतं वाटतं ?— वहिणींच्यावर ?

**चिंतामणी :** अग काहीच्या काही काय बडबडतेस ? ती मनू आता चार मुलगे, दोन मुलींची आई आणि तेरा नातवंडांची आजी झालीय !

**सुमंगल :** बघा बघा ऽऽ मुला–नातवंडांचे आकडेदेखील तोंडपाठ ! बारशाला जात होता वाटतं ?

**चिंतामणी :** ( उठून हात जोडत ) माझे आई, हात जोडतो, आता गप्प बसायला काय घेशील ?

[ तेवढ्यात दार उघडून ट्रॅन्झिस्टर कानाशी घेतलेला तुकाराम आत येतो आणि— ]

**तुकाराम :** बाई, मॅच आटोपली की...

**सुमंगल :** आटोपली म्हणजे ?

**तुकाराम :** धो धो पाऊस पडतोय. पिच खराब झालंय म्हणे.

**सुमंगल :** चला; म्हणजे टिटूसुद्धा जेवायला परत येईल घरी. मी चहा घेऊन येते हं. ( लगबगीने आत जाते. )

[ तुकाराम उभा राहतो. चिंतामणराव फाइल उघडून नोंदी करू लागतात. ]

**तुकाराम :** साहेब, ( टीपॉयवरल्या जग आणि ग्लासचा निर्देश करीत ) या भांड्यातलं पाणी या ग्लासानं मी प्यालो तर चालेल का ?

**चिंतामणी :** ( काम करता करता वर न बघता ) अरे पी की. विचारायचंय काय त्यात ? आम्ही कोणी 'ते तसलं काही' मानीत नाही घरात.

**तुकाराम :** ते खरंय साहेब, तरी पण विचारलेलं बरं. नंतर उगाच कोणी फिसकला तर आपलं माथंच भडकतं. ( पाणी पीत ) बाकी, आता 'तसलं ते मानायची' कायद्यानंच बंदी आहे म्हणा. [ चिंतामणराव डोळे वटारून वर दृष्टिक्षेप टाकतात, तशी तुकाराम गटागटा पाणी पितो. चिंतामणरावांची मान पुन्हा खाली फायलीत. तुकाराम पुन्हा ग्लास पाण्यानं भरता भरता सहज अथवा सहज दिसल्यासारखा गुणगुणतो— 'सो जा राजकुमारी सो जा'— पुढची ओळ ड च्या बाराखडीत म्हणू लागतो. तोच चिंतामणराव चकारून वर बघतात. डोळे वटारीत पेन आपटतात. तुकाराम गडबडीनं गटागटा पाणी ढोसतो. गडबडीत पाणी अंगावर सांडतंदेखील. तोंड पुसत तो विचारतो— ] साहेब; तुम्ही ड्डिट्टो सैगलसारखं गाणं म्हणता ?

**चिंतामणी :** तुक्या, तुला बाहेर कशासाठी बसवलाय ? आतली बोलणी चोरून ऐकण्यासाठी ?

**तुकाराम :** नाही नाही... साहेब मी काहीएक ऐकलं नाही. देवाशपथ—

**चिंतामणी :** बोलू नकोस, तू इरसाल बेरड आहेस.

**तुकाराम :** बेरड ? साहेब तुम्ही मला बेरड म्हणालात. जातीवरून मला शिवी घातलीत. माझ्या भावना दुखावल्यात. माफी मागा.

**चिंतामणी :** तू खोटं बोलतो आहेस. मी जातीवरून तुला बेरड म्हटलेलं नाही. मी जातपात मानीत नाही. बेरड म्हणजे इब्लीस या अर्थानं—

**तुकाराम :** साहेब, माफी मागा नाही तर यूनियनची सभा बोलवावी लागेल!

**चिंतामणी :** ठीक आहे. बेरड शिवी मी परत घेतो. तुझी माफी मागतो. तरी, पण तू पक्का डांबरट आहेस हे बजावून ठेवतो. डांबरट ही जातिवाचक वा असभ्य शिवी नाहीये. थांब, तुझी बदलीच करून टाकतो. एका पाणी नसलेल्या खेड्यातल्या ब्रँचवरच धाडतो तुला. बैस सकाळ-संध्याकाळ चार चार मैलांवरून घागरी भरून आणीत.

**तुकाराम :** साहेब, मी खरोखरीच सांगतो—

**चिंतामणी :** ( ओरडून ) चूप. बाहेर जाऊन बैस. चहापाणी काहीएक मिळायचं नाही तुला.

[ तुकाराम जाण्यासाठी वळतो तोच दोन कपांचा ट्रे घेऊन सुमंगल येते.]

**सुमंगल :** थांब रे तुकाराम. एवढा चहा पिऊन जा.

**चिंतामणी :** कमाल आहे तुझी. चहा काय देतेस त्याला ?

**सुमंगल :** बघा बाई ! तुम्हीच ना मघाशी सांगितलंत की—

**चिंतामणी :** ते मघाशी. आत्ता हा डांबरटपणानं काय गुणगुणत होता ठाऊक आहे ? सो जा राजकुमारी–! आणि वर चारगटपणानं विचारतोय मला, " साहेब, आपला आवाज डिट्टो सैगलसारखा आहे का हो ? "

**सुमंगल :** इश्य, त्यात चारगटपणा हो काय झाला ? कौतुकानं विचारलं असेल. उगीच एखाद्याच्या राशीला लागायचं म्हणजे काय ? घे रे तुकाराम चहा.

**तुकाराम :** घेऊ का साहेब ?

**चिंतामणी :** एकापेक्षा एक भारी नग भेटलात तुम्ही मला. ( खेकसून ) घेऽऽ पण इथं उभा राहू नकोस. बाहेर जाऊन ढोस.

[ कप घेऊन तुकाराम बाहेर जाण्यासाठी दार उघडतो. तो दारातच दिसतात बिंदुमाधवराव सरनोबत, त्यांच्या पत्नी कमळजाबाई आणि प्रिया ऊर्फ प्रियदर्शिनी नाडकर्णी. बिंदुमाधवराव म्हणजे सत्तरी ओलांडलेला, प्रसन्न हसऱ्या मुद्रेचा, चिवट अंगकाठीचा, मिस्किल, खूप बोलका, ' अजून यौवनात मी ' पंथातला एक खमंग म्हातारा. कमळजाबाई पासष्टीच्या. कधीकाळी देखण्या होत्या. न्यायमूर्तींच्या खानदानी घराण्यात जन्मलेल्या. प्रकृतीच्या सदैव किरकिरीत आणि ' आपल्याला कोणी मानीत नाही ' या कुरबुरीत असलेल्या. प्रियदर्शिनी तेवीस-चोवीस वर्षांची तरुण देखणी मुलगी; पण मुलगी म्हणणं कठीण व्हावं असा प्राध्यापकी विद्वत्तेचा छाप मुद्रेवर; तसाच वेश-केशभूषेवर. दार उघडलं जातं

तेव्हा पाठमोरे उभे असलेले बिंदुमाधवराव म्हणतात–
......"छे छे छे छे.... प्रिया, विद्यापीठाच्या वळचणीखालून नुक्ती बाहेर पडलेली तुझ्यासारखी इतिहासाची प्राध्यापकमंडळी नेहमी ही अशी घसरतात. नाही नाही, रामचंद्रपंत अमात्य बावडेकर हा शहाणा मुत्सद्दी होता, धोरणी होता, खबरदार होता, कर्तबगार होता... त्याची एकूण कामगिरीदेखील फार मोलाची झाली हे मला मान्य आहे. पण आज्ञापत्रात प्रगट झालेलं शहाणपण काही त्याच्या स्वतःच्या टाळक्यात पिकलेलं नाही. अरे, राजनीतीतल्या शब्दा-शब्दांतून, शिवाजीमहाराज कसे बिर्याणीतल्या तुपासारखे ठिबकताहेत. उदाहरणार्थ, फिरंगी साहुकाराबद्दल हा रामचंद्रपंत काय सांगतो ते बघ–" असे म्हणत ते हात मागे नेऊन पुन्हा घंटेची कळ दाबतात तशी—
कमळजाबाई म्हणतात— "अहो इतिहासाचार्य, पुन्हा घंटा कशाला वाजवताय? दार उघडं आहे की. आधी आत चला आणि मग राजनीतीतलं शहाणपण कोणाचं त्याची चर्चा करा.

बिंदुमाधवराव भानावर येत वळून बघतात आणि– "अरे ऽ.... खरंच की! चला...." असे उद्गारत आत येतात. पाठोपाठ प्रिया आणि कमळजाबाई येतात. आत पाऊल घालतात तो चहाचा कप घेऊन समोर तुकाराम उभा. तो आपल्यासाठी आहे असं वाटून खूष होत– ]

**बिंदुमाधव :** अरे वा वा वा ऽ! छान, सूनबाई, काय तुझी कल्पकता, काय तुझं धोरण, केवढी दक्षता! कशाकशाची म्हणून तारीफ करावी? बघ बघ, प्रिया, घरात पाऊल टाकतो तो समोर तुकाराम गरम चहाचा कप घेऊन उभा! वा वा, शाबास तुकाराम. आण इकडं तो कप (कप ओढून घेतात.) कमळजाबाई, तुमच्यासाठी दुसरा कप घेऊन सूनबाई जातीनं तिष्ठत उभ्या आहेत. काही सेवेची कदर कराल की नाही?

**कमळजाबाई :** (बसत) मला नको ग बाई चहा. आधीच पित्त झालंय.

**बिंदुमाधव :** (घोट घेत) वा... फर्मास! (सुमंगलच्या हातून दुसरा कप घेऊन कमळजाबाईपुढं करीत) अग घे ऽऽ! बघ तरी तुझ्या सूनबाईच्या हातात काय जादू आहे ती. अग शंभर ठिकाणी चहा ढोसला तरी या घरातल्या चहाची लज्जत काही औरच आहे. घे घे ऽ! तुला सांगतो कमळजे, या वयात माणसानं पोटातल्या कुरबुरीची फार पर्वाज बाळगायची नाही. समोर येईल तो चेंडू चौफेर फटकारायचा. टिट्रकडून काही शिर्का ऽऽ; घे ऽ, हूं ऽऽ लगाव बत्ती.... औट तर औट!

**कमळजा :** गोड बोलून एखाद्याच्या गळी विषसुद्धा उतरवाल तुम्ही.
(कप घेत) आणि प्रियाचं काय सुमंगल?

**प्रिया :** माझं काही नाही. मी चहा घेतच नाही मुळी. आणि या वेळी–

**सुमंगल :** ऑरेंज ज्यूस तरी घेशील ना ? जेवायला अवकाश आहे अजून. तुझ्या आवडीची उडदमेथी केलीय आज मी.

**प्रिया :** नुसत्या माझ्या आवडीची का ? टिट्टूलादेखील आवडतं.

**विंदुमाधव :** दोघांची आवड इतपत तरी जुळतेय म्हणायची.

**प्रिया :** तितपतच जुळतेय. पुढं नाही. बिच्चारा ! दोन धावांसाठी शतक हुकलं !

**सुमंगल :** चक्क खोटा आौट दिला ना ग त्याला ? किती वाईट वाटत असेल टिटूला.

**विंदुमाधव :** तसं काही वाटलं नाही बोवा. आम्ही आत्ता भेटायला गेलो तेव्हा चांगला वीस-पंचवीस मुलींच्या गराड्यात हसत बोलत सह्या देत उभा होता, नाही ग प्रिया ?

**चिंतामणी :** म्हणजे तिथंही मुलींचा गराडा होताच ना भोवती ?

**सुमंगल :** फक्त सह्यांसाठी. तुम्ही आता सुतावरून स्वर्ग गाठू नका ! तुमचा आणि तुकारामाचा चहा मी घेऊन येतेय. ( जाऊ लागते.)

**चिंतामणी :** माझ्यासाठी आता मुद्दाम चहा करायची गरज नाहीये.

**सुमंगल :** अहो चहा सगळ्यांचाच तयार होता. फक्त—

**कमळजा :** बाई ग बाई ! म्हणजे हा कप तुझ्यासाठी का आणला होता चिंतू ? मी समजले की— अहो इतिहासभास्कर, चहाचा कप ढोसून एवढ्यात पार झालात वाटतं ? तो कप तुकारामासाठी होता. जरा विचारायचं तरी ? सून-बाईला सगळी गोड गोड सर्टिफिकेटं देऊन स्वारी मोकळी !

**सुमंगल :** काही बिघडलं नाही. चहा सगळ्यांचाच तयार केलाय. फक्त आत जाऊन आणायचाय. तुम्ही यायचीच वाट पाहात होते मी. आत्ता आणते मी. प्रिया, माझ्या मदतीला ये ग आत.

[ सुमंगल आणि पाठोपाठ प्रिया आत जातात. ]

**विंदुमाधव :** अरे राम राम राम ! कमाल आहे तुझ्यापुढं ! जरा गप्प बसली असतीस तर काही बिघडलं असतं ?

**कमळजा :** बघा बाई ! मी काय हो बोलले ?

**बिंदुमाधव :** हा आणलेला चहा नेमका कोणासाठी होता याची इतकी जाहीर चिरफाड करायची गरज होती का ? सूनबाईला मी शाबासकी देत होतो; तीही खूष होऊन फुगत होती. तेवढ्यात तू सगळे फुगे फटाफट फोडून, लज्जतदार चहाचा पार कडूझेर काढा करून टाकलास !

**कमळजा :** हे पाहा, मला तुमच्यासारखी तोंडावर गोड गोड स्तुती करणं जमत नाही. मी जज्जाच्या घरात जन्मलेय. मी काळीला काळी आणि नकटीला नकटीच म्हणणार.

**बिंदुमाधव :** जन्मभर ते म्हणतच आलात. पण आता मुलाच्या घरात दोन महिन्यांसाठी पाहुणे म्हणून आल्यावर तरी—

**कमळजा :** पाहुणी का म्हणून ? मी सुमंगलची सासू आहे. सावत्र नाही, अगदी सख्खी ऽऽ !

**बिंदुमाधव :** हो. मी ज्या अर्थी दुसरं लग्न केलेलं नाही, त्या अर्थी....तर पण— अहो सासूबाई, तुमची राजवट संपली. आता तुमच्या सुनेला सून यायचे दिवस आलेत. तेव्हा आता न्यायमूर्ती पिताजींच्या घरातलं बाळपण तरी विसरा आणि धोरण राखून यापुढं, काळ्या मुलीला स्मार्ट म्हणा....म्हणजे तरतरीत, आणि नकटीला, तुझे डोळे टप्पोरे आहेत असं सांगा;— नसले तरी सांगा.... कोणी रामशास्त्री न्यायनिवाडा करायला येणार नाहीत तुमचा. अगं, म्हातारपणी तोंड उघडावं ते फक्त शाबासकी देण्यासाठी, आणि मूठ उघडावी ती फक्त बक्षीसं देण्यासाठी. खरं की नाही चिंतोबा ?

**कमळजा :** उज्जेड ! तो काय बोलणार, कपाळ ! पन्नाशी उलटली तरी तो अजून हातात छडी घेतलेल्या पंतोजीसारखा मुलांच्यावर गुरकावत असतो. मेल्याला कोण्णा कोण्णाचं कौतुक म्हणून नाही.

**चिंतामणी :** हे बघ आई, कौतुक करायला मुलं त्या लायकीची लागतात.

**कमळजा :** का रे बाबा ? टिटूनं कौतुक करण्यासारखा क्रिकेटमध्ये पराक्रम केला नाही का ?

**चिंतामणी :** ( तुच्छतेनं ) क्रिकेटमध्ये ! हॅ ऽऽ !

**कमळजा :** हॅ करून नाक मुरडू नकोस. लोक तुला त्याचा बाप म्हणून ओळखतात, ठाऊक आहे ?

**चिंतामणी :** मला असली सवंग लोकप्रियता नकोय. उद्या मला लोक स्वामी प्रेमानंद फुरसुंगीकरांची शिष्या गौरीदेवी आणि होऊ घातलेले सिनेस्टार गोऱ्या यांचा बाप म्हणूनसुद्धा ओळखतील. म्हणून मी काय लागलीच आनंदानं टिऱ्या बडवून घेऊ ?

**बिंदुमाधव :** हळूहळू.... आवाजाची आणि आवेशाची पट्टी उतरव. चिडून तावातावानं बोलू नकोस. डायबेटीस ! ब्लडप्रेशर ! हार्ट ॲटॅक— बिवेयर !

**चिंतामणी :** बाबा, या पोरांनी काय माझे पांग फेडलेत ? या वयात तुम्ही करो ठणठणीत आहात. पण मला डायबेटिस आहे. ब्लडप्रेशर आहे. हार्ट ट्रबलसुद्धा आहे. त्याला कारण म्हणाल तर ही— ही कारटी ! खरोखर तुम्हाला सांगतो—

**बिंदुमाधव :** हं हंऽ राग आवर... आधी राग आवर.... तुला एक सांगतो चिंतामणी, रागावणं म्हणजे काय, हे तुला ठाऊक आहे ? रागावणं म्हणजे दुसऱ्याच्या अपराधाबद्दल स्वतःला करून घेतलेली शिक्षा. म्हातारपण चोरपावलानं येतं, ते सावधपणं पकडायचं असतं. त्यासाठी खूप काही शिकावं लागतं. पन्नाशी उलटली की पहिला गुड बाऽय करायचा तो रागावण्याला. काय हो कमळजादेवी ?

**कमळजा :** आता हेही सांगून टाका की माझा राग मी गिळलाय, पण हिला काही ते जमलं नाही. म्हणा ना ऽऽ

**विंदुमाधव :** ( मिस्किलपणं ) तसंच काही नाही. जमतंय.... जमतंय.... हळूहळू जमेल. [ तेवढ्यात सुमंगल ट्रे घेऊन येते. पाठोपाठ ज्यूसचा ग्लास घेऊन प्रिया येते. सुमंगल एक कप चिंतामणरावना देते. दुसरा तुकारामला. तुकाराम कप घेऊन बाहेर जातो. चिंतामणराव कप तोंडाला लावणार तेवढ्यात फोन वाजतो. तशी तो घेत रिसीव्हरमध्ये ]

**चिंतामणी :** हॅलो.... सी. बी. सरनोबत, मॅनेजर–जनता बँक ऑफ इंडिया, पेडर रोड... येस !.... टिट्टू ? टिट्टू अजून घरी आला नाही... पॅव्हेलियनमध्ये नाहीये... ? ते आता मी कसं सांगणार ?... हे पाहा.... हे सगळं तुम्ही त्यालाच सांगा.... नाव काय म्हणालात ? शमा नाझीरअली... ठीक आहे, सांगतो. ( रिसीव्हर ठेवून कप तोंडाला लावीत ) आता ही कटकट सुरू होणार, बरं का !

**प्रिया :** ही शमा नाझीरअली कोण ?

**सुमंगल :** टिट्टूची मैत्रीण. पण म्हणत काय होती ?

**चिंतामणी :** म्हणणार काय दुसरं ? टिट्टू अठ्याण्णव धावांवर औट झाल्यामुळं बिच्चारीला किती किती दुःख झालं ते—

[ पुन्हा फोन वाजतो, तशी– ]

**सुमंगल :** मी बघते. तुम्ही चहा घ्या. ( रिसीव्हर उचलीत ) हॅलो... मी टिट्टूची आई. तुम्ही कोण.... हो पण खास मैत्रीण म्हणजे कोण ? काही नाव.... मीनाक्षी धटिंगण ? हं.... हं... हो ना....

[ तिचं फोनमध्ये बोलणं चालू असतानाच– ]

**विंदुमाधव :** पण मला कळत नाही– अठ्याण्णव धावा मिळवल्याबद्दल कौतुक करायचं सोडून दोन धावा गमावल्याबद्दल या महिला फोनवर का गळा काढताहेत ?

**चिंतामणी :** बाबा, सगळा चावटपणा आहे. हा खेळ कायद्यानं बंद केल्या खेरीज भारताला तरणोपाय नाही.

**सुमंगल :** ( रिसीव्हर ठेवीत ) ही धटिंगण म्हणतेय, टिट्टूला सांगा, डोन्ट बी डिसहार्टन्ड... मी तुझ्या पाठीशी आहे.

**प्रिया :** तूच कशाला ? मुंबईतल्या सगळ्या फटाकड्या त्याच्या पाठीशी आहेत, म्हणावं. चवचाल मेल्या !

**सुमंगल :** संध्याकाळी नेहमीच्या ठिकाणी भेट म्हणून निरोप आहे टिट्टूला.

**प्रिया :** हे नेहमीचं ठिकाण कोणतं ?

**सुमंगल :** तुम्ही दोघं भेटत होता तेच असणार.

**चिंतामणी** : सी. सी. आय.मधल्या रूमवर. मी सांगतो; मला विचार.

**प्रिया** : आम्ही भेटत होतो तो फार जुना काळ झाला.

**विंदुमाधव** : म्हणजे तुम्ही बालपणी भेटत होता का ?

**प्रिया** : तारुण्याच्या बालपणीच म्हणायला हवं. त्या वेळी टिटू टेस्ट मॅच प्लेयर झाला नव्हता. सी. सी. आय. वगैरे नावं ऐकूनसुद्धा ठाऊक नव्हती आम्हाला. आम्ही भेटत होतो चौपाटीवर. भेळ नाही तर पाणीपुरी इतक्यापुरतंच आमचं बजेट असायचं.

**विंदुमाधव** : ( मिस्किलपणे ) तरी पण बेटी, त्या भेळेतला 'खमंगपणा' आणि पाणीपुरीतलं 'पाणी' काही न्यारंच होतं, नाही का ?

**प्रिया** : कोणास ठाऊक. माझी आता सगळ्याच पाण्यातली चव गेलीय.

**विंदुमाधव** : ( थट्टेनं ) अरे अरे.... मग खरं म्हणजे ही प्रोफेसरकी सोडून तू आमच्या गौरीप्रमाणं प्रेमानंदस्वामी फुरसुंगीकर महाराजांचा गुरुपदेश का घेत नाहीस ? निदान अध्यात्माच्या पाण्याचा तरी डोस घेऊन बघायचास !

**कमळजा** : तुम्हाला कशाला हव्यात हो या फाजील चौकशा ?

**विंदुमाधव** : म्हणजे काय ? सरळच आहे ! सगळ्या म्हाताऱ्यांचा तो जन्मसिद्ध हक्कच आहे. अग कमे, शुष्क म्हातारपणं अंमळ रसाळ करायचं, तर तरुणांच्या 'फाजील चौकशा' करण्यावाचून म्हाताऱ्यांना दुसरा काय तरणोपाय आहे बरं ? काय चिंतोबा ? थांब, रागावू नकोस. तू भारताच्या तरणोपायाबद्दल बोललास; मी म्हाताऱ्यांच्या तरणोपायाबद्दल बोलतोय. बाकी तुला कशाला सांगायला हवं म्हणा. तू तर 'चौकशी सम्राट' आहेस. एरवी टिटूच्या सगळ्या मैत्रिणी आणि त्यांच्या भेटीच्या सगळ्या जागा नेमक्या तुलाच रे कशा कळतात ? [ तेवढ्यात टेलिफोन खणखणतो, सुमंगल पुढं होते. तशी— ] थांब सूनबाई. हा फोन मी घेतो. टिटूच्या मैत्रिणीची थोडी गंमत करू या.

**कमळजा** : खट्याळपणा करू नका हं. गंमत अंगाशी येईल.

**विंदुमाधव** : ( नाकावर बोट ठेवीत ) शू ऽ ऽ क ! ( रिसीव्हर उचलून ) येस ? ....हाई बेबी.... मी बिंदुमाधव, टिटूचा जानी दोस्त....

**कमळजा** : (उठत) अहो अहो, काय हे ऽ ऽ ?

**विंदुमाधव** : (डोळे मिचकावून तिला गप्प करीत) तुमचं नाव काय म्हणालात ? ..कमल कुलकर्णी ? ओ हो ऽ फॅंटास्टिक... नाही म्हणजे हैद्राबादच्या न्यायमूर्ती कुलकर्ण्यांच्या मुलीचं नावही कमलच आहे... माझी फीयॅन्सी होती ती.

**कमळजा** : (कासावीस) अहो अहो ऽ तुम्ही चालवलंय तरी काय ?

**विंदुमाधव** : 'होती' म्हणजे अजूनही आहे ती. पण लग्न झाल्यावर नाव बदललं तिचं.... हो माझ्याशीच... कमल कुलकर्णीची कमळजा सरनोबत झाली ....हो ना... तसा टिटू आमचा नात्यातलाच आहे... पण जरा लांबचा....

...हो, म्हणजे त्याचा बाप, हा माझा सख्खा मुलगा लागतो... अय्या करून हसायला काय झालं?... हं.... बरं... हं नाही, तुमचा निरोप सांगतो त्याला आल्यावर, पण आज संध्याकाळी तुम्हाला तो भेटणं मला कठीण दिसतंय,.... नाही म्हणजेऽऽ तुम्हाला सांगायला हरकत नाही, पण त्याच्या लग्नाचं ठरतंय, साखरपुडा आहे सायंकाळी....तेव्हा ऽऽ

**चिंतामणी :** बाबा ऽऽ...

**कमळजा :** किती द्वाडपणा कराल हो ?

**बिंदुमाधव :** ते तुम्ही सगळं त्यालाच विचारा.... आच्छाऽऽ (फोन ठेवतात.)

**प्रिया :** आता गावभर ही बातमी वाऱ्यासारखी पसरेल.

**बिंदुमाधव :** पसरू द्या. त्यासाठीच वाऱ्यावर पेरलीय.

**सुमंगल :** प्रिया, अग बाबांनी तुझं नाव सांगितलं नाही हे तुझं नशीब समज.

**बिंदुमाधव :** सांगणार होतो. सांगितलंही असतं. पण त्या दोघांचं नेमकं कुठं आणि कितपत बिनसलंय, त्याचा मला अजून अंदाज येत नाहीये. पण येईल.... येईल... इतिहास संशोधनात हयात घालवली ती उगाच नाही. कधी तरी अस्सल पुरावा हाती लागेलच. हा फंटूश केव्हा तरी माझ्याशी बोलणार.

**प्रिया :** तसं काही नाहीये बाबा. पूर्वीही आम्ही मित्र होतो आणि आजही आम्ही मित्रच आहोत. बिनसलं वगैरे काही नाहीये. टिटू त्याच्या मॅचेसमध्ये गर्क आहे, मी माझ्या पीएच. डी.त गुंतलेय. म्हणून—

**बिंदुमाधव :** ऑल राइट ! ऑल राइट ! थोडंसं खरवडून बघू का ?

**कमळजा :** आता कोणाला काय खरवडणार आहात ?

**बिंदुमाधव :** प्रिया, तू नेसलेली ही म्हैसूर सिल्क साडी सुमारे चार वर्षांपूर्वी टिटूनं तुला प्रेझेन्ट म्हणून दिली. ॲम आय राइट ? थांब, थांब... गडबडीनं नाकारू नकोस. त्या वेळी ही साडी घ्यायला टिटूला उसने पैसे मी दिले होते. चिंतोबा, हा खुलासा तुझ्यासाठी. आणिक प्रियासाठी ही साडी घ्यायलाही टिटूबरोबर दुकानात मीच गेलो होतो. टिटूचा दोस्त म्हणून बरं का कमळजाबाई !

**कमळजा :** बाई ग बाई. पाहिलंस सुमंगल, कसे आतल्या गाठीचे, पक्के लुच्चे आहेत हे इतिहासमार्तंड ?

**सुमंगल :** लुच्च्या आणि आतल्या गाठीचा, हा भामटा मेला टिट्याच आहे. मोठ्या तोंडानं मला म्हणतोय मेला— 'आमचं जमलं होतं कधी म्हणून बिनसलं केव्हा ते विचारतेस ?'

**बिंदुमाधव :** मुद्दा तो नाहीये. आज इथं आणि स्टेडियमवर यायला तू नेमकी हीच साडी का निवडलीस ?'

**प्रिया :** (डोळे भरून येत) जाताना मी साडी बदलणार आहे, आणिक ही

साडी त्याला परत करून टाकणार आहे. झालं? (हुंदका आवरीत आवेगानं आत पळते; तशी-)

**बिंदुमाधव :** अरे अरे.... हे प्रकरण एकदम भलतंच गंभीर झालं की.

**कमळजा :** गंभीर होईल नाही तर काय? तरी मी सांगतेय, सुचवतेय, जीभ आवरा; खट्याळपणा कमी करा.... पण नाही.... सगळी चेष्टाच चेष्टा. माझे बाबा मला नेहमी म्हणायचे- कमे, तुझ्या नवऱ्याची बुद्धी बृहस्पतीसारखी, विद्वत्ता डोंगराएवढी, पण स्वभाव पोरकट गऽ! ऊठसट थटामस्करी आणि सारखं खी खी खी करून हसायचं. काय हेऽऽ?

**बिंदुमाधव :** (कान धरीत) चुकलोऽ! यापुढं न्यायमूर्तींच्यासारखा लांब, चिंतातुर चेहरा करून वावरेन. पुन्हा कानाला खडा. कोणाची थट्टा, मस्करी म्हणून करायची नाही. होऽ अगदी उभ्या आयुष्यात!

**कमळजा :** आयुष्याचं राहू दे, तासभर तरी पाळा ही शपथ.

**बिंदुमाधव :** सुमंगल, तू आत जा आणि प्रियाला शान्त कर. तिला सांग, आम्ही इथं आलोय ते त्या दोघांचं का बिनसलं हे नुसतं विचारायसाठी नाही; शक्य तर सरळ करण्यासाठी!

**सुमंगल :** तरी पण बाबा, तुम्ही एकदा टिटूला चांगला झापलाच पाहिजे.

**बिंदुमाधव :** झापू....झापू...!

**चिंतामणी :** (रागानं) नाही नाही, तेवढ्यानं नाही भागणार बाबा. तो फार लाडावलाय.... फार फार शेफारलाय... त्याला माज आलाय माज. तुम्ही... त्याचं सणसणीत थोबाड फोडलं पाहिजे, आणि.... आणि... विचारलं पाहिजे- "तुझे हे हे- हे काय थेर चालले आहेत? अरे आम्हाला काही.... हे आहे की नाही?"

**बिंदुमाधव :** विचारू. सूनबाई, तू जा. [सुमंगल जाते. मग] चिंतोबा तू आधी शान्तपणं बस पाहू. ड्रॉप डाउन. [चिंतामणी बसतो. कोचावर मागं मान टेकतो.] राग आवर. डोळे मिटून शंभर अंक मोजा.

**कमळजा :** (जवळ जात) चिंतोबा, राजा, किती रे जिवाला त्रास करून घेतोस?

**चिंतामणी :** आई, माझ्या ब्लडप्रेशरच्या गोळ्या घेऊन येतेस?

**कमळजा :** आणते हं बाळ... (आत लगबगीनं जातात. मग-)

**बिंदुमाधव :** (हाक मारीत) तुकाराम.... [तशी तुकाराम दार ढकलून पुढं उभा]

**तुकाराम :** साहेब फारच त्रास करून घेतात, बाबा. आईचं अगदी खरंय. बाईंचंही खरंय. आता पोरं म्हटली की जरा वांड असायचीच की! कसं ऽ?

**बिंदुमाधव :** ठीक आहे. त्या फाइली उचल आणि ऑफिसात नेऊन ठेव

खाली. काहीही काम वर आणू नकोस आज तरी.

**तुकाराम :** छा छाऽ, काय वेड ? मीच घरी निघून जातो म्हणजे काम वर येईलच कसं ? [ लगबगीनं फाइली उचलून जाऊ लागतो, तशी—]

**चिंतामणी :** जरा थांब तुकाराम....म्हणजेऽऽ

**बिंदुमाधव :** तुकाराम, मी तुझ्या साहेबांचा बाप आहे; मी सांगतो, तू जा !

**तुकाराम :** म्हणजे काय, संपलंच की...जातोच. ( जातो. )

**बिंदुमाधव :** अरे बाबा, या जगात आपल्यावाचून कोणाचं काहीही अडत नाही, अडणार नाही; हे शहाणपण तुला कधी येणार ?

**चिंतामणी :** बाबा, ही मुलंऽऽ ही मुलं माझा अंत पाहताहेत.

[ डोळे मिटून मान मागं टेकतो. बिंदुमाधवराव येरझारा घालीत ]

**बिंदुमाधव :** चिंतोबा, अरे मुलंही अशीच असतात, अशीच होती, आणि अशीच असणार आहेत. तू कसा होतास ? लग्न ठरल्यावर तुझं मनू भडकमकर प्रकरण.... सो जा राजकुमारी.... आठवतंय ना ? [ चिंतामणी मान वर करून हात जोडतो, तशी– ] नाही. इथं कोणीही नाही ये. [ सभोवार बघून चिंतामणी मान टेकीत डोळे मिटतो. तशी येरझारा घालीत बिंदुमाधवराव– ] चिंतोबा, अरे पिढ्यांमागून पिढ्या उलटल्या तरी मुलं तीच असतात, आणि तशीच वागतात. ‘ जनरेशन गॅप !.... ’ ‘ एका पिढीचं अंतर,’ हा काही याच पिढीचा शाप नाहीये. ‘ या वर्षी उन्हाळा फारच वाढलाय,’ असं म्हणायची फक्त पद्धत असते, इतकंच ! मी तुला सांगतो चिंतू, अरे, शहाजी आणि शिवाजी आणिक शिवाजी आणि संभाजी यांच्यातही जनरेशन गॅपच होती. फक्त आज आपल्याला ती कळते, त्यांना ती कळली नाही. हांऽऽ, अर्थ वेगळे असतील; रंग निराळे असतील; कधी ती छोटी भेग असेल, कधी ती मोठी दरी असेल. तरी पण—

[ कमळजाबाई गोळी आणि पाण्याचा पेला घेऊन कधीच्या आल्या आहेत. चिंतामणरावांकडे पाहात— ]

**कमळजा :** अहो इतिहासभूषण, हे तत्त्वज्ञान कोणाला सांगताय ? हा चिंतू तर चक्क झोपलेला दिसतोय.

**बिंदुमाधव :** आंऽ ? असं झालं का ? चिंतोबाऽ.... ( हालवून जागा करीत ) झोप लागली का रे तुला ?

**चिंतामणी :** ( दचकून जागा होत ) आं ? नाही नाही....झोप नाही बाबा... मी....मी चिंतन करीत होतो. म्हणजेऽऽ ( डोळे चोळतो. )

**कमळजा :** कळलं. ही गोळी घे; पाणी पी, आणि आत जाऊन अमळ झोप जरा. जेवायची वेळ झाली की मी तुला उठवीन. [ गोळी आणि पाणी देतात. चिंतामणी घेत असताना–] दिवसभर फाइली आणि रात्री जागरण करूनसुद्धा

फाइलीच. जळ्ळया ऽ ऽ मेल्या त्या फाइली....

**चिंतामणी :** ( हुषार होत ) तशी काही मला झोप लागली नव्हती आई...

**कमळजा :** कळलं ऽ! समजलं ऽ! ऊठ आता. [तो उठतो नि आत जाण्यासाठी वळतो, तेवढ्यात–]

[ तेवढ्यात दारावरची घंटा वाजते. तशी– ]

**चिंतामणी :** ( थबकत ) बँकेतून कोणी तरी आलं वाटतं.

**बिंदुमाधव :** कोणीही आलं असलं तरी मी बघून घेईन. तू आता फक्त आराम कर. कमळजाबाई, घेऊन जा आत चिंतूला.

[ कमळजा चिंतामणीला हाताला धरून ओढून नेते. मग बिंदुमाधवराव पुढं होऊन दार उघडतात. तशी गडबडीनं गौरी आत येते. पांढरी स्वच्छ साडी, भगवं पोलकं, केस मोकळे सोडलेले, एकही अलंकार नाही, फक्त गळयात रुद्राक्षांची माळ, आणि लॉकेटमध्ये फुरसुंगीकर महाराजांचा फोटो. ती दिसताच–]

**बिंदुमाधव :** यावं यावं तपस्विनी गौरीदेवी. आज समाधियोग अमळ लवकरच आटोपलेला दिसतो ?

**गौरी :** ( गडबडीनं ) बरं झालं बाबा, तुम्ही घरीच भेटलात. ए ग्रेट डे फॉर अस. पपा नाहीयेत ना घरात ?

**बिंदुमाधव :** पपा आहेत घरातच–

**गौरी :** हरे राम!

**बिंदुमाधव :** पण तब्बेत बरी नाही म्हणून जरा आराम करतोय. पण झालं काय तुला एवढा हर्षवायू व्हायला ? ब्रह्मसाक्षात्कार तर झाला नाही ना ?

**गौरी :** ( दरम्यान हाकारत ) ममी ऽ...ए ममी ऽ ऽ आधी बाहेर ये.

[ "आले ऽ ऽ" असं ओरडून क्षणार्धात सुमंगल आणि पाठोपाठ सावरलेली प्रिया बाहेर येतात; तशी–]

**गौरी :** ( प्रियाला बघताच ) अरे प्रिया ? तू इथं ?

**प्रिया :** मॅचला गेले होते बाबांच्याबरोबर, त्यांनी आग्रह केला म्हणून जेवायला थांबलेय.

**सुमंगल :** काय ग तुझं हे येणं ? उजाडताना पळालीस ती आत्ता उगवतेस होय ?

**गौरी :** ते राहू दे. ममी, बाबा, आज भगवान येताहेत आपल्या घरी, आहात कुठं ? जेवायला येतो म्हणाले!

**सुमंगल :** ( कपाळाला हात लावीत ) कर्म माझं!

**बिंदुमाधव :** भगवान म्हणजे साक्षात भगवान श्रीकृष्ण वसुदेव यादव ?

**गौरी :** असं काय करता हो बाबा ? भगवान प्रेमानंद स्वामी महाराज फुरसुंगीकर.... त्यांना भगवान म्हणायचं. सगळे म्हणतात.

**बिंदुमाधव :** म्हणू की.... देवाधिदेवसुद्धा म्हणतो.

**गौरी** : आणि ते आल्यावर त्यांना वाकून नमस्कार करायचा सगळ्यांनी.

**बिंदुमाधव** : ते मात्र जमणार नाही; उभ्या आयुष्यात—

**गौरी** : तुम्ही नका करू बाबा. तुम्हाला माफ आहे. पण ममी, प्रिया, तुम्ही मात्र—

**सुमंगल** : अग पण भगवान यायचेत केव्हा ?

**गौरी** : अगं आम्ही बरोबरचं आलो की. मी लिफ्टनं वर आले; ते जिन्यानं वर येताहेत.

**बिंदुमाधव** : तेरा मजले जिने चढून येणार हा भगवान ?

**गौरी** : हो. परवा मुंबईत विजेचा गोंधळ झाला ना ? त्या वेळी भगवान दोन तास लिफ्टमध्ये अडकून पडले होते. तेव्हापासून लिफ्ट वापरायचा नाही असं भगवंतांनी ठरवलंय !

**बिंदुमाधव** : तुमचे भगवान हात झटकून अंगारा निर्माण करू शकतात. तसे वीज नाही वाटतं निर्माण करू शकत ?

**गौरी** : बाबा, भगवंतांना सगळ्या सिद्धी प्राप्त आहेत. फक्त असल्या क्षुद्र कामासाठी ते आपली सिद्धी पणाला लावीत नाहीत.

**सुमंगल** : अग पण भगवंतांना वाटेत काही दम बीम लागला तर ? त्यांना एकट्यांना जिने चढायला लावण्यापेक्षा तू—

**गौरी** : अग एकटे का म्हणून ? बरोबर गोप्या येतोय की त्यांच्या.

**सुमंगल** : गोप्या ? अगबाई ! तो कुठं तुम्हाला भेटला ?

**गौरी** : खाली बँकेसमोरच. कंपनी होतीच बरोबर की त्याची नेहमीची. मी ओळख करून दिली तशी भगवंतांनी अंगारा निर्माण करून कपाळाला लावत म्हटलं– 'सुपर स्टार होशील !'

**सुमंगल** : अगबाई, मऽग ?

**गौरी** : मग काय ? भर फूटपाथवर गोप्यानं भगवंतांचे पाय धरले !

**बिंदुमाधव** : चलाऽ, सरनोबतांच्या घरातला आणखी एक बळी !

**सुमंगल** : भगवान आपल्या घरी जेवायचे हे ऐकूनच मला बाई धडकी भरलीय ! भगवंतांना काय आवडतं, काय नाही—

**गौरी** : त्याची तू मुळीच काळजी करू नकोस ममी. खरं म्हणजे भगवान एरवी मुळी कधी जेवतच नाहीत, पण—

**बिंदुमाधव** : जेवत नाहीऽत ? तोबा तोबा ! मग काय भगवान हवेवर जगतात ?

**गौरी** : भगवान कुंडलिनी जागृत करून त्यावर जगतात !

**बिंदुमाधव** : असं भगवान सांगतात आणि तू विश्वास ठेवतेस. बाकी जेवणखाण नाही म्हणजे खाण्यापिण्यानंतरच्या देहधर्माचाही प्रश्न सुटलाच म्हणायचा.

भगवान आंघोळ तरी करतात ना रोज ?

**गौरी :** बाबा, माझ्या श्रद्धेची अशी चेष्टा करू नका !

**बिंदुमाधव :** मी श्रद्धेची चेष्टा करीत नाही गौरी. मी देव मानतो. माणसातलं देवत्वही मानतो. पण अवतारी पुरुष काहीही न खाता पिता टणटणीत तब्येतीनं जगतो यावर विश्वास ठेवणं म्हणजे श्रद्धा नव्हे, निव्वळ खुळेपणा आहे.

**गौरी :** असू दे. मी खुळी आहे असं समजा. ममी, मला एक सांग, आज जेवायचा तू काय बेत केला आहेस ? पुरणाची पोळी ?

**सुमंगल :** ( थक्क होत ) होय ग होय. पुरणपोळीच. पण तुला कसं कळलं ?

**गौरी :** बघ बघ.... ऐका बाबा... आज प्रवचन संपल्यावर भगवान मला म्हणतात— आदिमाये—

**बिंदुमाधव :** तू त्यांची आदिमाया का ?

**गौरी :** ऐका तर खरे....आदिमाये, तुझ्या घरी मी आज पुरणपोळी खायला येणार.

**सुमंगल :** अय्या ऽऽऽ.... खर्रर्रंच म्हणतेस की काय गौरे ? साक्षात्कारच म्हणायचा की ग हा.

**बिंदुमाधव :** काल रात्री जेवायच्या टेबलावर सासूबाई आणि सूनबाई यांची आजच्या जेवायच्या बेताबद्दल मोठी खमंग चर्चा झाली. त्यावरून आज पुरण-पोळी आहे याचा मलासुद्धा काल रात्रीच साक्षात्कार घडला होता.

**गौरी :** ( उसळून ) तुम्हाला काय सुचवायचं आहे, बाबा ?

**बिंदुमाधव :** काही नाही. तू आणि तुझे भगवान दोघेही ग्रेट आहात.

[ तेवढ्यात बाहेर जिन्यात– "झालं... आता या शेवटच्याच पायऱ्या" असे गोस्व्याचे शब्द येतात. तशी–'भगवान आॅले वाॅटतं–' म्हणत लगबगीनं गौरी बाहेर धावते. क्षणार्धात धापा टाकीत, हाशहुश करीत भगवान प्रेमानंदस्वामी फुरसुंगीकर महाराज एक हात गोस्व्याच्या खांद्यावर, दुसरा हात गौरीच्या खांद्यावर ठेवीत येतात. भगवान प्रेमानंद तिशी पस्तिशीतले, गोरेपान– देखणे, रेखीव दाढीमिशा, काळ्याभोर जटा, डोळ्यांवर चष्मा, कपाळावर गंधाचा टिळा, पायघोळ भगवी कफनी, धोतर, पायात खडावा, गळ्यात रुद्राक्षांची माळ, हातात जपमाळ अशा थाटात दिसतात. बोलणे चालणे भारदस्त आणि परिणाम करणारं. गौरी–गोस्व्याच्या आधारानं ते दिवाणावर प्रशस्तपणं बसतात. गौरी तत्परतेनं "काही फार त्रास नाही ना झाला भगवान ?" म्हणत त्यांचा चष्मा काढून, रुमालानं त्यांचं तोंड, मान, गळा पुसते. चष्मा पुसून पुन्हा लावते. मग भगवान हसून म्हणतात—"स्वर्गात जायचं सोडून पुनश्च अवतार घेतला या इहलोकावर, तेव्हाच त्रास मागं लागला. तो टाळून कसं चालेल ? पोहायला पाण्यात पडणाऱ्यानं अंग भिजणार हे धरूनच चालायला हवं...." असं म्हणत मोठ्यानं हसतात. म्हणून मग

गौरी, सुमंगल, प्रिया आणि बिंदुमाधवरावही हसतात. प्रथम सुमंगल येऊन नमस्कार करते. अर्थात वाकून. गौरी सांगते– "भगवान, ही माझी आई..." त्यावर भगवान म्हणातात– "ओ होऽ आमच्या या आदिमायेच्या आपण माताजी तर! धन्य आहात, धन्य आहात!" प्रिया पुढं होऊन वाकून नमस्कार करते; तशी गौरी सांगते– ही प्रियदर्शिनी नाडकर्णी. आमच्या टिटूची मैत्रीण आहे. प्रोफेसर आहे इथल्या कॉलेजात. पण आम्हाला घरच्यासारखीच आहे ती." त्यावर भगवान तिला विशेष रसिकतेनं न्याहाळतात आणि— ]

**भगवान :** छाऽन छाऽन.... तेजस्वी आहे... लावण्यवती आहे.... मायावती, हिच्या मोहक मुद्रेत आम्हाला साक्षात देवी सरस्वतीचा अवतार दिसतो आहे. घेऊन ये हिला आपल्या आश्रमात. तिला तिच्या आत्मस्वरूपाची ओळख करून देणं आमचं कर्तव्य आहे. (लाघवीपणं) ये येऽऽ... मुली ये... अशी इथं आमच्याजवळ बैस.

**प्रिया :** नको. भगवान, मी आहे तिथंच बरी आहे.

**गौरी :** अग भगवानांच्या दृष्टिक्षेपासाठी हजारो भक्तजन महिनेन महिने तळमळत वाट बघत बसतात, आणि तुला पहिल्या भेटीतच त्यांच्या शेजारी बसून हस्तस्पर्शाचा अनुग्रह होतोय, तर नको का म्हणतेस? चल चल.... ये अशी... (तिला ओढू बघते, तोच–)

**बिंदुमाधव :** (तिला निवारीत) राहू दे.... राहू दे गौरी, तुला एक भगवंतांचा अनुग्रह झालाय तो पुरे. अग कोणाकोणाच्या तक्दीरमध्ये भगवंत अनुग्रहाचा अमृतयोग मुळी लिहिलेलाच नसतो.

**गोट्या :** बाबा, भगवानांनी मला अगदी कडाड आशीर्वाद दिलाय.

**बिंदुमाधव :** सुपरस्टार होशील म्हणून!

**गोट्या :** तर काय? गंमत म्हणजे आजच माझी ट्रायल आहे के. आर. के. स्टुडियोमध्ये. नवे चेहरे शोधताहेत वर्माजी आपल्या पिक्चरसाठी. तिकडंच निघालो होतो मी, तर दारातच–

**सुमंगल :** गोट्या, अरे तुझी परीक्षा जवळ आली आणि अभ्यास करायचं सोडून तू हे काय भलभलते उद्योग आरंभले आहेस?

**गोट्या :** आता तू मला बोअर करू नकोस आई. माझा अभ्यास झालाय सगळा. केवढी ऑपर्च्युनिटी आलीय माझ्यापुढं. अग दहा हजार अर्जांतून अडीच हजारांची निवड झालीय, त्यांत माझा नंबर लागलाय, ठाऊक आहे? नुसत्या फोटोवरून....

**बिंदुमाधव :** वुइश यू बेस्ट लक् गोट्या. सूनबाई, जाऊ दे त्याला. त्या अडीच हजारांतला एक होणं म्हणजे काय त्याचा अनुभव घेऊ दे त्याला. जा जा बेटा तू...

**गोट्या :** बाबा, तुम्हीच काय ती माझ्या टॅलेंटची कदर करता. यांची नुसती

लेक्चरबाजीच ऐकून घ्यावी. येतो मी. ( पसार होतो. )

**विंदुमाधव :** ( हसून ) काही नाही, सूनबाई तू काळजी करू नकोस. संध्याकाळी हा त्या सिनेमावाल्यांच्या नावानं ठणाणा करीत परत येईल.

**भगवान :** आदिमाये, हे कोण ?

**गौरी :** भगवान, हे माझे आजोबा. प्रख्यात इतिहासाचार्य विंदुमाधवराव सरनोबत. छत्रपती शिवाजीमहाराजांची खरी जन्मतिथी यांनीच शोधून काढलीय. इतिहासावर खूप पुस्तकं लिहिली आहेत आमच्या बाबांनी.

**भगवान :** असं का ? अरे वा वा वा ! अलभ्य लाभ ! आपण मुक्कामाला नेहमी इथंच असता ?

**विंदुमाधव :** छे छे ऽऽ, कायमचं इथं आम्हाला कोण राहू देतो ? मला चार मुलगे आणि दोन मुली आहेत. दोन दोन महिने एकेकाकडं मुक्काम करावा लागतो.

**भगवान :** हर हर ! म्हातारपणी आपल्यावर ही अशी दारोदार हिंडण्याची पाळी यावी याचं वाईट वाटतं.

**विंदुमाधव :** भलतंच काय बोलता भगवानराव...? अहो ही पाळी आईबाप नकोसे झाले म्हणून मुलांनी आमच्यावर आणलेली नाही. मुलं फार चांगली आहेत माझी. त्यांचं प्रेम तर आहेच आम्हा उभयतांवर, पण आमच्या नातवंडांनी पाळशा लावल्या आहेत आमच्यावर. दोन महिने पुरे झाले एका घरात की दुसऱ्या घरची बच्छडी पकड-वॉरंट घेऊन येतात आम्हाला आपल्या घरी घेऊन जायला.

**गौरी :** भगवान, आम्हा सगळ्या नातवंडांचं फार प्रेम आहे बाबांच्यावर आणि आजीवर. बाबा तर सारख्या गमती जमती करून हसवीत असतात घरादाराला.

**भगवान :** ( थक्क होत ) असं ऽऽ ? बाबा तुम्ही भाग्यवान आहात.

**विंदुमाधव :** खरंय भगवानजी...पण हे भाग्य काही एकाएकी आभाळातून पडलेलं नाहीये. त्यासाठी वृत्तीची साधना केलीय मी.

**भगवान :** वृत्तीची साधना म्हणजे ?

**विंदुमाधव :** भगवानसाहेब—

**भगवान :** तुम्ही मला 'भगवान' नाही म्हणालात तरी चालेल बाबा.

**विंदुमाधव :** असं कसं ? आमच्या या नातीनं सक्त ताकीद दिलीय मला. आणि नातवंडांचा शब्द म्हणजे मला ब्रह्मवाक्य !

**भगवान :** तरीदेखील मी सांगतो—

**विंदुमाधव :** मुद्याची गोष्ट एवढीच आहे की, म्हातारपण सगळ्यांनाच येतं आणि प्रत्येकाला ते पत्करावं लागतंच. ते हसत खेळत कसं पेलावं आणि गोडीनं कसं स्वीकारावं हे मी प्रयत्नपूर्वक शिकलोय. ते शिकवता येत नाही, पण शिकता येतं.

**भगवान :** आपण या साधनेवर एखादा ग्रंथ का लिहीत नाही ?

**विंदुमाधव :** मिस्टर भगवान, ग्रंथ लिहिण्याचे माझे विषय वेगळे आहेत. इतिहासातले. असल्या फालतू विषयावर कोण खरडत बसतो हो ?

**भगवान :** हो हो हो.... तेही खरंच. इतिहास संशोधनातली आपल्या कामगिरीची कीर्ती आम्ही ऐकली आहे. आपले काही ग्रंथही आम्ही चाळले आहेत.

**विंदुमाधव :** उदाहरणार्थ ?

**भगवान :** तो वेगळा विषय झाला. पण भेटीचा योग आज आला. आपण इतिहासाची फार मोठी कामगिरी पार पाडली आहेत. तरी पण ( व्याख्यात्याच्या थाटात ) आपल्यासारख्या साक्षेपी विद्वानांनी, इतिहासातून राष्ट्रवादाची प्रेरणा देणारी, समाजापुढं एक महान, एक भव्य, व्हिजन उभी केली पाहिजे. परवा आम्ही दिल्लीच्या एका इतिहासपरिषदेत हेच सांगितलं होतं. व्हेअर देअर इज नो व्हिजन, द नेशन् पेरिशेस. [ गौरी " वा वा " अशी दाद देते. ]

**विंदुमाधव :** असं कार्लाइल म्हणतो.

**भगवान :** ' म्हणणारा ' महत्त्वाचा नाही, ' म्हणणं ' महत्त्वाचं.

**विंदुमाधव :** भगवानजी, आपल्याला इतिहासशास्त्रात कितपत गती आहे ?

**भगवान :** आत्मज्ञान झालेल्या साक्षात्कारी पुरुषाला सगळ्या शास्त्रात थोडी-फार गती असावीच लागते. इतिहासाबद्दल म्हणाल तर तुमच्या कोणत्याही गहन समस्येचं उत्तर, सिद्धीच्या बळावर, आम्ही इथल्या इथं तात्काळ देऊ शकतो. पण प्रयत्नसाध्य गोष्टीसाठी दैवी सिद्धी वापरू नयेत, असा आम्हाला या आमच्या (पायाशी बसलेल्या गौरीच्या मुखावरून, मस्तकावरून, हात फिरवीत) मायावतीचा आदेश आहे. होय ना आदिमाये ? [ गौरी ' होय भगवान ' म्हणते; तशी— ]

**विंदुमाधव :** कळलंऽ ! भगवंतराव, आमच्या गहन समस्या आम्ही आमच्या मार्गानं सोडवू. पण तुमचा यापुढं काय बेत आहे ? तुम्ही काही कामगिरी करणार आहात, की आत्मज्ञान झाल्यामुळं ज्ञानेश्वरांसारखी जिवंत समाधी घेणार आहात ?

**गौरी :** बाबा, भगवंतांनी एका महान कामगिरीचा संकल्प सोडलाय. भगवान, मी सांगू ना ?

**भगवान :** बोल बोल आदिमाये.... मायावती, तुझ्या मुखातून गुरुदेव स्वामी रामतीर्थच बोलणार आहेत.

**गौरी :** ( उत्साहानं ) बाबा, ती महान कामगिरी म्हणजे, भगवान, ' अखिल विश्वधर्म परिषद ' भरवणार आहेत.

**प्रिया :** विश्वधर्म परिषद ? कुठं ? पुन्हा अमेरिकेत ?

**भगवान** : नाही प्रिये, सरस्वती, अमेरिकेतली ती कामगिरी आम्ही मागल्या जन्मीच पार पाडली नाही का ?

**सुमंगल** : अगो बाई.... म्हणजे मागल्या जन्मी आपणच विवेकानंद का होतात भगवान ?

**भगवान** : छोटी गोष्ट आहे ती, फारच मामुली. त्या वेळी भारताला 'विवेक' आणि अमेरिकेला 'आध्यात्मिक आनंद' यांची ओळख करून द्यायची गरज होती म्हणून आम्ही विवेकानंदांचा अवतार धारण केला होता. आता अण्वस्त्राची धास्ती घेतलेल्या बलाढ्य राष्ट्रांत प्रेमभाव निर्माण व्हावा, या उद्देशानंच आम्ही प्रेमानंद महाराज होऊन अवतरलो आहोत! 'माय अमेरिकन ब्रदर्स अँड सिस्टर्स' म्हणून संबोधल्यावर जसा शिकागोला टाळ्यांचा कडकडाट झाला, तसाच पुन्हा एकदा, 'माय रशियन सन्स अँड डॉटर्स' म्हणून आवाहन करताच रशियन लोकही भारावून मंत्रमुग्ध होणार आहेत. सगळ्या अण्वस्त्रांचा नाश, अखेर आमच्या प्रेमप्रक्षेपणातूनच होणार आहे. काय आदिमाये ?

**गौरी** : (पायावर डोकं ठेवीत ) धन्य धन्य भगवान, आम्ही धन्य आहोत. बाबा, भगवान ही विश्वधर्म परिषद मॉस्कोला भरवण्याच्या खटपटीत आहेत.

**बिंदुमाधव** : वा रे वा ! मॉस्कोला विश्वधर्म परिषद म्हणजे जुम्मा मशिदीत सत्यनारायणाची महापूजाच की! तमाम लालभाईंना जमालगोटाच मिळायचाय. पण भगवंतराव, रशियन सरकार आणि लोक तुम्हाला साथ, सहकार्य देतील का ?

**भगवान** : प्रेमप्रक्षेपण चालू आहे. आज ना उद्या फळ येईलच.

**बिंदुमाधव** : त्यापेक्षा भगवानजी, मला असं वाटतं, तुमच्या प्रेमप्रक्षेपणाचा रोख तूर्त तरी आशियापुरताच ठेवावा. म्हणजे रंगीत तालीम म्हणून ही विश्वधर्म परिषद, प्रथम तेहरान म्हणा, इस्लामाबाद किंवा त्यापूर्वी छोट्या प्रमाणावर, भिवंडी किंवा मालेगाव, इथं भरवून पाहावी. माणसं कितपत प्रेमाची भुकेली आहेत त्याचा अंदाज तरी येईल. काय मायादेवी ? 'वा वा' म्हणा की !

[ तोच दारावर घंटा वाजते. तशी बिंदुमाधवराव पुढं होऊन दार उघडतात. तो 'हाई बाबा–' म्हणत टिट्टू आत येतो. पाठोपाठ शिवाजी जाधव आत येतो. दोघेही क्रिकेटपटूच्या वेशात. शुभ्र पँट, शर्ट आणि ब्लेझरचा कोट. आजोबांचा हात हाती घेत दारातच टिट्टू विचारतो–"काय यार, लेगची सिक्सर कशी काय ठोकली ?" आजोबा म्हणतात– 'फँटास्टिक !' ]

**सुमंगल** : (पुढं येत) तुला खोटा आऊट दिला ना रे टिट्टू ?

**टिट्टू** : कोण म्हणतं असं ? मी चक्क आऊट होतो. आणि ममी, अंपायरच्या निर्णयावर मी कधीही टीका करीत नाही. अरे वा.... प्रिया, तू इथं ? व्हॉट अ सरप्राइज ! हाइ गौरी. (भगवंतांना पाहून) गुड गॉड ! साक्षात खुद्द भगवान आपल्या घरात ?

**गौरी :** मीच घेऊन आलेय त्यांना.

**विंदुमाधव :** आज आपल्या घरात प्रीतिभोजनाचा बेत ठरवलाय.

**टिट्टू :** प्रीतिभोजन ? म्हणजे ?

**विंदुमाधव :** ज्यांची तोंडं कधीही एकमेकांकडे नसतात, अशी चमत्कारिक माणसं, जेव्हा योगायोगानं एका पंगतीत जेवायला जमतात, तेव्हा त्याला प्रीतिभोजन म्हणतात!

**टिट्टू :** हे मात्र खरंय. उदाहरणार्थ, मी आणि प्रिया.

**प्रिया :** माझं तोंड तुझ्याकडंच असतं. पण तुझं कुठं असतं ?

**विंदुमाधव :** त्याला रावणासारखी दहा तोंडं,– ती दहा दिशांना!

**प्रिया :** आणि काय रे, पूर्वी आपण एकत्र कधी जेवलो नाही काय ?

**टिट्टू :** आठव, आठव; किती युगं लोटली त्याला... आजसुद्धा तू काही माझ्यासाठी आलेली नाहीस. बाबांनी तुला बोलावलं म्हणून आलीस. एरवी मी बोलावतो तेव्हा येतेस कधी ?

**प्रिया :** ज्या माणसांना आपली किंमत आहे त्यांच्यासाठी यायचं. मवाशी बाबांच्याबरोबर मी पॅव्हेलियनमध्ये आले होते त्या वेळी बघायलासुद्धा तयार नव्हतास तू आमच्याकडे–

**टिट्टू :** हा–हा मात्र गैरसमज आहे हं. अग, तुम्ही आलात तेव्हा माझ्याभोवती लोकांचा केवढा गराडा पडला होता ते—

**प्रिया :** लोकांचा नव्हे, मुलींचा.

**टिट्टू :** मुलंसुद्धा होती त्या गराड्यात.

**प्रिया :** ती आपली तुरळक...तुरळक...इन्सिडेन्टली, मवापासून तुला दोन तीन फोन येऊन गेले...तुझ्या खास मैत्रिणींचे....

**विंदुमाधव :** हो हो, आले होते बुवा.... नेहमीच्या जागी भेटायला येणार आहेत त्या तुला. एक मीनाक्षी घटिंगण, दुसरी कमल कुलकर्णी, आणिक—

**टिट्टू :** हे पाहा, माझी कोणी खास मैत्रीण नाही की भेटायची खास जागा नाही.

**प्रिया :** असं कसं ? सगळं काही ठरलं असल्याशिवाय उगाच बरे असे फोन येतील ?

**टिट्टू :** हे बघ, प्रिया, मलासुद्धा तुझ्या मित्रांची यादी सादर करता येईल. किती तरी वेळा मेट्रोला आणि लिबर्टीला मित्रांच्या तांड्याबरोबर पाहिलीय मी तुला.

**प्रिया :** हो; माझे कॉलेजमधले कझीन्जच होते ते. एकऱ्यादुकऱ्या पुरुषमित्राबरोबर नव्हते आले मी कधी.

**सुमंगल :** इतक्या दिवसांनी भेटताय तुम्ही दोघं, जरा गोडीत बोला की रे....हे काय मेलं घालून पाडून बोलायचं!

**टिट्टू :** अग हे काही भांडण नाहीये ममी.

**विंदुमाधव** : आणि प्रीतिभोजनापूर्वी थोडंसं भांडण व्हायलाच लागतं. ओ के...ओके. ही चर्चा पुन्हा केव्हा तरी खाजगीत करा. तुझ्या मित्राची ओळख तरी करून देशील की नाही ?

**टिट्रू** : सॉरी ! बाबा, या प्रियाच्या नादात विसरलोच मी.

**प्रिया** : बघा बघा,– कसा बोलतोय तो. प्रियाच्या नादात म्हणे.

**टिट्रू** : शिवाजी, ये की रे. बैस इथं. हा शिवाजी जाधव आमच्या टीममधला प्रख्यात फिरकी गोलंदाज. आणि शिवबा, ही माझी खास आवडती मैत्रीण प्रोफेसर प्रिया नाडकर्णी. ही माझी ममी. हे आमचे जानी दोस्त आजोबा आणि ही—

**शिवाजी** : मायादेवी !

**टिट्रू** : मायादेवी ? व्हॉट नॉन्सेन्स ! अरे ही माझी बहीण गौरी !

**गौरी** : ते म्हणतात ते खरंय दादा. भगवानांच्या आश्रमात सगळे मला आदि-माया किंवा मायादेवी म्हणून ओळखतात. तुम्ही भगवानांच्या प्रवचनाला नेहमी येता, नाही का ?

**टिट्रू** : हा आणि प्रवचनाला ? आश्रमात ? तू दुसऱ्या कोणाला तरी पाहिलं असशील.

**शिवाजी** : नाही टिट्रू. त्या म्हणतात ते बरोबर आहे. मीच जातो प्रवचनाला सवड होईल तेव्हा.

**टिट्रू** : कमाल आहे यार. हे–हे अंग केव्हापासून धरलंस बाबा तू ?

**गौरी** : ते धरावं लागत नाही दादा, मूळचंच असावं लागतं. प्रवचनानंतर ते जे प्रश्न विचारतात ते किती अभ्यासपूर्ण आणि मार्मिक असतात, नाही का भगवान ?

**भगवान** : ( डोळे मिटलेले, अमल घुश्यातच ) हूंऽऽ !

**शिवाजी** : भगवानांच्या ऐवजी तुम्ही कधी कधी प्रवचनं करता, तीसुद्धा फार गोड असतात. खरं म्हणजे यापूर्वीच तुमची भेट घेऊन अध्यात्मावर मला तुमच्याशी खूप चर्चा करायची होती.

**गौरी** : मग का नाही भेटलात ? दुपारची मी मोकळीच असते.

**शिवाजी** : एक तर तुमची ओळख नव्हती; शिवाय—

**टिट्रू** : काय अजागळ आहेस रे. पुढं घुसून ओळख काढायची.

**प्रिया** : निदान या बाबतीत तरी टिट्रूला गुरू करायचात.

**टिट्रू** : बरोब्बर बोललीस. तुझी ओळख मी कशी करून घेतली पाहिल्यांदा हे लक्षात आहे ना ? कम ऑन....हात मिळव...बी फ्रेंड्स् नाऊ ऑन.

[ शिवाजी हात पुढं करतो, गौरी हस्तान्दोलन करते. त्याच वेळी भगवान डोळे उघडतात आणि— ]

**भगवान :** ( जरबेनं ) हात सोड आदिमाये. तुझ्यासारख्या योगिनीला परपुरुषाचा हस्तस्पर्श विषसमान आहे!

**बिंदुमाधव :** गौरीनं तुमचं तोंड पुसलेलं चालतं वाटतं भगवानजी ?

**भगवान :** आम्ही गुरू म्हणजे साक्षात परब्रह्म. आम्हाला स्पर्श म्हणजे ब्रह्मांड उजळणाऱ्या प्रत्यक्ष तेजोनिधीला स्पर्श. स्पर्शसाक्षात्कार काय चीज आहे, ते तुम्हाला साधनेवाचून कळायचं नाही, इतिहासाचार्य. पण मायादेवी, तुझी साधना मात्र कमी पडतेय. तरुण पुरुषांच्या स्नेहसंबंधाबद्दल दक्ष राहा. हा मोह आहे मोह. यापुढं तू कोणत्याही तरुणाशी आमच्या अनुज्ञेवाचून कसलीही बातचीत करायची नाही एवढ्यासाठी. तू आश्रमात कायमची राहायला ये म्हणून मी—

**टिट्टू :** व्हॉट नॉन्सेन्स ! अहो भगवान, तुम्ही कोणत्या युगात वावरताहात ?

**प्रिया :** आणि गौरीनं कोणत्याही तरुणाशी बोलायचं नाही असा तिला हुकूम फर्मावणारे तुम्ही हो कोण ? गौरी काय गुलाम आहे तुमची ?

**भगवान :** ( भडकून ) साक्षात भगवानांच्यासमोर ही पाखंडी उद्धट भाषा ?

**गौरी :** रागावू नका भगवान. ही अडाणी माणसं आहेत. त्यांना तुमची साक्षात्कारी थोरवी आणि सिद्धिसामर्थ्य ठाऊक नाहीये. टिट्टू दादा, प्रिया, तुम्ही भगवंतांची क्षमा मागा. त्यांच्या पाया पडून चुकलो म्हणा.

**प्रिया :** मी मुळीच म्हणायची नाही.

**टिट्टू :** पण कशाबद्दल ? तुझा एक मूर्खपणा चाललाय तेवढा रगड झाला. शिवाजीनं तुझ्याशी हस्तान्दोलन केलं म्हणजे काही विनयभंग तर नाही ना केला तुझा ?

**सुमंगल :** जाऊ दे ना आता. टिट्टू, कशाला वाद वाढवतो आहेस तू ?

**भगवान :** अरे अरे अरे ! ही– ही असली पापी, पाखंडी आणि पशुवत माणसं पाहिली की या आर्यावर्ताबद्दल चिंता वाटू लागते.

**टिट्टू :** अहो भगवान, तुमच्या फोटोचे लॉकेट गळ्यात घालून भगव्या कफनीत शहरभर धुमाकूळ घालणारे तुमचे शिष्य आणि शिष्यिणी काय काय प्रताप गाजवताहेत, ते जाऊन पाहा जरा. मग पाप, पाखंड आणि पशुवत वर्तन कुठं चाललंय ते—

**गौरी :** थांब दादा ! तू एक अक्षर बोलू नकोस. माझी शपथ आहे तुला.

**भगवान :** आम्ही शाप दिला तर काय प्रलय होईल ठाऊक आहे तुम्हाला ? ही उभी इमारत बॉम्ब पडावा तशी जमीनदोस्त होईल. तुम्ही सगळे एकजात ढिगाऱ्याखाली जिवंत गाडले जाल. बोला, देऊ शाप ?

**टिट्टू :** ( भडकून ) होऊनच जाऊ द्या ! च्या मारी ! देऊन टाका शाप ! आम्ही एक ढिगाऱ्याखाली जिवंत गाडले जाऊ. पण तुमचं तरी काय होणार आहे ? का

भगवान विष्णू गरुड घेऊन येणार आहेत तुम्हाला वरच्यावर उचलायला ?

**गौरी :** ( रडत भगवानांचे पाय धरीत ) भगवान, क्षमा करा.... दया करा.... यांची बोलणी ऐकून महाकोप भडकू देऊ नका. माझ्याकडं पाहून राग गिळा... मी पाय धरते...मूळ चूक माझी आहे. मी क्षमा मागते. मी वचन देते तुम्हाला...पुन्हा कोणत्याही परपुरुषाशी—

**सुमंगल :** ( धावून तिला जवळ घेत ) वेडी आहेस की काय गौरी तू ? अग भलभलती वचनं काय देतेस ? भगवान, मी प्रार्थना करते. झालं गेलं विसरावं आणि आता जेवायला उठावं.

**भगवान :** ( रागानं उठत ) मुळीच जेवणार नाहीये मी इथं. आदिमाये, आपण निघतो आहोत.

**गौरी :** (पाय धरीत) नाही नाही. भगवान, आमच्या घरातून तुम्हाला मी अशी उपाशीपोटी नाही जाऊ द्यायची. ( पायावर डोकं ठेवून अश्रू ढाळीत ) क्षमा.... क्षमा... भगवान! क्षमा केल्याशिवाय हे पाय मी सोडायची नाही.... ( हुंदके देऊन रडते; तशी– )

**टिट्टू :** धिस इज सिली. अटर नॉन्सेन्स.

**सुमंगल :** तू आता गप्प बसायला काय घेशील टिट्टू ? बाबा, तुम्ही तरी सांगा काही याला...

**विंदुमाधव :** हो हो, सांगतो. विचार असा येतोय भगवानराव, की खरोखरच तुमच्या शापात बॉम्बचा एवढा दणका असेल, तर तुम्ही भारतीय संस्कृतीच्या संरक्षणासाठी, सैन्याला मदत का करू नये ? म्हणजे आम्हा नागरिकांना दमदाटी करण्यापेक्षा, एक ऑक्झिलियरी फोर्स म्हणून, सैन्याला मदत करावी. गनीमाचा हमला आला रे आला की शाऽप! की धुमधडाड....धुम् धडाड! खल्लाऽऽस!

**भगवान :** ( खवळून ) इतिहासाचार्य, तुम्ही आमच्या सिद्धीची थट्टा चालवली आहेत, पण याद राखा—

[ तेवढ्यात " काय झालं ? काय झालं ? जेवायच्या वेळेला कोणी कसलं भांडण काढलं ? " विचारीत पदराला ओले हात पुसत कमळजाबाई येतात. गौरीला स्वामीजींचे पाय धरून रडताना पाहून धावून, " काय ग झालं माझ्या सोनीला ? " असं जवळ घेत म्हणतात. तशी– ]

**गौरी :** आजी, हे भगवान रागावून परत जायला निघालेत. टिट्टूदादा आणि बाबा काय काय बोलले ग त्यांना.

**कमळजाबाई :** हूंऽ. आलं माझ्या लक्षात. सगळं लक्षात आलं. टिट्याऽ, मेल्या मला म्हातारीला पावसापाण्याची मॅच बघायला नेलीस आणि पुरत्या शंभर धावा तुला काढता आल्या नाहीत! अठ्याण्णव धावांवर औट झालास ? शरम वाटायला हवी तुला.

**टिट्टू :** त्याचं काय झालं आजी—

**कमळजाबाई :** काही सांगू नकोस मला. घरात आलेल्या साधुपुरुषांचा असा अपमान करतोस त्याची ही फळं भोगावी लागतात तुला. आणि यांना तर कोण बोलणार ? चेष्टामस्करी केलीत वाटतं पुन्हा ? तुमची मुद्राच सांगतेय. साधुसंत आणि देवांनादेखील सोडू नका मोकळे. भगवान, काही करून यांचं हसणं बंद करा हो. झोपेतदेखील खुदूखुदू हसतात.

**बिंदुमाधव :** अग भगवान कशाला, तुझ्या वडिलांच्या तालमीत तयार झालेली तुझी भावंडं माझ्यावर सोड, आठ दिवसांत माझा चिन्तातूर जन्तू करून सोडतील सगळे मेव्हणे नि मेव्हण्या !

**कमळजाबाई :** पुरेऽऽ! भगवान, मी प्रार्थना करते. झालं गेलं विसरावं आणि आता जेवायला चलावं. आपल्यासाठी मी आल्या आल्या तुपात तळलेल्या पुरणाच्या पोळया केल्यात चुलीशी खपून.

**भगवान :** असंऽ ? तर मग माताजी, केवळ तुमच्यासाठी या क्षुद्र, पोटार्थी, अडाणी पामरांचे अपराध आम्ही पोटात घालतो आहोत, आणि त्यांना क्षमा करतो. चल आदिमाये, आधी भोजनप्रबंध.

**कमळजा :** चला आता. पानावर बसून सगळ्यांनी गुण्यागोविंदानं जेवायचं. कोण्णी कोणाची उणीदुणी काढायची नाहीत. ( बिंदुमाधवरावाकडे पाहात ) खासकरून तुम्हाला सांगते, थट्टा– विनोद– मस्करी– बंद. तुमच्यासाठी मी स्पेशल स्वीटेक्स घालून पुरणाची पोळी तयार केलीय–

**बिंदुमाधव :** ( थक्क होत ) स्वीटेक्स घालून पुरणाची पोळी !

**कमळजा :** हो. एक नवा प्रयोग केलाय मी. तुम्हाला गोड वर्ज्य आहे ना–

**बिंदुमाधव :** अहो वर्ज्य तुम्ही ठरवलं आहेत पण एखादे वेळी तरी—

**कमळजा :** पण या वयात एखादे वेळी तरी कशाला कुपथ्य करायचं ? आधी स्वीटेक्सची पुरणपोळी खाऊन बघा आणि मग बोला, चला.

[ कमळजाबाई तरातरा जातात. पाठोपाठ भगवान गौरीचा हात हातात घेऊन जातात. सुमंगला जाऊ लागते, तोच–]

**बिंदुमाधव :** सूनबाई...जस्ट अ मिनिट...इकडं ये. सांगायचं म्हणजे—

**सुमंगल :** बाबा, माझ्या लक्षात आहे. साईचं दही दुधात मिसळून देणार आहे मी तुम्हाला.

**बिंदुमाधव :** सगळं चुपचाप झालं पाहिजे. माझ्या पानात अस्सल गूळ घातलेली पुरणपोळी पडली पाहिजे. स्वीटेक्सची पोळी घाल त्या भगवंताला. हूंऽऽ कोण बघतोय !

**सुमंगल :** ते सगळं मी बघून घेते. चला आधी आत. ( जाते. )

**बिंदुमाधव :** छत्रपती शिवाजीराजे, तुम्ही त्या भगवान स्वामीचा हुकूम मना-

वर घेऊ नका हो.

**शिवाजी :** म्हणजे ?

**बिंदुमाधव :** म्हणजे गौरीला वरचेवर भेटत जा. भगवंतांची मुळी पत्राज बाळगायची नाही. अगदी त्यांच्या नाकावर टिच्चून मनसोक्त चर्चा करीत जा. काय ? अध्यात्माची चर्चा करा.

**प्रिया :** वा बाबा, छान सल्ला देताय की त्यांना !

**बिंदुमाधव :** तुलाही कधी तरी सल्ला देणार आहे. पण त्याला वेळ आहे.

[ तेवढ्यात चिंतामणराव डोळे चोळत येतात आणि— ]

**चिंतामणी :** बाबा, तो फुरसुंग्या थेट घरात कसा घुसला ? जेवायच्या टेबलापाशी बसलेला पाहिला मी त्याला.

**बिंदुमाधव :** आज त्यांच्या सन्मानार्थ प्रीतिभोजनाचा कार्यक्रम आहे.

**चिंतामणी :** प्रीतिभोजन म्हणजे ?

**बिंदुमाधव :** लवकरच कळेल तुला. आत्ताच इथं त्याचा पहिला अध्याय आटोपला.

**चिंतामणी :** बरा भेटलास टिट्टू. अरे रिझर्व बँकेकडे पाठवायचं ते स्टेटमेन्ट तयार केलंस का तू काल ? [ टिट्टू मानेनं नाही म्हणतो, तशी– ] पाहिलंत बाबा, कसा मुलगा आहे हा ! कशी कामं करायची आम्ही ? तरी मी तीन तीनदा बजावलं होतं याला की—

**बिंदुमाधव :** अरे या गोष्टी विचारायची ही वेळ आहे का ? अरे मॅचबद्दल काही बोल. पोराचं थोडं कौतुक कर... थोडं चियरअप कर त्याला... तुला हे कधी कळायचं चिंतोबा ?


**चिंतामणी :** आता आणखी तुम्ही आमची चंपी करा त्याच्यासमोर.

**टिट्टू :** पपा, आज ग्राउंडवर काय घडलं ते ते तुम्हाला ठाऊक आहे ? मॅच खेळताना नको त्या क्षणी स्टेटमेन्टची मला आठवण झाली. तुम्ही कसे भडकाल तेही आठवलं. त्यामुळं माझं कॉन्सेन्ट्रेशन गेलं. परिणाम ? माझी विकेट पडली, अठ्याण्णव रन्सवर !

**चिंतामणी :** ध्याऽऽ... म्हणजे त्याचं खापर पुन्हा माझ्याच डोक्यावर.

[ सगळे फ्रीज होतात आणि त्याच वेळी—पडदा ]

**अंक पहिला संपला**



अंक दुसरा

# अंक दुसरा

# अंक दुसरा

[ सुमारे पंधरा दिवसांनंतरची एक सायंकाळ. तोच हॉल. हॉलमध्ये एका आरामखुर्चीवर बिंदुमाधवराव प्रशस्तपणं पाइप स्वच्छ करीत, तंबाखूनं भरीत बसले आहेत. दुसऱ्या एका आसनावर नानू ऊर्फ सदा येवलेकर थ्रिल होऊन ऐकतोय आणि फिल्मी जोषात त्या दोघांना गोट्या आपली बहादुरी ऐकवतो आहे. ]

**बिंदुमाधव** : आच्छा आच्छा ! आणि मग पुढं ?

**नानू** : पुढं काय विचारता बाबा, गोट्यानं धडाधड डायलॉग फेकले. सगळे गप्पगार !

**गोट्या** : अख्खा सीन मी एकट्यानं एकपात्री प्रयोगासारखा उभा केला. सोमू नाथवानी तर चाटच झाला.

**नानू** : मोठमोठ्या स्टार सुपर-स्टारांची हा पठ्ठ्या एक दिवस सुट्टी करणार म्हणायला लागला.

**गोट्या** : अरे तेवढ्यानं काय झालंय यार... नव्या प्रॉडक्शनमध्ये माझ्यासाठी एक मस्त रोल टाकायला स्क्रिप्ट रायटरला तिथल्या तिथं फर्मावलं त्यानं.

**बिंदुमाधव** : पण बेटा, सगळ्यांना चाट, गप्पगार करणारे तू डायलॉग फेकलेस म्हणजे नक्की काय केलंस ? या फेकाफेकीची कुछ झलक तो दिखाव.

**गोट्या** : ( फुशारकीनं ) त्याचं काय आहे बाबा.... त्याला मूड यायला लागतो. नाही म्हणजे—

**नानू** : अरे दोस्त क्या बकवास चल रहा है. लगाव बत्ती.... मूड अभी के अभी आयेगा.

**गोट्या** : ( खुलून ) काय सांगावं बाबा.... जोहभाईनं मला सवाल टाकला मात्र... मी हा असल्या जागेवरून तीन ताड उडालो ( उडी घेत ) आणि पहिला डायलॉग फेकला—

[ आणि गोट्याचा एकपात्री प्रयोग सुरू होतो. ]

**गब्बार** : अरे ओऽ सांबा ! कितना इनाम रखे है सरकारने हमपर ?

: पुरे पचास हजार !

: सुना ? पूरे पचास हजार !.... और ये तीन हरामजादे, ये गब्बारसिंग का नाम पूरा मिट्टीमें मिलाके आये. उसकी सजा मिलेगी. बराबर मिलेगी. ( कमरेचे पिस्तुल उपशीत ) कितनी गोली है इसका अंदर ?

**बिंदुमाधव** : गोऱ्या, अरे हे पिस्तुल ?

**गोऱ्या** : ते डमी आहे. माझा मूड घालवू नका हो बाबा.

**बिंदुमाधव** : ठीक ठीक.... चालू दे.

**गोऱ्या** : कितनी गोली है अंदर ?

: छे, सरदार.

: छे गोली और आदमी तीन! बहोत बेइन्साफी है. ( पिस्तुल छतावर रोखीत तोंडानंच आवाज करतो. ' ढिशाव.... ढिशाव.... ढिशाव ' अब ठीक आहे. अब इसके तीन खानोमे गोली है, तीन खाली. अब हम इसको घुमायेंगी. ( पिस्तुल हालवतो ) अब गोली कहा है, कहा नही, हमको नही पता. इस पिस्तोलमे तीन जिंदगी और तीन मौत बंद है. देखे किसे क्या मिलते है. ( पिस्तुल सरळ बिंदुमाधवरावांवर रोखतो; तशी— )

**बिंदुमाधव** : ( पाइपसकट हात वर करीत ) बचाव... बचाव सरदार.

**गोऱ्या** : ( पिस्तुलाचा चाप ओढताच क्लिक आवाज तोंडानं काढीत ) बच गया साला.

**बिंदुमाधव** : ए बेऱ्या, अरे मला ' साला ' म्हणतोस की काय ?

**नानू** : बाबा, असं काय करता ? तो डायलॉग फेकतोय.

**बिंदुमाधव** : हां हां, विसरलोच. ठीक. फेको.... फेक दे वो साले डायलॉग.

**गोऱ्या** : (नानूकडे वळून) अब तेरा क्या होगा कालिया ?

**नानू** : (रंगात येऊन उठून घाबरल्याचं नाटक करीत) सरदार, मैने आपका नमक खाया है.

**गोऱ्या** : अब गोली खा. (पिस्तुल झाडतो. पुन्हा क्लिक आवाज) अरे कमाल हो गया.

**बिंदुमाधव** : (रंगात येऊन) वो भी बच गया साला. अभी क्या होगा सरदार ?

**नानू** : नाही नाही बाबा, डायलॉग वेगळा आहे.

**गोऱ्या** : चूप! बीच मे मत बोलो. (पुन्हा पोज घेतो.) जो डर गया समजो मर गया. होली कब है ? (हसतो.) कब है होली ?

**बिंदुमाधव** : काही कल्पना नाही बुवा! कॅलेंडरमध्ये—

**नानू** : बाबाऽऽ—

**बिंदुमाधव** : हा हा, सॉरी— डायलग!

**गोऱ्या** : (नाटकी हसत) कब है होली ?

[ जोरजोरात हसतो. मग एकदम ' कोई नही बचेगा ' असे किंचाळत पिस्तुल प्रथम बिंदुमाधवराव, मग नानू आणि शेवटी बाहेरच्या दाराकडं रोखून " ढिशाव.... ढिशाव.... ढिशाव " असा आवाज काढतो. बिंदुमाधवराव गमतीनं पाहात पाइप पेटवू बघतात. नानू ' आऽऽ ' करून फिल्मी किंचाळत आडवा

तिडवा कोसळतो. त्याच वेळी दार उघडून चिंतामणराव येतात. तेही हे बघून आणि रोखलेले पिस्तुल आणि 'ढिशाव' ऐकून "मेलोऽऽ कारट्यानं गोळी घातली वाटतं मला!" असे किंचाळत मटकन डोळे मिटून बसतात. ]

**बिंदुमाधव :** (धावून जात) अरे घाबरू नकोस.... डोळे उघड चिंतामणी.... ते पिस्तुल खरं नाहीये. नुसता तोंडानं ढिशाव केला गोट्यानं.

**चिंतामणी :** नुसता तोंडानं ढिशाव? असं कसं होईल? तो-तो येवलेकर बघा जखमी होऊन किंचाळत कोसळला—

**नानू :** (उठत) नाही नाही.... ते ते... ॲक्टिंग... ॲक्टिंग केलं मी.

**चिंतामणी :** ॲक्टिंग काऽय? म्हणजे डुकरासारखं ओरडत विवळत तुम्ही जे आडवे तिडवे होऊन कोसळलात ते ते सगळं—

**नानू :** एकदम नाटक... केवळ गोट्याला साथ करण्यासाठी.

**बिंदुमाधव :** अरे या गुडघ्याएवढ्या पोरांना अस्सल रिव्हॉल्व्हर कसा मिळेल?

**चिंतामणी :** त्याचा काही नेम सांगू नका बाबा. हे सगळे जेम्स बॉंड के बच्चे पार तडीला पोचलेले आहेत. मागल्या खेपेला हे चिरंजीव आमच्या पार्श्वभागी लाथ हाणून घराबाहेर काढायला निघाले होते. या खेपेला बापाची जगातूनच उचलबांगडी करायचा बेत—!

**गोट्या :** नाही हो पपा. हे पिस्तुल तरी पाहा. दिवाळीच्या फटाक्यातलं पिस्तुल आहे हे. आणि ढिशावबद्दल म्हणाल तर मी तोंडानं पुन्हा काढून दाखवतो आवाज. (आवाज काढतो.) ढिशाव... ढिशाव.... ढिशाव!

**चिंतामणी :** हूंऽऽ! नकला करण्यात आपला कोण हात धरणार? काय चालला होता उद्योग आपला?

**गोट्या :** बाबांना मी गब्बारसिंगचा प्रवेश करून दाखवत होतो एक.

**नानू :** गब्बारसिंगचे डायलॉग काय फेकतो म्हणता गोट्या पपा. आऽहा! एकदम कडाड.

**चिंतामणी :** अस्सं ऽ! प्रत्यक्ष आयुष्यात तुम्ही दोघांनी गब्बारसिंग व्हायचं ठरवलं असेल बहुतेक? तळमजल्यालाच बँक आहे. बाप मॅनेजर आहे. घाला एक दिवस डाका.

**बिंदुमाधव :** काही तरीच काय बोलतोस रे चिंतामणी?

**चिंतामणी :** बाबा, मी अगदी बरोबर बोलतोय. चोवीस तास अष्टौप्रहर सिनेमा भरलाय या पोराच्या टाळक्यात. अभ्यासाच्या नावानं बोंब.

**गोट्या :** नाही हो पपा, मी... मी अभ्यास संभाळूनच सगळं—

**चिंतामणी :** अभ्यास संभाळून काय? प्रिलिमिनरीचा आज निकाल होता नाही का तुमचा? काय येवलेकर?

**नानू :** हो हो... तिकडंच निघालो होतो आम्ही.... म्हणजे मी.... (मागं

सरत दारातून पसार होतो, तशी– )

**चिंतामणी** : पळाला ! कॉवर्ड ! हे याचे मित्र. मित्र कसले ? चमचे ! मिस्टर गब्बारसिंग, आपला काय अंदाज आहे परीक्षेच्या निकालाबद्दल ?

**गोट्या** : ( आवंढा गिळत ) म्हणजे... म्हणजे.... परीक्षेच्या निकालाबद्दल म्हणता ?

**चिंतामणी** : हो हो, परीक्षेच्याच निकालाबद्दल. मी काही तुम्हाला तुमच्या फिल्म कंपनीतल्या इंटरव्ह्यूचा निकाल विचारीत नाहीये.

**गोट्या** : ( चाचरत ) प.... पास होईलसं वाटतंय... स....सगळ्या विषयांत... ब.... ब.... बहुतेक.

**चिंतामणी** : अस्सं ऽ !

**गोट्या** : ( लगबगीनं ) म.... मी निकालाचं कार्ड घेऊन येतो पपा. ( जाऊ लागतो. )

**चिंतामणी** : थांबा. थांबा गब्बारसिंग.... एवढी तसदी घेऊ नका. ( खिशातून कार्ड काढीत ) हे आपल्या निकालाचं कार्ड. प्राचार्यांनी हँड डिलिव्हरीनं मुद्दाम धाडलंय माझ्याकडं. शिवाय फोन करून आमची बिनपाण्यानं चंपी केली ती वेगळीच. निकाल ऐकायचाय आपल्याला ? ऐका. इंग्लिश— ढिशाव ! मॅथ्स— ढिशाव ! सायन्स— ढिशाव ! बाकी उरलेल्या विषयांत—

**बिंदुमाधव** : बच गया साला !

**चिंतामणी** : या निकालाबद्दल गब्बारसिंग, आपल्याला काय म्हणायचंय ?

**गोट्या** : ( शरमिंदेपणानं खाली पाहात ) पपा, इंग्लिशचा पेपर भयंकर अवघड काढला होता परीक्षकांनी.

**चिंतामणी** : ( उपरोधानं ) असं का ? पेपर अवघड होता ?

**गोट्या** : आम्ही ऑपशनमध्ये टाकलेल्या पोर्शनवरच प्रश्न विचारले सगळे. मी ' हंड्रेड लाइकली क्वेश्चन्स अँड अॅन्सर्स ' पुस्तक अगदी तोंडपाठ करून गेलो होतो.

**चिंतामणी** : म्हणजे गाइड पाठ करून गेला होता. का खिशात दडवून गेला होता ? मॅथ्सबद्दल ?

**गोट्या** : मॅथ्सच्या सरांची माझी खात्री आहे. म्हणजे मी गॅदरिंगला त्यांची नक्कल केल्यापासून. " तुला वन्समोर देतो की नाही ते बघच " अशी उघड उघड धमकी दिली होती त्यांनी मला.

**चिंतामणी** : तेच तेच.... म्हणजे पुन्हा नकला, नाटकं आणि चारगटपणा. सायन्सबद्दल ?

**गोट्या** : त्यांची मी ट्यूशन धरली नाही म्हणून त्यांनी काटा काढला !

**चिंतामणी** : अहो राजे, प्रयोगशाळेत तुम्ही सतत गैरहजर राहिलात आणि–

**गोट्या :** त्याला मी जबाबदार नाही पपा. यूथ फेस्टिव्हलसाठी एकांकिका मी बसवली, ती पहिली आली; म्हणून मग फायनलची तयारी.... त्यानंतर गॅदरिंगचं नाटक, मग संस्थेच्या ज्युबिलीसाठी सांस्कृतिक कार्यक्रम....

**चिंतामणी :** अरे वा वा वा.... मग तुम्हाला अभ्यासाला वेळ कोठून मिळणार ? बाबा, ऐकून ठेवा या पोराची ही उत्तरं. आता राजे, एकच सांगा, भूगोलात तुम्हाला शंभरापैकी शहाण्णव मार्क पडलेत हा चमत्कार कसा काय झाला ?

**गोट्या :** मी खरंच सांगतो पपा; मी कॉपी केली नाही. तुमच्या गळ्याशपथ—

**चिंतामणी :** माझा गळा कापायसाठीच तुम्ही अवतरला आहात. तेव्हा शपथा वगैरे न घेता प्रकार काय घडला ते सांगा. तुमच्या प्राचार्यांना उद्या मला उत्तर द्यायचंय.

**गोट्या :** पपा, खरं तेच सांगतो. भूगोलाचा पेपर आधीच फुटला होता.

**चिंतामणी :** त्यामुळं एका रात्रीत तुम्ही शहाण्णव टक्के विद्वान झालात. फुटलेला पेपर तुमच्यापर्यंत कसा आला ? बोला, कसा आला ? ( गोट्या तोंडातल्या तोंडात पुटपुटतो तशी, आवेशानं ) आय वॉंट द ट्रुथ... नथिंग बट द ट्रुथ...

**गोट्या :** पेपर मी पाच रुपयांना विकत घेतला. सगळ्यांनीच घेतला.

**चिंतामणी :** कोणाकडून ? बोल कोणाकडून घेतलास ?

**विंदुमाधव :** ( इतका वेळ पाइपशी धडपड करीत, पाइप आपटीत ) हूऽऽ चिपळूणकर आगरकरांनी काढलेल्या शिक्षणसंस्था इथपर्यंत येऊन पोचल्या आहेत तर! या दिवसांत पाइपची तंबाखूसुद्धा भेसळ करून विकतात हरामजादे. मग शिक्षणाची काय गोष्ट ? गोट्या, ( खिशातून एक दहाची नोट काढीत ) खाली जा आणि कोपऱ्यावरच्या दुकानातून एक कॅप्स्टन् फिल्टर किंगचं पाकीट घेऊन ये बाळ.

[ नोट घेऊन गोट्या तत्परतेनं पसार होतो. मग— ]

**चिंतामणी :** ( धुमसत ) उगीच जाऊ दिलात बाबा तुम्ही त्याला. हरामखोर बरा सापडला होता तावडीत. त्याची चांऽगली खरडपट्टी काढणार होतो मी. पण—

**विंदुमाधव :** म्हणूनच पिटाळला मी त्याला बाहेर.

**चिंतामणी :** म्हणूनच पिटाळलात ? याचा अर्थ काय बाबा ?

**विंदुमाधव :** बरा सापडला होता तावडीत म्हणून चांऽगली खरडपट्टी काढणार होतास तू त्याची—याचा अर्थ काय ते सांग मला आधी. मुलं शत्रू आहेत का तुझी ? मुलाच्या भल्यासाठी तुला त्यांची कानउघाडणी करायचीय, का आपल्या रागाचा कंडू शमविण्यासाठी त्याच्यावर तुला तोंड टाकायचंय ?

**चिंतामणी :** बाबा, मुलांचे लाड खाण्या-पिण्याबाबत; अभ्यासाबाबत लाड काय कामाचे ? अभ्यासात चुकारपणा केला तर त्याला बोलायला नको ?

**बिंदुमाधव :** बोलायला हवं. बोललंच पाहिजे. पण मुलांना अभ्यासाबद्दल बोलायची वेळ केव्हा असते ? परीक्षेच्या निकालानंतर ? ओ नो... नेव्हर. काय कान उपटायचे ते आधी. परीक्षेच्या वेळी फक्त प्रोत्साहन. आणि निकालानंतर पाठीवर मायेचा हात— शाबासकीसाठी, नाही तर धीर देण्यासाठी. रोज मुलं काय करतात यावर आईबापांचं जागरूक लक्ष असायला नको का ? यापैकी तुम्ही काय केलंत ?

**चिंतामणी :** बाबा, तुम्ही बघताहात हा पोरगा सिनेमाच्या नादानं किती नादावलाय ! आणि—

**बिंदुमाधव :** चिंतोबा, अरे त्याचं हे वयच नादावण्याचं आहे. अरे या त्याच्या वयात सगळी मुलं नादावतात, झपाटली जातात आणि मग टक्के-टोणपे खाऊन वाढत्या वयाबरोबर पाय जमिनीला लागले की सगळे नाद आपोआप ओघळून पडतात. आणि काय रे, मुलाच्या भल्यासाठी बोलायचं तर त्यात एवढा उपरोध, एवढा खवचटपणा, इतका छद्मीपणा, इतके जलाल कुत्सित शब्द कशासाठी ? त्यापेक्षा सरळ उठावं आणि कानफटात ठेवून द्यावी !

**चिंतामणी :** वयात आलेल्या मुलांच्या अंगावर हात टाकायचा का बाबा ?

**बिंदुमाधव :** नाही ना ? मग हे जसं तुला कळतं, तसं वयात आलेल्या मुलांचा, चारचौघांत कुत्सित शब्द भोसकून पाणउतारा करू नये, हे नाही का तुला समजत ? मुलांना बोलायच्या वेळा असतात, तशा बोलायच्या जागाही असतात. परीक्षेतला पेपर फुटला; इतर सगळ्या मुलांच्याप्रमाणं गोट्यानंही तो विकत घेतला, हे एक सामाजिक विष आहे. पण त्याचा जाब तू गोट्याला का म्हणून विचारतो आहेस ? जाब विचारण्याची माणसं निराळी आहेत. हे विष असलं तर ते पचवूनच मुलांना शहाणं होणं भाग आहे, हे नाही का तुझ्या लक्षात येत ? [ चिंतामणराव अवाक होऊन पाहात राहतात; तशी—] बघतोस काय असा ? मी तुला उपदेशामृताचा घुटका पाजतोय असं वाटतंय काय तुला ? बघ हा माझ्या वयाचा दोष आहे. फॉर्गेट इट् ! बैस बैस... (खिशातून पाकीट काढीत) एक सिगरेट ओढ ! अरे लगाव बत्ती... कोण बघतोय ? सगळी मंडळी बाहेर गेलीत शॉपिंगला. थोडा आनंद करू.

**चिंतामणी :** (बसून पाकीट घेत) तुमच्याजवळ पाकीट होतं बाबा ?

**बिंदुमाधव :** तर काय ? रिझर्व फोर्स ठेवावाच लागतो. (सिगरेट काढून शिलगावीत) त्याचं काय आहे चिंतोबा, सिगरेट ओढायला आम्हाला बंदी केलीय. डॉक्टरांनी नव्हे, तुमच्या प्रेमळ मातोश्रींनी. मला काही झालंय म्हणून नव्हे. काही होऊ नये म्हणून. स्वीटेक्स घातलेल्या पुरणपोळी पथ्याचाच हा दुसरा

प्रकार-भेद आहे. ही बंदी आजकालची नाहीये. पन्नास वर्षांपूर्वी कमळजाबाईंशी प्रेमविवाह केला त्या काळातली आहे. प्रेमाच्या धुंदीत तरुणपणी काही काळ दिलेला शब्द इमानानं पाळला. पुढं धुंदी ओसरली म्हण किंवा वयोपरत्वे तल्लफ अनावर झाली म्हण. काऽय ? म्हणजे वयाचाच दोष तो; माझा नव्हे. म्हणून मग ही अशी थोडीशी चोरीमारी... आणिक मौज म्हणजे तिलाही ते ठाऊक आहे. या वयात शिंची सिगरेटची चोरीसुद्धा पचत नाही. पण करणार काय ? म्हातारा म्हणतो—"तू काहीही म्हणालीस तरी मी शेण खाणारच!" मग म्हातारी म्हणते- "मेल्या खा... पण थोडं खा... माझ्या दृष्टीआड तरी खा!" अशी मौज आहे! म्हातारपण म्हणजेदेखील मजा आहे.... रंग आहे रंग! अरे हे,काय, सिगरेट पेटव की. नुसती तोंडात काय धरली आहेस ? ती काय पिप्पाणी आहे ?

**चिंतामणी :** ( सिगरेट तोंडातून काढीत आपल्याच विचारात ) बाबा, या गोष्याचं काय करायचं ?

**विंदुमाधव :** बघू. त्याची फायनल परीक्षा कधी आहे ?

**चिंतामणी :** दीड महिन्यानं.

[ विंदुमाधवराव उठून मॅच-बॉक्स घेऊन चिंतामणरावांची सिगरेट पेटवू लागतात, आणि नेमक्या त्याच वेळी बाहेरून दार उघडून येतात कमळजाबाई आणि सुमंगला. ]

**कमळजाबाई :** अग्गोबाईऽऽ मीठमोहऱ्या तरी घेऊन ये सुमंगला. वडील आपल्या लेकाची सिगरेट पेटवताहेत, हे दृश्य जगात कुठं बघायला मिळेल ? आता लेकाला आपली सिगरेट पेटवायला ांगा म्हणजे धन्य झालात. राहता राहिली नातवंडं. ती तर तुमच्यापुढं चार पावलं गेलीत.

[ चिंतामणराव गडबडीनं सिगरेट विझवतात तशी— ]

**विंदुमाधव :** ( सिगरेटचं पाकीट त्याच्या अंगावर टाकीत ) चिंतोबा, हे तुझं पाकीट. कमळजाबाई, तुम्हाला ठाऊक आहे मी स्वतः सिगरेट ओढीत नाही. सहसा!

**कमळजा :** 'सहसा' म्हणालात एवढ्यानं बरं झालं. ( पर्स उघडून सिगरेटचं पाकीट काढीत ) हे तुमचं पाकीट. गोष्याला आणायला धाडला होतात ते, आणि हे उरलेले पैसे.

**विंदुमाधव :** पाकिट माझं नव्हे. चिंतामणीचं. घे रे बाबा.

**सुमंगल :** कमाल आहे बाई. तुम्ही दोन पाकिटं ओढायला कधीपासून लागलात ? अहो तुम्हाला ब्लडप्रेशर, डायबेटिस आणि—

**विंदुमाधव :** सूनबाई, तू त्याला बोलू नकोस. आज त्याला फारच मनस्ताप झालाय, म्हणून मीच त्याला म्हटलं की ओढ एखादी सिगरेट!

**कमळजा** : म्हणून ट्रेनिंग देणं चाळलं होतं वाटतं, सिगरेट कशी ओढावी त्याचं ?
**बिंदुमाधव** : मी त्याला फक्त कंपनी देत होतो. बाकी तू हवं ते म्हण, पण मलासुद्धा फारच मनस्ताप झालाय आज, म्हणून मी फक्त एक सिगरेट ओढत होतो.
**कमळजा** : कळलं ऽ! तो समोरचा पाइप दडवा अगोदर खिशात. फक्त एकच सिगरेट ओढत होतो म्हणे !
**बिंदुमाधव** : ( ओरडून ) अरे म्हणजे कमाल झाली. आमच्या मनस्तापाबद्दल काही चौकशी कराल की नुसती सिगरेटच उगाळाल ?
**कमळजा** : उगाच ओरडू नका. तुम्हाला आयुष्यात कधी मनस्ताप झाला नाही आणि व्हायचा नाही. दुसऱ्याला बरिक मनस्ताप द्याल तेवढा थोडा. [ आत जाते. ]
**सुमंगल** : कसला मनस्ताप झालाय हो तुम्हाला ?
**चिंतामणी** : गोश्या कुठाय ? आता पळाला असेल. आता थाऱ्यामोऱ्याला उभा राहायचा नाही माझ्यापुढं आठ दिवस.
**सुमंगल** : का ? काय झालं ?
**चिंतामणी** : हे कार्ड पाहा. प्रिलिमिनरी परीक्षेत तीन विषयांत हा गधडा नापास झालाय. [ सुमंगळा कार्ड उचलून पाहू लागते. ] त्याच्या प्रिन्सिपॉलनी जाम खरड काढली माझी फोनवर. जणू काही मीच नापास झालोय परीक्षेत.
**बिंदुमाधव** : पण तुला बोलायचं काय कारण ?
**चिंतामण** : हे नवं शिक्षणशास्त्र ! पोरांना शाळेत प्रवेश देण्यापूर्वी हल्ली आई-बापांचा इंटरव्ह्यू घेतात, हे तुम्हाला ठाऊक आहे बाबा ! मुलांचा अभ्यास तर आईबापांनी करून घेतलाच पाहिजे; पण मुलांच्यावर सतत लक्षही ठेवलं पाहिजे. यात चुकलं की आम्हाला मेमो. प्रथम फोनवर, मग लेखी. शिवाय धमकी–मुलाचं नाव काढून टाकू. आता मी बँकेची कामं पाहू का या कारट्यावर लक्ष ठेवू ?
**सुमंगल** : अहो– किनई आपला गोश्या अगदी थोडक्या मार्कांनी नापास झालाय. म्हणजे—
**चिंतामणी** : तरी पण नापास म्हणजे नापास.
**सुमंगल** : पण भूगोलात—
**चिंतामणी** : शहाण्णव मार्कांवर हुरळून जाऊ नका. तो तर नापास होण्यापेक्षा गलिच्छ प्रकार आहे. फुटलेल्या पेपरची प्रत आपल्या चिरंजीवांनी पाच रुपयांना विकत घेतली आणि हे मार्क मिळवले. आपले चिरंजीव भ्रष्टाचारमहर्षी होऊ लागलेत एव्हापासून !
**सुमंगल** : काय म्हणावं तरी बाई या पोराला ?

**चिंतामणी :** त्याला काहीही म्हणण्यापूर्वी स्वतःचे कान उपटा. पोरांचे सारखे लाड करता त्याची ही फळं.

**सुमंगल :** बघा बाई. मी काय लाड केले हो त्याचे ? मी त्याला काय अभ्यास करू नको म्हटलं होतं ?

**चिंतामणी :** टिटूच्या क्रिकेटचं त्याच्या शाळेपासून कौतुक कोण करीत होतं ? मी ? गोट्याच्या अभिनयकौशल्याचं कौतुक कोण करीत होतं ? मी ?

**सुमंगल :** तुम्ही तरी चमत्कारिकच आहात. मुलांच्या अंगच्या गुणांचं कौतुक करायचं नाही ? त्यांनी क्रिकेटची ढाल मिळवली, अभिनयाच्या स्पर्धेत बक्षीस मिळवलं तर काय—

**चिंतामणी :** तेच तेच.... हे सगळे त्याचेच परिणाम आहेत. हे बघ, मी करियरिस्ट आहे. बाकी मी काय वाट्टेल ते केलं असेन पण परीक्षेला पहिला वर्ग की पहिला नंबर मी चुकवलेला नाही !

**सुमंगल :** तसा त्यांनीही चुकवलेला नाही. फक्त टिटूचे नि गोट्याचे विषय वेगळे आहेत. पण—

**चिंतामणी :** तू त्यांचं समर्थन करतेस त्यामुळं माझ्या अंगाचा भडका उडतोय. अग शहाणे— टिटूला क्रिकेट आणि गोट्याला नाटक-सिनेमा, जन्माची भाकरी मिळवून देणार आहेत का ?

**सुमंगल :** माणूस काही नुसत्या जन्माच्या भाकरीवर जगत नाही.

**चिंतामणी :** पण माणूस जन्मभर भाकरीशिवायही जगू शकत नाही. उद्या—

**विंदुमाधव :** ( उठून टाळया वाजवीत ) वेल सेड ! तुम्हा उभयता पति-पत्नीच्या या प्रेमसंवादामुळं माझ्या ज्ञानात बरीच भर पडली. फक्त या संवादात तुमच्या कन्येचा तुम्हाला विसर पडलाय, याची आठवण करून देतो.

**चिंतामणी :** शी इज बियाँड करेक्शन. मी मुळी तिचा विचारच करीत नाही. बाबा, तुम्हाला ईश्वरसाक्ष सांगतो, मुलांच्या बाबतीत तुम्ही फार भाग्यवान होतात. तुम्हीच नव्हे, तुमची सबंध पिढी. आम्ही कमनशिबी आहोत. म्हणजे—

**विंदुमाधव :** थँक्स् फॉर युवर लेफ्ट हँडेड कॉम्प्लिमेन्टस माय सन. पण याचाच अर्थ असाही होऊ शकतो की, आम्ही फार चांगले आईबाप होतो.

**चिंतामणी :** म्हणजे आम्ही वाईट आईबाप आहोत का ?

**विंदुमाधव :** त्याचं उत्तर तुम्हीच द्यायचंय. मला नव्हे— स्वतःला.

**सुमंगल :** मी सांगते बाबा, काही आकाश कोसळलेलं नाहीये. प्रिलिम्चीच परीक्षा होती. मनावर घेतलं तर माझा गोट्या दीड महिन्यात अभ्यास करून फायनलची परीक्षा उत्तम रीतीनं पास होऊन जाईल.

**विंदुमाधव :** हे अगदी खऱ्याखुऱ्या आईसारखं बोललीस सूनबाई.

**चिंतामणी** : तर तर... बोलायला काय जातंय तिला ? आजवरच्या अनुभवा-वरून मनावर घेऊन अभ्यास करणारा आहे का तुझा पोरटा ?

**सुमंगल** : बघू या की. असं हातपाय गाळून कसं चालेल हो ?

**चिंतामणी** : ( उठत ) काय बवायचं ते आता तुझं तूच पाहा. तुझ्या या तिन्ही पोरांच्या बाबतीत आय हॅव वॉश्ड माय हँडस.

**बिंदुमाधव** : शाब्बास रे पठ्ठे ! हे अगदी खास विश्वामित्रासारख्या बापाच्या थाटात बोललास. पोरं काय फक्त तिची एकट्याचीच आहेत काय रे ?

**चिंतामणी** : मग आता मी काय करायला हवं बाबा ?

**बिंदुमाधव** : माझ्यापाशी काय रेडीमेड उत्तरांची पुरचुंडी आहे ? अरे मुलं तुमची, प्रश्न तुमचे, उत्तरं तुमची तुम्हीच शोधून काढायला हवीत. खरी गरज आहे तुम्ही प्रेमाच्या गावाला जायची; तू निघाला आहेस मात्र ओसाड गावाकडं. वयात आलेल्या मुलांशी बापानं मित्रासारखं वागावं, हे मी तुला सांगायला हवं का ?

**चिंतामणी** : ( घड्याळात पाहात ) रात्री पार्टीला जायचंय मला. रिझर्व बँकेच्या एका बड्या अधिकाऱ्याला खाना आहे. माझी गाडी कुठाय ?

**सुमंगल** : म्हणजे काय बाई ? गाडी टिट्टू घेऊन गेलाय हे तुम्हाला माहीत नाही ?

**चिंतामणी** : विचारून गाडी घेऊन गेला तर मला ठाऊक होणार.

**सुमंगल** : ( समजूत घालीत ) अहो किनई, काय झालं, क्रिकेट कंट्रोल बोर्डाची आज मीटिंग होती नाही का... टिट्टूला पुढच्या टेस्ट मॅचेसच्या सीरीजमध्ये कॅप्टन करायचं ठरतंय. म्हणून मग—

**चिंतामणी** : (मटकन बसत कपाळाला हात लावीत) टिट्टू कॅप्टन होणार का आता. मेलो ऽ ऽ !

**सुमंगल** : बघा बघा बाबा, कसे बोलताहेत हे. आणि हे म्हणे 'वडील' !

**चिंतामणी** : मी नुसता टिट्टूचा वडील नाहीये सुमंगलादेवी, मी बँकेचा मॅनेजर आहे एका. त्याच बँकेत आपले चिरंजीव ट्रेनी ऑफिसर म्हणून काम करताहेत, ही माझी खरी डोकेदुखी आहे. आधीसुद्धा मॅचच्या मोसमात तो काम फारसं करीतच नव्हता. आता तर तो कॅप्टन झाला म्हणजे बँकेकडे फिरकायचासुद्धा नाही !

**सुमंगल** : मग काढून टाका की पोराला नोकरीवरून.

**चिंतामणी** : आज प्रश्न तो नाहीये. गाडी माझी आहे. मला विचारल्याशिवाय टिट्टूनं गाडी कुठंही नेता कामा नये !

**सुमंगल** : तुमचं हे मत टिट्टूला मान्य नाही. तो म्हणतो की पपांचं जे जे आहे ते माझंच आहे असं मला वाटतं.

**चिंतामणी :** त्याचा अनुभव घेतोच आहे मी. हा माझे बूट वापरतो, सॉक्स वापरतो; शर्ट, टाय, झब्बे पायजमेसुद्धा वापरतो. आणि वॉर्डरोबमध्ये फक्त बोळे रचून ठेवतो. मी काय करायचं ?

**बिंदुमाधव :** इतकी तुमची दोघांची मापं एक आहेत का रे ?

**चिंतामणी :** मुळीच नाही. पण शहाणा मला एकदा म्हणाला की, तुमचे कपडे वापरायला लागल्यापासून माझी मापंच मी विसरलोय. काय म्हणणार या निर्लज्जपणाला ? कपड्यांचं एक ठीक आहे. मी पत्करलंय ते. गाडी वापरायलाही हरकत नाही. पण माझी सोय काही बघशील की नाही ? पुन्हा प्रत्येक वेळी मी आपला टॅक्सीतून.

**सुमंगल :** हे तुमचं आपलं काही तरीच. एखादवेळी झालं असेल तसं. पण--

**चिंतामणी :** एखादे वेळी ? तू असतेस इथं वर. मी असतो खाली माझ्या केबिनमध्ये. हा परस्पर बाहेरच्या बाहेर गाडी केव्हा पळवतो ते कळतसुद्धा नाही. बरं वापरायची तर गाडी कंडिशनमध्ये आहे की नाही ते तरी पाहशील ? हा ऑइल बघणार नाही, रेडिएटरमध्ये पाणी आहे की नाही ते पाहणार नाही. चाकातली हवा चेक अप करणार नाही. गाडीत पेट्रोल किती आहे तेही तपासणार नाही. हा बेधडक गाडी दामटणार. अगदी बेफाम पळवणार. बंद पडली तर रस्त्यावर सोडून देणार. गाडीला हा बटकीसारखी राबवणार. एंजिनमध्ये आवाज यायला लागला, गाडी गरम झाली, अगदी ठणाणा बोंबलायला लागली तरी हा ढुंकून तिच्याकडं लक्षसुद्धा देणार नाही. माझं भविष्य ऐकून ठेवा बाबा, नवरा म्हणून हा खाष्ट होणार आणि सासरा म्हणून तर हा दुष्टच होणार !

**बिंदुमाधव :** ( हसत ) व्हॉट अ ज्योक !

**चिंतामणी :** ही ज्योक नाहीये बाबा. बाबा, ही फॅक्ट आहे फॅक्ट ! गेले दोन दिवस मी बेचैन आहे. गाडीच्या डिफरेन्शियलमधून 'घुऽऽम्म' आणि 'घो घो घो' असा आवाज येतोय सारखा. मला अशी दाट शंका आहे की—

**सुमंगल :** जळो मेला तो 'घुऽम्म' आणि 'घो घो' आवाज. तुमची गाडी नुसते आवाजच करते, तुम्ही ड्रायव्हिंगला बसलात की. या आवाजापायी मी यांच्या गाडीतच बसायचं सोडून दिलंय. तर काय मेला वनवास ! म्हणजे गंमत बघा बाबा, टिट्टू गाडी चालवतो तेव्हा कशी निमूटपणं गुण्यागोविंदानं धावते. काही आवाज नाही फिवाज नाही. पण हे व्हीलवर बसले की इकडून आवाज, तिकडून आवाज, सगळे आवाजच आवाज. काय गाडी आहे की भुताटकी आहे !

**बिंदुमाधव :** ( हसत ) 'गाडी' हा एवढा विनोदी विषय असू शकेल याची कल्पना नव्हती मला सूनबाई.

**सुमंगल :** विनोदी नाही बाबा, घरादाराचा छळ आहे छळ यांची गाडी

म्हणजे. गाडीची जरा प्रकृती बिघडली की हे एकदम अपसेट. दिवसचे दिवस हा अस्सा लांऽऽब चेहेरा. जणू काही आम्हीच घरातल्यांनी पाप केलंय.

**चिंतामणी :** ते कळायला गाडीवर अगोदर प्रेम करावं लागतं. अरे गाडी झाली म्हणून तिला जीव नाही असं समजलात की काय तुम्ही ?

**सुमंगल :** छे छे– त्याशिवाय का तुम्ही त्या बयेपुढं अहोरात्र हात जोडून सेवेला उभे असता ? लाडावलेली टवळी मेली !

**चिंतामणी :** ( रागानं ) ठीक आहे. आत्ता एजंटला फोन करतो आणि तावडतोब गाडी विकून टाकतो. राहा उभे मग बसच्या रांगेत रखडत ( रागारागाने आत जातात. )

**सुमंगल :** कशी सवत आहे पाहिलीत ना बाबा माझी ? आता तासन् तास नाकदुऱ्या काढायला लावील बया मला यांच्यापुढं ! [ पाठोपाठ आत जाते. बिंदुमाधवराव हसत सिगरेट पेटवू लागतात तोच दारापासल्या खिडकीच्या शटरमधून हळूच गोट्या डोकावतो "शुक शुक" करतो, तशी– ]

**बिंदुमाधव :** ( पाहात ) कोण गोट्या ? अरे काय रे हे ? त्या शटरमधून कसल्या खाणाखुणा करतो आहेस ? ये ये, सरळ दारानं आत ये. तुझे पप्पा नाहीयेत इथं. [ गोट्या हलकेच दार उघडून आत येतो. ]

**गोट्या :** (वाकून नमस्कार करीत ) खरं सांगतो बाबा, तुमच्यामुळं वाचलो आज मी. नाही तर पपांनी आज मला फाडूनच खाल्लं असतं !

**बिंदुमाधव :** ते काही खोटं नाही. तू वाचलास बेट्या, पण तुझ्या या आजोबाला मात्र तू फासावर लटकावलंयस. आता फक्त पायाखालची फळी पाडायची शिल्लक उरलीय.

**गोट्या :** ( थक्क होत ) आं ? म्हणजे ? प्रकार काय घडला ?

**बिंदुमाधव :** अरे छोड दो भाई. प्रकार म्हणजे खूपच घडला. आरडाओरडा, आदळआपट, थयथयाट, शब्दाला शब्द, अरेला का रे, आव्हानाला आव्हान,.... काही विचारू नकोस. खालच्या वरच्या फ्लॅटमधली मंडळी दाराशी गोळा झाली, घरातली माणसं तर भयभीत होऊन चुपचाप.

**गोट्या :** ( हबकून ) एवढा तंटा केला पपांनी तुमच्याशी ?

**बिंदुमाधव :** हो. केवळ तुझ्या पायाने नाही नाही ते ऐकावं लागलं मला तुझ्या गाढवपणासाठी.

**गोट्या :** ( चाचरत ) न... नाही म्हणजे पपा म्हणाले तरी काय काय ?

**बिंदुमाधव :** ते तू मला विचारू नयेस आणि ते मी तुला सांगू नये. गोट्या मूर्ख आहे, मठ्ठ आहे, उडाणटप्पू आहे, बुद्धीनं मंद आहे, चवचाल आहे, हे आहे, ते आहे, ते आहे आणिक तेऽही आहे !

**गोट्या :** असं म्हणाले पपाऽ ?

**बिंदुमाधव :** हा पुढं पट्टेवाला होणार; हॉटेलमध्ये कपबशा विसळणार; सिनेमातल्या नट्यांची हा लुगडी धुणार... हे करणार, ते करणार, ते करणार आणिक तेही करणार !

**गोट्या :** केवळ एक, प्रिलिममध्ये दोन विषयांत नापास झालो म्हणून ?

**बिंदुमाधव :** त्याचंही एका अर्थानं बरोबरच आहे. या वर्षाभरात तू अभ्यासात त्याला आपली प्रगती दाखवली आहेस का कुठं ? मग तोच काय, कोणीही म्हणणारच की गोट्या असा आहे न् तसा आहे. तुमच्या दोघांच्या प्रकरणात माझा मात्र खात्मा झालाय. मी आपली हिरीरीनं तुझी बाजू लावून धरली खरी... पण त्यात काही अर्थ नाही. (गहिवरल्या स्वरात) मला नाही वाटत पुन्हा या घरात मला पाऊल टाकता येईलसं. (डोळे टिपतात.)

**गोट्या :** (गलबलून) बाबा, तुमच्या डोळ्यांत पाणी ? पुन्हा या घरात तुम्हाला पाऊल टाकता येईलसं वाटत नाही, म्हणजे काय ? पपा तुम्हाला 'जा' म्हणाले ?

**बिंदुमाधव :** (कातर स्वरात) तो कसा मला जा म्हणेल रे ? सज्जन माणूस आहे तो. पण मला माझ्या आव्हानाची काही चाड आहे की नाही ?

**गोट्या :** कसलं आव्हान ? बाबा, मला सरळ सरळ स्पष्ट सांगा पाहू !

**बिंदुमाधव :** त्यात काही अर्थ नाही गोट्या. माझं आव्हान फुसकं ठरणार आणि फजीत पावून मी या घरातून कायमचं काळं करणार !

**गोट्या :** पण आव्हान तरी कसलं दिलंत, ते सांगा की मला ?

**बिंदुमाधव :** तुझा आग्रहच आहे तर सांगतो. तो म्हणाला की, गोट्याचा फायनल परीक्षेत, सगळ्या विषयांत 'ढिशांव ढिशांव' होणार.

**गोट्या :** च्या मारी ! अस्सं काय ?

**बिंदुमाधव :** माझ्या डोक्यात सणकच गेली. मी त्याला म्हटलं की, तुझी माझी पैज ! फायनल परीक्षेत गोट्या सगळ्या विषयांत पन्नास टक्के मार्क मिळवून पास होणारच होणार !

**गोट्या :** ( सर्द होत ) अबब ! सगळ्या विषयांत पन्नास टक्के मार्क मिळवून ?

**बिंदुमाधव :** पास होणार. पैज हरलो तर पुन्हा तुझ्या घराची पायरी मी चढणार नाही, की गोट्याचं तोंडसुद्धा बघणार नाही.

**गोट्या :** आणि पैज जिंकली तर ?

**बिंदुमाधव :** पैज जिंकली तर त्यानं पुन्हा तुझ्या नाटक सिनेमाच्या छंदाबद्दल तुला एका अक्षरानं बोलता कामा नये— पुढच्या परीक्षेपर्यंत.

**गोट्या :** आणि पपा हो म्हणाले ?

**बिंदुमाधव :** म्हणणारच. त्याला पक्कं ठाऊक आहे मी पैज हरणार.

**गोट्या :** हूंऽऽ ! ( विचारांत पडत ) पास होणं— इतपत ठीक आहे बाबा, पण पन्नास टक्के म्हणजे फारच झालं हो....

**बिंदुमाधव :** काही फार झालं नाही. नाटक-सिनेमातल्या डायलॉगच्या फेका-फेकीत अठ्याण्णव टक्के रे कशी मात करतोस? तितकाच जीव अभ्यासात लावलास, तर पन्नास टक्के मार्क मिळवणं तुला काय अशक्य आहे?

**गोट्या :** याचा अर्थ बाबा, मला हे दीड दोन महिने अभ्यासात गाडून घ्यायला लागेल गाडून, ठाऊक आहे?

**बिंदुमाधव :** तुला तुझा हा बाबा घरी यायला हवा असला तर घे अभ्यासात गाडून...नाही तर दे सोडून....मी जाईन बाबा तुझ्या काकाच्या घरी मुक्कामाला.

**गोट्या :** मला पन्नास टक्क्यापेक्षा कमी मार्क पडले तर तुम्ही माझं पुन्हा तोंड-सुद्धा बघणार नाही?

**बिंदुमाधव :** हे बघ, मी शिवप्रभूंचा भक्त आहे. शिवाजीमहाराजांची राज-नीती अशी आहे की, "आधी शब्द देऊ नये. दिल्यास तो पालन करण्यासाठी जिवाची बाजी लावावी...." काऽय?

**गोट्या :** ( विचारमग्न होत ) हूंऽ! कठीण आहे बाबा, कठीण आहे.

**बिंदुमाधव :** काय बोलतोस तू गोट्या? अरे तुझ्या वयात राजांनी स्वराज्याचे तोरण बांधले. पुरंधर घेतला, शिरवळच्या मिया अमीन महंमदला—

**गोट्या :** अहो त्यांचा दाखला मला कशाला देताय? ते कुठं, आम्ही कुठं?

**बिंदुमाधव :** म्हणून तर पन्नास टक्क्यांवर खाली उतरलोय.

**गोट्या :** तरी पण—

**बिंदुमाधव :** बास, बास! आता पण बीण काही नाही. राजे, आता बाकीचे सगळे उद्योग सोडा आणि एकच गड काबीज करा. आधी लगीन कोंडाण्याचं, मग नाटक-सिनेमाचं.

[ तोच दारावर घंटा वाजते. गोट्या दार उघडतो. तशी प्रिया आणि टिट्टू बोलत येतात. प्रिया म्हणते—"तू विनाकारण अपसेट झाला आहेस टिट्टू. त्यावर टिट्टू म्हणतो—"प्रिया, कंट्रोल बोर्डात राजकारण कसं खेळलं जातं ते तुला ठाऊक नाही. आय थिंक, आय हॅव लॉस्ट माय चान्स—" ]

**बिंदुमाधव :** अरे अरेऽ...एवढी भडकाभडकी उडायला काय झालं? व्हॉटस् द प्रॉब्लेम?

**टिट्टू :** सांगतो. गोट्या एक काम कर राजा अगोदर. सी. सी. आय.पाशी मी गाडी सोडलीय. मारुतरावच्या गॅरेजला मी फोनदेखील केलाय. बहुतेक त्यांनी माणसं पाठवली असतील. गाडीच्या दुरुस्तीला किती वेळ लागेल त्याचा अंदाज घेऊन ये. हे पैसे घे आणि टॅक्सी करूनच जा.

[ पैसे देऊ लागतो तेवढ्यात आतून सुमंगला येते. ]

**सुमंगल :** कोण टिट्टू आला का? गाडी कुठाय बाबा यांची?

**टिट्टू :** गाडीचा ॲक्सेल तुटलाय. तिकडंच पाठवतोय मी गोट्याला.

**सुमंगल :** झालं ! आधीच हे इतके भडकलेत आणि त्यात—

**टिट्टू :** ममी, ॲक्सेल तुटला म्हणजे मी काही ॲक्सिडेन्ट नाही केला कुठं. पपांना घरबसल्या भडकायला काय होतंय ?

**बिंदुमाधव :** अरे त्या गाडीचं केवढं पुराण ऐकलं आम्ही आत्ता इथं ?

**सुमंगल :** त्यांना नाही आवडत तर कशाला हात लावतोस त्यांच्या गाडीला ?

**टिट्टू :** त्याचं उत्तर मी एकदा दिलंय ममी. मला या घरातून जायला सांगा मग त्यांच्या कोणत्याच वस्तूला हात लागायचा नाही माझा.

**सुमंगल :** बाबा, कसा बोलतोय हा मुलगा, पाहिलंत ?

**टिट्टू :** ममी, आज तरी माझं डोकं खाऊ नकोस. मी भडकून जाण्यासारख्या खूप काही गोष्टी घडल्या आहेत. पपांची गैरसोय झाली असली तर आय ॲम सॉरी,– रिअली सॉरी.

**सुमंगल :** ते आता तूच जाऊन सांग त्यांना.

**टिट्टू :** मी नाही जाऊन सांगणार. तूच सांग. पुन्हा वादावादी नकोय मला. गोऱ्या, तू जा पाहू अगोदर. [ गोऱ्या जातो. ] तासाभरात गाडी दुरुस्त होऊन येईल म्हणावं. ममी, प्लीऽऽज– प्लीऽऽज म्हणतो ना ?....

**सुमंगल :** दोन्हीकडून थपडा खायचंच नशिबात आहे माझ्या. [ जाते.]

**प्रिया :** तुझा तरी चमत्कारच वाटतो मला. गाडीवर एवढं प्रेम आहे पपांचं तर—

**टिट्टू :** त्याच्या निम्म्यानं मुलांच्यावर प्रेम केलं त्यांनी तरी भरून पावलं.

**बिंदुमाधव :** जाऊ दे. फॉर्गेट इट. छोट्या गोष्टी आहेत या.

**टिट्टू :** मोठ्या गोष्टीतला प्रकार तुम्ही पाहिलाच आहेत बाबा. बॅंकेच्या ॲथॉरिटीजना जेवढं माझं कौतुक आहे तेवढंसुद्धा पपांना नाही. ते सतत मला त्रास देतात, छळतात. माझं यश त्यांना बघवत नाही. ही इज जेलस ऑफ मी. काही नाही, मी आता वेगळंच बिऱ्हाड करून राहिल्याशिवाय ही रोजची तणातणी—

**बिंदुमाधव :** नो नो... धिस इज अन्‌जनरस. ही धाड्‌कन शेरे मारण्याची सवय वाईट आहे टिट्टू. तुलाही कधी तरी बाप व्हायचंय; त्याहीपेक्षा तूही कधी तरी म्हातारा होणार आहेस.

**टिट्टू :** म्हातारपणाचा आणि पपांच्या या वागण्याचा काय संबंध आहे बाबा ?

**बिंदुमाधव :** तेच तुम्ही मुलांनी समजून घ्यायला हवं. तुझे वडील आता झपाट्यानं म्हातारे होताहेत. ही इज एजिंग फास्ट. पण येणारं म्हातारपण आरंभी माणसाला झेपत नाही... पेलवत नाही. म्हणून मग हा असा तोल सुटतो.

**टिट्टू :** हे काय सांगताय तुम्ही बाबा ? तुम्ही म्हातारे नाहियेत ?

**बिंदुमाधव :** हो. जरूर आहे. पण मी आता मोरावळ्यासारखा म्हातारपणात

मुरलेला म्हातारा झालोय. म्हातारपण येऊ लागलं त्या काळी, म्हणजे तुझ्या वडिलांच्या वयाचा जेव्हा मी होतो, तेव्हा मी काय काय दंगाधोपा केलाय ते तुला कुठं ठाऊक आहे ?

**टिट्टू** : ( थक्क होत ) आं ! तुम्हीऽऽ ? दंगाधोपा ?

**विंदुमाधव** : तुझ्या आजीला विचार म्हणजे ती सांगेल. अरे त्यात आश्चर्य करण्यासारखं काहीही नाही. प्रत्येक माणसाला पन्नाशीत या वेशीखालून जावंच लागतं. ते सोड. तू मघाशी वेगळं बिऱ्हाड करण्याबद्दल काही तरी म्हणत होतास...

**टिट्टू** : नुसतं म्हणत नव्हतो, मी तर एक फ्लॅटसुद्धा कुठं मिळतो का ते—

**विंदुमाधव** : फ्लॅटचं होऊन जाईल. तुला पैसा बरा मिळतोय; तुझे चाहतेही दुनियाभर पसरलेत; तेव्हा तुला जागा मिळायला अडचण मुळीच पडायची नाही. पण बिऱ्हाड म्हटलं की घराची स्वामिनी आलीच की. त्याची काही तजवीज.... काय ग प्रिया ?

**प्रिया** : इश्य, मला काय विचारता बाबा ? भारीच खट्याळ आहात हो तुम्ही. त्यालाच विचारा की. पुष्कळ मुली त्यानं हेरून ठेवल्या असतील !

**टिट्टू** : पुष्कळ मुली ? तू काय मला अरब समजली आहेस का ?

**विंदुमाधव** : असो, असो ! एवढा अपसेट होऊन तू घरी आलास म्हणून विचारतोय, व्हॉट इज द प्रॉब्लेम ? म्हणजे सांगण्यासारखं असलं मला तर—

**टिट्टू** : त्यात न सांगण्यासारखं काही नाही. सगळ्या जगात चर्चा होणार आहे त्या प्रकरणाची. सिगरेट घेऊ बाबा ?

**बिंदुमाधव** : घे की. कसलं प्रकरण ? [ टिट्टू सिगरेट शिलगावतो. ]

**टिट्टू** : येत्या टेस्ट मॅचिसच्या सीरीजमध्ये कॅप्टनशिप रीतीप्रमाणं माझ्याकडं यायचं जवळ जवळ एकमतानं ठरलंय. कंट्रोल बोर्डात चिक्कार राजकारण लढवलं जात असलं तरी आजपर्यंत मला त्याची झळ लागलेली नाही. पण आता राजकारणातल्याच काही वजनदार पुढाऱ्यांनी मेंबर्सवर प्रेशर आणण्याचा उद्योग चालवलाय. एकाएकी जैनाबादचा नबाब सिराज याचं नाव कॅप्टनशिपसाठी पुढं आलंय. सगळी सीनियॉरिटी धुडकावून आणि नबाबसाहेबांचा खेळ काय दर्जाचा आहे याची पत्रास न बाळगता.

**बिंदुमाधव** : पण कशासाठी हा उपद्व्याप ?

**प्रिया** : अल्पसंख्य जमातीला संतुष्ट करण्यासाठी !

**बिंदुमाधव** : आता हे हरामजादे क्रीडाक्षेत्रातदेखील लुडबूड करायला लागले का ? अरे राम राम राम !

**टिट्टू** : अल्पसंख्य जमातीचं नुसतं निमित्त आहे. नबाबाला खूष करण्यासाठी सगळी धडपड चाललीय. हा सरळ सरळ माझा बळी घेण्याचा प्रयत्न आहे !

**प्रिया :** तुझा बळी घेण्याचा प्रश्न येतोच कुठं टिटू ? तुला टीममधून ड्रॉप करण्याची हिंमत आहे का कोणाची ?

**बिंदुमाधव :** राजकीय पुढाऱ्यांचं तू काहीही सांगू नकोस. लाचारीनं बुडाखाली सत्तेची खुर्ची मिळवलेले हे ठोंबे, वाट्टेल तिथं नाक खुपसतील आणि हवा तो धुमाकूळ घालतील !

**टिटू :** मला टीममधून ड्रॉप करण्याची त्यांची हिंमत आहे की नाही हा मुळी सवालच नाहीये. नबाबसाहेब जर कॅप्टन झाले तर मीच त्यांच्या हाताखाली टीममध्ये खेळणार नाही. माझा स्वाभिमान काही मी विक्रीला काढलेला नाहीये.

**प्रिया :** इथं मात्र तू चुकतो आहेस टिटू. तू धावांचं एक वर्ल्ड रेकॉर्ड करायला निघाला आहेस, तर तुला मॅचमध्ये खेळलंच पाहिजे. कॅप्टन कोणीही झाला म्हणून तुझं काय बिघडतं ?

**टिटू :** म्हणून काय मी अन्याय सहन करू ? नो.... नेव्हर.

**बिंदुमाधव :** अरे माझ्या सोन्या, काही वेळा अशा असतात की डोकं थंड ठेवून अंतिम हितासाठी अन्यायसुद्धा सहन करावे लागतात !

**टिटू :** बाबा, तुम्ही ? तुम्हीसुद्धा हे सांगता ?

**बिंदुमाधव :** मी इतिहासाचा अभ्यासक आहे. मी छत्रपतीची राजनीती जाणतो. शिवाजीमहाराज नाक मुठीत धरून आग्र्याला गेले तो काही स्वाभिमानाचा आणि ताठ बाण्याचा मामला नव्हता. वेळ आली तेव्हा त्यांनी औरंगजेबाला बरोब्बर हात दाखवलाच ना ? क्रिकेटची मॅच म्हणजेसुद्धा एक सभ्य लढाईच आहे. लढाईत हमला असतो तशीच माघारही असते. प्रिया म्हणते ते बरोबर आहे.

**टिटू :** ( हसत ) तुम्ही प्रियाचीच बाजू घेणार. इतिहासाची प्रोफेसर आहे ना ती ?

**बिंदुमाधव :** मी तिची बाजू घेणार हे तर उघडच आहे. पण तिच्या इतिहासातल्या अध्ययन अध्यापनाशी त्याचा काहीही संबंध नाही हो.

**टिटू :** मग कशाशी संबंध आहे ?

**बिंदुमाधव :** प्रश्न थोऽडा नाजूक आहे.

**प्रिया :** ( आवेगानं ) बाबाऽ—

**बिंदुमाधव :** पण तो ज्यांचा त्यांनीच लवकर सोडवावा हे बरं. छत्रपती शिवाजीमहाराज एकदा शंभूराजांना म्हणाले—

[ हे ऐकताच कमळजाबाई लगबगीनं येतात, तशी टिटू तोंडातली सिगरेट काढून गडबडीनं विझवतो. ]

**कमळजा :** अहो इतिहासाचार्य, तुमचं छत्रपतीपुराण पुरे नाही का झालं ? मेल्या टिट्या... तू आणिक राजरोस सिगरेट फुंकतो आहेस ? यांनी दिली वाटतं ?

**टिटू :** तसं नाही आजी...

**कमळजा :** बोलू नकोस. यांचाच नातू तू. आजोबांना सही सही गिरव. आजीचा मात्र एक गुण घेऊ नकोस.

**बिंदुमाधव :** तसं नाही कमळजादेवी, मी....मी....

**कमळजा :** उगीच मी मी.... करू नका. तुम्हाला मी पक्की ओळखून आहे. छत्रपतींच्या संशोधनासाठी सिगरेटचे डोंगरच्या डोंगर भस्मसात केलेत तुम्ही आजवर. आता ते लोण नातवंडांच्यापर्यंत—

**टिटू :** तसं नाही आजी. मी एरवी कधी सिगरेट ओढत नाही. पण आज मला फार मनस्ताप झालाय. म्हणजे—

**कमळजा :** तुलाही मेल्या 'मनस्ताप' झाला का ? यांनीच शिकवला असेल !

**बिंदुमाधव :** अहो तसं काही नाहीये....तो काय म्हणतोय ते—

**कमळजा :** कळलंऽ ! तुम्ही उठा. सात वाजले. तेल लावून अंगाला मालीश करायचंय की नाही ? बायको हातीपायी धड आहे तोपर्यंत तरी सेवा पुरेपूर करून घ्या. अंघोळीसाठी पाणी काढून ठेवलंय.

**बिंदुमाधव :** (कष्टानं उठत) हाक मारली असतीत तर आलो असतो.

**कमळजा :** रोजच्या ठरलेल्या कार्यक्रमासाठी हाका कशाला मारायला हव्यात ? काही इकडं बघू नका. धोतराच्या निऱ्या करून ठेवल्यात, टॉवेल ठेवलाय, कडकडीत गरम पाणी काढलंय. आता राजासारखं बसा, मालीश करून घ्या आणि अंघोळ उरका !

**प्रिया :** बाबांच्यासाठी तुम्ही फारच कष्ट घेता हो आजी.

**कमळजा :** कष्ट घेते म्हणजे काही उपकार करीत नाही नवरोजीवर. माझे डोळे मिटेपर्यंत हातीपायी धड हवेत ना हे मला, म्हणून राबते. तुला बरिक सांगून ठेवते प्रिया, या टिटोबाला तुला चांगलाच लगाम घालायला हवा ! थोडा ढिला सोडून उपयोगी नाही.

**प्रिया :** अहो पण आजी–

**कमळजा :** साफ सांगून टाक त्याला, "ही सिगरेट आणि ती बियर-फीयर बंद केल्याशिवाय मी काही लग्नाला उभी राहायची नाही." जातोय कुठं ?

**प्रिया :** आजी, त्याला जायला भरपूर वाटा आहेत.

**टिटू :** पण आजी, मी लग्नाला कुठं उभा राहिलोय ?

**कमळजा :** मग जन्मभर का मुंजा राहणार आहेस ?

**टिटू :** अजून काही ठरलेलं नाहीये, आजी.

**कमळजा :** ठरलेलं नाहीय ? मग काय मेल्या तिला घेऊन नुसताच गावभर हिंडतोस फिरतोस होय ? लाज नाही वाटत ? काय हो इतिहासभास्कर, तुम्हाला तरी हे कसं चालतं ?

**बिंदुमाधव** : कमळजादेवी, जमाना बदललाय आता.

**कमळजा** : पण माणूस बदललाय का ? बाई तीच आणि पुरुषही तसाच आहे ना ? का बाईला शिंगं फुटलीत नि पुरुषाला शेपूट उगवलंय ?

**बिंदुमाधव** : कमळजादेवी, हा फार म्हणजे फारच मोठा गहन विषय झाला. तूर्त आम्हाला मालीश करून आंघोळ घाला.

**कमळजा** : चला तर चला. तुला सांगते प्रिया, बायकांचा जन्मच वाईट. जपून राहा. मी तर अंबेला रोज प्रार्थना करून एकच मागणं मागते. बये, या जन्मी झालं ते मी भोगलं, अगदी निमूटपणं पत्करलं. पण पुढला जन्म वरिक मला पुरुषाचा, नवऱ्याचाच हवा.

**बिंदुमाधव** : ( हसत ) एवढंच ना ? तथास्तु !

**कमळजा** : थांबाऽ ! तेवढंच नाही. आणखीही मागून घेतलंय की ! पुढल्या जन्मी माझा नवराच माझी बायको झाला पाहिजे. मग सांगते काय ते. तुम्ही आहात आणिक मी आहे ! हसताय काय ? आता म्हणा की तथास्तु ! आता नाही बोलायचे.

**बिंदुमाधव** : नाही, मी म्हणत होतो 'जैसे थे' काय वाईट आहे ? चला चला, आधी मालीश करायला चला, मग चर्चा करू.

**कमळजा** : ( जाता जाता ) जेवायला थांबताय ना रे तुम्ही दोघं ?

**टिट्टू** : नाही आजी. आम्ही दोघं बाहेरच जेवणार आहोत.

**कमळजा** : हॉटेलात ?

**टिट्टू** : हो. चायनीज हॉटेलमध्ये.

**कमळजा** : हॉटेलात जाऊन कशाला मेलं ते बेचव अन्न खाता रे ? त्यापेक्षा घरी थांबा. मी मटाराची उसळ करतेय.

**बिंदुमाधव** : अगं तुला एवढं कसं कळत नाही ? आजकाल लग्नाची बोलणी हॉटेलच्या टेबलावर होत असतात. काही नाही रे, जा तुम्ही दोघं. तेवढं मुद्द्याचं पक्कं करून टाका म्हणजे झालं. चला... मटाराची उसळ म्हणजे मजा येणार. वा वा ऽ....

[ दोघेही आत जातात. ]

**टिट्टू** : बाबा म्हणजे अस्से आहेत... मुद्द्याचं पक्कं करून टाका म्हणे. पक्कं काय करणार ? कपाळ ?

**प्रिया** : त्यांना खरं खरं सांगून टाक ना एकदा.

**टिट्टू** : काय खरं सांगू ? आमचं लग्न एके काळी ठरलं होतं. पण प्रियानंच पुढं आपला विचार बदलला, म्हणून मग—

**प्रिया** : तसं नाही. पुढं म्हणजे विचार केव्हा बदलला आणि का बदलला, ते सगळं– सगळं सांग की !

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. २०४०५ नों. दि. १२/८/८४

**टिट्टू :** म्हणजे काय काय सांगू ? लग्नानंतर मी एकाही मैत्रिणीला भेटता कामा नये, ही तुझी अट सांगू ?

**प्रिया :** आपण लग्न करायचं ठरवलं, त्या वेळी अशी काही अट घालायची कल्पना तरी मला शिवली होती का ?

**टिट्टू :** त्या वेळी मला तुझ्याशिवाय कोणी मैत्रिणीच नव्हत्या.

**प्रिया :** मैत्रिणी नव्हत्या. कारण तुझ्याभोवती त्या वेळी शतकवीराचं तेजोवलय निर्माण झालं नव्हतं. दोन वर्षांत परिस्थिती कुठच्या कुठं बदलली. असंख्य मुली चारी बाजूंनी तुझ्याकडं झेपावल्या, तुझ्या त्या तेजोवलयाला दिपून.

**टिट्टू :** पुरुषांच्या पराक्रमावर स्त्रियांनी भाळावं हे स्वाभाविक नाही का प्रिया ?

**प्रिया :** निदान पुरुषांनी स्वतःच आपल्या पराक्रमावर भाळून जाऊ नये.

**टिट्टू :** तुला नक्की काय म्हणायचंय प्रिया ?

**प्रिया :** हेच निराळ्या शब्दात सांगते, यश तुझ्या डोक्यात गलंय.

**टिट्टू :** कशावरून ?

**प्रिया :** तुझ्या मैत्रिणींच्याकडे पाहण्याच्या तुझ्या बदललेल्या दृष्टिकोणावरून. स्त्री-पुरुषसंबंधाबद्दलची तुझी आताची मतं बाबांना आणि पपांना माहीत आहेत का ?

**टिट्टू :** मी त्यांना काय काय सांगावं अशी तुझी अपेक्षा आहे ?

**प्रिया :** उदाहरणार्थ, लग्नसंस्था ही केवळ कुरूप आणि दुबळ्या माणसांच्या भल्यासाठी निर्माण झालीय. पतिपत्नींच्यातली एकनिष्ठा हे निव्वळ थोतांड आहे. रतिसुखातल्या नव्या नवलाईसाठी सगळे स्त्रीपुरुष मनातून हपापले असतात. जे हे नाकारतात, ते एक षंढ तरी असतात नाही तर ढोंगी तरी असतात! संसार ही एक सोय आहे. पण नव्या नव्या मैत्रिणींच्या प्रेमात पडणं ही तुझी नैसर्गिक गरज आहे. स्त्री-पुरुष संबंधाला प्रेमाशिवाय कसलीही बंधनं असता कामा नयेत.

**टिट्टू :** हे– हे सगळं मी बाबांना सांगू म्हणतेस ?

**प्रिया :** जिला जन्माची जोडीदार म्हणून निवडलीस, तिला तू ही आपली मतं ऐकवलीस, मग बाबांना घाबरायचं काय कारण ? बाबांना सांग, पपांना सांग—

[ हे ऐकतच चिंतामणराव कपाळ बडवीत–"हॉरिबल! हॉरिबल!" असे किंचाळतच येतात. ]

**चिंतामणी :** मोस्ट हॉरिबल! काय भयंकर मतं आहेत ही. अरे तू मनुष्य आहेस का नरराक्षस आहेस ? अरे तू जनानखाना स्थापन करायला निघाला आहेस की काय ?

**टिट्टू :** उगीच ओरडू नका पपा, माझी मतं म्हणजे काही माझं चरित्र नव्हे. तसं माझं चारित्र्य अजून तरी स्वच्छ आहे.

**चिंतामणी :** अहाहा ! ते काय विचारावं ! तुझ्या ढीगभर मैत्रिणींच्या चरित्रात

तुझ्या चारित्र्याची गटारगंगा भरभरून वाहताना मी बघतोय रोज, म्हणून बरं.

**टिटू :** तुम्ही माझ्यावर कसलेही घाणरडे आरोप केलेत तरी किरकोळ कधीमधी चुंबनालिंगनाशिवाय मी माझ्या कोणत्याही मैत्रिणीशी कधीही अतिप्रसंग केलेला नाही !

**चिंतामणी :** अरे वा रे वा ! बाळब्रह्मचारीच तू ! चुंबनालिंगन किरकोळ काय ? अगदी शुद्ध सात्त्विक भावच असेल. वर निर्लज्जपणं सांगतो आहेस तू हे, तुझ्याएवढा बेशरम तरुण या दुनियेत नसेल कोणी !

**टिटू :** त्या गप्पा कशाला मारताय ? दुनियेतले तरुण, जे चोरूनमारून करतात ते मी उघडपणं बोलून दाखवतो, एवढाच फरक आहे.

**चिंतामणी :** अरे पण चांडाळा, उद्या तुझी बायको तुझ्या नाकावर टिच्चून घरीदारी मित्रांचा घोळका जमवायला लागली तर ?

**प्रिया :** त्याला त्याची कुठं हरकत आहे ?

**चिंतामणी :** ( मटकन बसत ) होय का ? म्हणजे यानं कमरेचंच सोडून डोक्याला गुंडाळलंय म्हणायचं ! कोण गुरू भेटला बाबा तुला हे नीतिशास्त्र शिकवणारा ?

**टिटू :** तुम्ही एकदा बरट्रँड रसेलचं 'मॅरेज अँड मॉरल्स' वाचा पपा.

**प्रिया :** त्याच्यापूर्वी तूच एकदा रसेल वाच. अर्धवट नाही, सगळा.

**चिंतामणी :** आता मला काहीएक वाचायची इच्छा उरली नाहीये. एका जालीम डोसामुळं मस्तकात आज झाला एवढा स्फोट मला मरेपर्यंत पुरेल !

**टिटू :** हा जनरेशन गॅपचा परिणाम आहे पपा ! तुम्हाला ते कळणार नाही.

**चिंतामणी :** पण मला कळत नाही, याचं हे भयंकर नीतिशास्त्र ऐकूनसुद्धा या कारट्या याच्यावर भाळतात कशा ? बाकी तुला विचारण्यात काय अर्थ आहे म्हणा. तू नाही भाळलीस ?

**प्रिया :** मी भाळणारी असते तर पपा, टिटूशी केव्हाच माझं लग्न झालं असतं. माझं टिटूवर प्रेम आहे. म्हणूनच त्याची ही मतं कायम आहेत तोपर्यंत मी त्याच्याशी कधीही लग्न करणार नाही.

**चिंतामणी :** तेवढंच नाही प्रिया. या हरामखोराला 'किरकोळ' आणि 'कधी-मधी' अंगाला हातसुद्धा लावू देऊ नकोस.

**प्रिया :** त्याच्यामुळं त्याचं काही अडलं नाही आणि अडणार नाही. बाकीच्या भक्तिणी आहेत की रगाड सगळी हौस पुरवायला.

[ तोच ताजेतवाने झालेले बिंदुमाधवराव येतात. येता येता विचारतात– ]

**बिंदुमाधव :** कोठल्या भक्तिणी ? कशाची हौस ? काही तरी जोरात चर्चा झालेली दिसतेय बापलेकांची. विषय गाडीचा होता वाटतं ?

**चिंतामणी :** गाडीचा नाद मी सोडलाय आता. खरं म्हणजे सगळ्याबद्दलच

मला विरक्ती यायला लागलीय. ( दारावर घंटा वाजते, तशी– )

**टिट्** : बहुतेक गोश्याच गाडी घेऊन आलेला दिसतोय. ( पुढं होऊन दार उघडतो, तो " आनंद ! आनंद ! " असं हर्षभरानं म्हणत फुलं उधळीत येते गौरी, आणि तिच्या पाठोपाठ शिवाजी. दोघांची वेशभूषा बघून सगळे चाटच होतात. गौरीनं पायघोळ भगवी कफनी घातलीय. गळ्यात रुद्राक्षांची माळ, केस मोकळे सोडलेले. तर शिवाजीनं पांढऱ्या पँटवर भगवा बुशशर्ट घातलाय, त्याच्याही गळ्यात रुद्राक्षांची माळ. )

**बिंदुमाधव** : कोण गौरे ? तू ? काय ग तुझा हा वेश ? जोगीण झालीसं की काय ?

**टिट्** : शिवाजी तू ? भगव्या मॅनिल्यात ? अरे काय विचार काय आहे तुझा ? टेस्ट मॅच खेळणार आहेस ना ?

**शिवाजी** : मायावतीचा आग्रह होता... मीही म्हटलं कोठला तरी रंगीत बुशशर्ट चढवायचा तो भगवा घेतला.

**गौरी** : मी सांगते. बाबा, भगवानांनी मला बढती दिली. म्हणजे ब्रह्मसाक्षात्काराच्या चार पायऱ्या असतात ना– म्हणजे बद्ध, मुमुक्षू, साधक आणि सिद्ध; त्यांतल्या दोन अवस्था संपवून आजपासन भगवानांनी मला साधकावस्थेत प्रवेश दिलाय. साधकाला असाच वेश करावा लागतो.

**बिंदुमाधव** : आणि या छत्रपतींचं काय ?

**शिवाजी** : मी अजून बद्धावस्थेतच आहे. केवळ या म्हणाल्या म्हणून मी हा भगवा मॅनिला—

**बिंदुमाधव** : नाही ते बरं केलंत शिवाजीराजे. पण आता तुम्ही पायऱ्या वर चढण्याऐवजी या भवानीलाच खाली खेचा. म्हणजे चर्चा करा. काऽय ? सतत भेटीगाठी होतात ना ?

**शिवाजी** : आत्तापर्यंत तरी होताहेत. पण यापुढं मात्र कठीण होणारंय.

**गौरी** : बाबा, पपा, एक अत्यानंदाची वार्ता...

**चिंतामणी** : मला सांगू नकोस. माझं नावसुद्धा घेऊ नकोस. मला तुझं काहीएक पसंत नाहीये. काय अवतार....काय वेश....सगळा बेतालपणा चाललाय. तू माझी मुलगी आहेस म्हणून सांगायचीसुद्धा लाज वाटेल मला यापुढं. तुझा भगवान स्वामी कुठाय ?

**गौरी** : इश्य– असं काय हो बोलता पपा ? तुम्हाला भेटायसाठी तर घरी येताहेत भगवान. मी सांगायला पुढं आले.

**चिंतामणी** : माझ्याकडं काय काम आहे तुझ्या भगवानांचं ?

**गौरी** : भगवान अमेरिकेला निघालेत. तिथं ठिकठिकाणी 'प्रेमानंद डिव्हाइन मिशन'च्या शाखा स्थापन करणार आहेत भगवान.

**चिंतामणी** : खुशाल काढा आणि तिकडंच कायमचे राहा म्हणावं त्यांना!
**गौरी** : भगवानांनी बरोबर मला घेऊन जायचं ठरवलंय. त्यासाठीच ते तुम्हाला सांगायला येताहेत.
**टिट्रू** : तू काय ठरवलं आहेस ?
**चिंतामणी** : तिनं काही ठरवण्याचा मुळी प्रश्नच उद्भवत नाही. तिनं जाता कामा नये. परवानगी मिळणार नाही!
**गौरी** : का म्हणून ? माझी मी स्वतंत्र नाहीये ?
**टिट्रू** : विचारायला तुला काही वाटत नाही का ग ? तू एकटी जाऊन राहणार आहेस का त्या स्वामीबरोबर ?
**गौरी** : का ? त्याला काय हरकत आहे ?
**चिंतामणी** : लोक शेण घालतील आमच्या तोंडात.
**टिट्रू** : तर काय ? आधीच तुझ्याबद्दल गावभर लोक बोंब मारताहेत. त्यात पुन्हा त्या स्वामीबरोबर एकटी—
**प्रिया** : अहो महाशय, हे– हे बोलण्याचा तुम्हाला काय अधिकार पोचतो ? लोक तुमच्याबद्दल काय काय बोलतात त्याचा शोध घेतलाय का कधी ?
**टिट्रू** : माझी गोष्ट वेगळी आहे प्रिया. गौरी एक मुलगी आहे. सभ्य घरातली मुलगी आहे. माझी बहीण आहे.
**प्रिया** : तुझ्या मैत्रिणी कोणत्या तरी सभ्य घरातल्याच असतात ना ? त्याही कोणाच्या तरी बहिणी लागतातच ना ?
**टिट्रू** : हे बघ, या स्वामीसारखं मी माझ्या मैत्रिणींना काही घराबाहेर काढीत नाही की त्यांना घेऊन देशान्तराला जात नाही.
**प्रिया** : मुलींना धोका द्यायला घराबाहेर काढावं लागत नाही की परदेशी न्यावं लागत नाही. बसल्या जागी त्यांचं पुरतं कल्याण करता येतं!
**गौरी** : कशाला वाद घालताय उगीच मला साधकावस्था लाभल्यापासून माझी सगळी नाती गोती तुटली आहेत. मी भगवानांच्या चरणी समर्पित आहे.
**चिंतामणी** : मग कारटे, लग्न तरी कर त्या फुरसुंग्याशी.
**गौरी** : छी छी... काही तरी घाणेरडं बोलू नका हो पपा. भगवान विरक्त संन्याशी. मोदेवील संन्यासमार्गावरली एक प्रवासिनी. प्रपंचाच्या डबक्यात वळवळणारे किडे आहोत का आम्ही ?
**चिंतामणी** : घ्याऽऽ, ऐका बाबा हिची मुक्ताफळं. आम्ही प्रपंचाच्या डबक्यात वळवळणारे किडे. छान. काय नररत्नं जन्माला आली आहेत आमच्या घरात. सुमंगल, आधी बाहेर ये.
[ सुमंगला लगबगीनं बाहेर येते आणि– ]
**सुमंगल** : ( विस्मयानं ) अग्गोबाई... गौरे, तूच का ग ही ? हा काय नवा

अवतार काढलास आणखी ?

**चिंतामणी :** त्या अवताराची चर्चा मागाहून करा. हिचा भगवान अमेरिकेला जातो आहे, आणि बरोबर तो तुझ्या मुलीला घेऊन जाणार आहे !

**सुमंगल :** ( कौतुकानं ) होय का ग ? कॉंग्रॅच्युलेशन्स...

**चिंतामणी :** ( कपाळावर हात मारीत ) कर्म माझं ! अभिनंदन कसलं करतेस बोडक्याचं तिचं ? तिला एकटीला त्या बोक्याबरोबर पाठवणार आहेस का तू ?

**सुमंगल :** असं म्हणता होय ? हे नव्हतं माझ्या लक्षात आलं. आपण असं करूया, गौरे, मीही येते की सोबतीला तुझ्याबरोबर. नाही तरी स्टेटस्‌ला मी जायचं म्हणतच होते केव्हापासून. भगवानांना तू सांग, माझी आईसुद्धा येणार आहे बरोबर म्हणून. ते काही नको म्हणायचे नाहीत. काय हो ?

**चिंतामणी :** बाबा, या बेहद्द महामूर्ख बायांना काय सांगायचं आता ?

**बिंदुमाधव :** ( थंडपणे ) काहीएक सांगू नकोस. सूनबाई, आता या आनंद-यात्रेत सासूबाईंचीही वर्णी लावून घे म्हणजे झालं. आम्ही सगळे बापये बसतो घरी ' हरे कृष्ण हरे राम ' करीत ! काय टिटोबा ?

**टिटू :** ममी, बाबांना आणि पपांना पसंत नाहीये गौरीनं त्या स्वामीच्या बरोबर एकटीनं जाणं. तुला ते बरोबर काय म्हणून नेतील ? ती काय राजा ट्रॅव्हलची टूर आहे ?

**सुमंगल :** बघा बाई ! मला सरळ दिसलं ते मी बोलले. इतके छक्केपंजे त्यात दडले आहेत हे मला कसं कळायचं ? मनात आहे ते माणसानं सरळ सांगावं. उगीच चीड चीड चिडायचं म्हणजे काय ?

**चिंतामणी :** ( रागानं ) हे बघ, तुम्ही दोघी शाहाण्या आहात. तुम्हाला जे योग्य वाटेल ते करा. मला छळू नका आणि मला काहीएक विचारू नका. (बाहेर जाऊ लागतो, तशी— )

**सुमंगल :** अहो कुठं निघालात ?

[ चिंतामणराव बाहेर जाण्यासाठी दार उघडतात, तो समोर उभे साक्षात प्रेमानंदस्वामी फुरसुंगीकर. स्वामीजी पुढं होत मधुर हसून एक ऋचा म्हणतात. मग—]

**स्वामी :** डोन्ट वरी माय फ्रेंड.... बॅंकेतलं प्रकरण परस्पर निस्तरलं जाणार आहे. तुमच्यावर काहीसुद्धा ठपका येणार नाहीये.

**सुमंगल :** अगबाई ! कसलं प्रकरण ? [ स्वामीजी हात वर करून सर्वांना गप्प राहण्याचा इशारा देतात. ]

**चिंतामणी :** ( चाट होत ) स....स... स्वामीमहाराज.... भगवान, तुम्हाला काय ठाऊक ते प्रकरण ? [ त्यांच्या हाताला धरून एका आसनापाशी आणीत स्वामीजी म्हणतात—" छोटीशी बात आहे. सिद्धी प्राप्त केली की सगळं कळतं.

बसा बसा चिंतामणराव. रीलॅक्स!" [त्यांना बळानं बसवतात; मग आपला हात फिरवून ओवाळीत अंगारा काढून लावतात आणि खिशातून प्रसाद काढून म्हणतात—"आ करा चिंतामणरावजी... देवीचा प्रसाद आहे..." त्यांच्या तोंडात गूळखोबरं टाकतात. "डोळे मिटा आता" कोचावर मान मागं टाकून चिंतामणराव डोळे मिटतात. स्वामीजी त्यांच्या डोक्यावर हात ठेवीत काही मंत्र पुटपुटतात. क्षणभरानं हात काढतात...आणि ]

**स्वामी :** कसं वाटतंय मिस्टर सरनोबत आता ?

**चिंतामणी :** (नवा उत्साह संचारल्यागत) फॅंटास्टिक! (एकदम पाय धरीत) भगवान! मी धन्य आहे. तुमच्या हातात दैवी शक्ती आहे.

**स्वामी :** ठीक आहे चिंतामणरावजी, गो अँड रीलॅक्स....

**टिट्टू :** हूं ऽ! हिप्नॉटिझमचा प्रकार आहे हा. माझा नाही विश्वास बसत.

**स्वामी :** यंग मॅन, तुझा विश्वास बसणार आहे, तू कॅप्टन झाल्यावर.

**प्रिया :** तुम्हाला काय माहीत याच्या कॅप्टनशिपबद्दल वाद निर्माण झालाय ते ?

**टिट्टू :** सगळया दुनियेला ठाऊक आहे ते प्रिया.

**स्वामी :** तरीदेखील तू कॅप्टन होणार आहेस, हे मलाच ठाऊक आहे.

**टिट्टू :** बघू या की.

**सुमंगल :** टिऱ्या...टिऱ्या.... मेल्या एवढा पाखंडीपणा बरा नव्हे.

**स्वामी :** माताजी, श्रद्धेच्या बाबतीत सक्ती नाही करायची. श्रद्धेचं फूल आपो-आप उमलतं. वाट पाहायची. चिंतामणरावजींना घेऊन चला. लेट हिम् रीलॅक्स.

**सुमंगल :** स्वामीजी... भगवान.... एक मागणं मागायचं....

**स्वामी :** माताजी, आदिमाया माझ्याबरोबर अमेरिकेत येणार; हे ठरलंय.

**सुमंगल :** माझी त्याला हरकत नाही. पण मी म्हणते, तिला सोबत म्हणून मी—

**स्वामी :** नाहीऽऽ! तो अधिकाराचा भाग आहे. तो आध्यात्मिक अधिकार मिळवा आणि मग या. तूर्त—

**चिंतामणी :** (उठत) भगवानांशी वाद घालू नकोस सुमंगल. देवाचाच अवतार आहेत ते. [ सुमंगला आणि चिंतामणराव आत जातात. ]

**बिंदुमाधव :** गेला...गेलाऽऽ....साफ बुडाला! भगवानराव, तुमचा अंगारा आम्हाला लावा आणिक थोडासा प्रसादही द्या की.

**स्वामी :** तो अधिकार श्रद्धावन्तांचा आहे इतिहासाचार्य.

**बिंदुमाधव :** निदान आमच्या डोक्यावर हात ठेवायला काय हरकत आहे भगवान ?

**स्वामी :** त्यासाठीदेखील अन्तःकरण श्रद्धामय असावं लागतं. तुम्ही अगोदर भाविक व्हा, साधक व्हा, मग सगळं मिळेल.

**बिंदुमाधव :** ते मात्र कठीण आहे. एनी वे, यू हॅव स्कोअर्ड ओव्हर मी. काय

टिट्टू, बघता बघता भगवंतांनी आपल्या घरातल्या चार विकेटस् घेतल्या की. प्रथम गौरी, मग गोट्या, मग तिची आई, मग तुझे वडील. राहता राहिलास फक्त तू.

**टिट्टू** : बाबा, माझी विकेट अशी सहजासहजी पडायची नाही.

**विंदुमाधव** : अरे छोडो यार. तुझी विकेट तर एकदम ठिसूळ. फुंक मारली तरी तीन ताड उडेल. शकून, मुहूर्त आणि भविष्य पाहिल्याशिवाय क्रिकेटवाले, नाटकवाले आणि सिनेमावाले यांचं एक पान तरी हालतं का रे ?

**स्वामी** : बरोबर बोललात इतिहासाचार्य.

**विंदुमाधव** : म्हणून तर तुमच्यासारख्यांचं फावतं भगवान.

**स्वामी** : मी समजलो नाही इतिहासाचार्य.

**विंदुमाधव** : काही बिघडत नाही. समजून घेण्यासारखी गोष्ट वेगळी आहे. मिस्टर भगवान, तुम्ही आमच्या गौरीला, अर्थात तुमच्या आदिमायेला घेऊन स्टेटस्ला जाता आहात, उत्तम गोष्ट आहे. तिथं तुम्ही दोघं डिव्हाइन मिशनच्या शाखा उघडणार आहात हीसुद्धा भाग्याची घटना आहे. तुमच्यासमवेत तुमची आदिमाया म्हणजे दुग्धशर्करा योगच की. फक्त एक बारीकशी अडचण आहे. त्याबद्दल तुम्ही काय उपाययोजना करायची ठरवली आहेत तेवढं सांगा.

**प्रेमानंद** : कोणती अडचण म्हणता इतिहासाचार्य ?

**विंदुमाधव** : भानगड अशी झालीय भगवानसाहेब, या आमच्या गौरीला लहानपणी, एका आन्तरराष्ट्रीय चित्रस्पर्धेत रशियन सरकारकडून एक बक्षीस मिळालं होतं. वर्तमानपत्रांनी गाजावाजा करून खूप कौतुक केलं होतं तिचं. आठवतंय ना बेटी ?

**गौरी** : त्या वेळी मी लहान होते बाबा. मला काही कळत नव्हतं. भगवानांचा अनुग्रह झाल्यापासून मी तसल्या त्या अज्ञानातून मुक्त झालेय.

**विंदुमाधव** : तू मुक्त झालीस. पण सरकारदरबारी– म्हणजे अमेरिकेच्या– हो, तुझ्यावर ' कम्युनिस्ट ' म्हणून जो शिक्का मारला गेलाय, तो असा सहजासहजी थोडाच पुसला जाणार आहे ?

**प्रेमानंद** : ( अस्वस्थतेनं ) इतिहासाचार्य, तुम्हाला म्हणायचंय काय ?

**विंदुमाधव** : अहो भगवानजी, हिला व्हिसा कोण देईल ? उलट तुमचा व्हिसा रद्द होईल हिच्यामुळं. काही लक्षात येतंय का ?

**प्रेमानंद** : ( घाबरून ) असं म्हणता ऽ ? पण हे तुम्हाला कसं ठाऊक ?

**विंदुमाधव** : तुम्ही विसरलात भगूआण्णा, मी सरकारमान्य इतिहास संशोधक आहे. मला सगळी दप्तरं खुली असतात. त्यातून तुम्ही मॉस्कोला विश्वधर्म परिषद घेण्याची धडपड केल्यापासून तर—

**प्रेमानंद** : त्यात काही तथ्य नाही हो. मॉस्कोला आम्हाला कोण येऊ देतो ? ती

नुसतीच बडबड होती.

**बिंदुमाधव :** पण तेवढ्यानं केवढी गडबड उडाली अमेरिकेत ?

**प्रेमानंद :** ( घाबरून ) असं का ? असेल.... असेल.... मग तुम्ही काय सल्ला देता ?

**बिंदुमाधव :** तूर्त सल्ला इतकाच, की अमेरिकन सरकारच्या दृष्टीनं या संशयित चारित्र्याच्या मुलीला तुम्ही तुमच्या प्रवासातून वगळा.

**प्रेमानंद :** वगळलऽऽ! ( निःश्वास टाकीत ) मग तर झालं ?

**गारी :** ( आवेशानं ) नाही नाही... भगवान, मी येणार.... मी येणार! माझ्याशिवाय तुमची व्यवस्था कोण पाहणार ? तुम्हाला मदत कोण करणार ?

**बिंदुमाधव :** (प्रियाला डोळे मिचकावून इशारा करीत) आता तुम्हाला बरोबर कोणी तरी स्त्री चिटणीस म्हणून न्यायचीच असेल तर ही आमची प्रिया मोकळी आहे. तिला घेऊन जा.

**स्वामी :** अरे वा वा वा.... ( खुलून ) फारच उत्तम. आदिमाया इथल्या आश्रमाकडं पाहील, ही सरस्वती आमच्या सहवासात राहील.

**टिटू :** ( उसळून ) काही तरीच काय सुचवताय बाबा ? प्रिया या स्वामीची शिष्या होऊन अमेरिकेला जाणार ? कधी तरी शक्य आहे ?

**बिंदुमाधव :** ते तिला ठरवू दे. तू का उगाच शिरा ताणतो आहेस ?

**प्रिया :** (हसून) स्वामीजी, तुमची शिष्या म्हणून नव्हे, पण तुमची मैत्रीण म्हणून येईन मी.

**स्वामी :** काही हरकत नाही. गुरुशिष्य संबंध मैत्रीच्याच राजरस्त्यावरून जातात. मैत्रीण म्हणून ये, पण नक्की ये

**टिटू :** मला हे पसंत नाहीये प्रिया. तुझं डोकं-बिकं तर फिरलं नाही ?

**प्रिया :** फिरलं असलं तरी त्याच्याशी तुझा काय संबंध ? केवळ मैत्रीमध्ये आपली पसंती-नापसंती मित्रानं मैत्रिणीवर लादायची नसते; होय किनई बाबा ?

**बिंदुमाधव :** बरोबर बोललीस.

**स्वामी :** तर मग प्रिये सरस्वती, उद्या सकाळी नऊ वाजताच आमच्या आश्रमात येऊन मला भेट.

**प्रिया :** आनंदानं येईन स्वामीजी. [ स्वामीजी जातात. ]

**टिटू :** यू आर अ डॅम ब्लडी फूल—

**बिंदुमाधव :** अरे अरे! तुला एवढं खवळायला काय झालं ? [ तोच फोन वाजतो. तशी रिसीव्हर उचलीत ] हलोऽऽऽ... मी सरनोबत... तुम्हांला नेमके कोणते सरनोबत हवेत ?.... हां, तर मग मी त्याच्या बापाचा बाप.... बिंदुमाधवराव.... आपण ? ... ओ हो, धवलगिरीच्या प्रिन्सेस चंद्रावती राजे ? नमस्ते नमस्ते....

**टिटू :** ( धावून जवळ जात, बसक्या स्वरात ) खुद्द चंद्रावतीराजे बोलताहेत ? अहो त्यांचे वडील उदयसिंहराजेच कंट्रोल बोर्डाचे अध्यक्ष आहेत.

**बिंदुमाधव :** ( फोनमध्ये ) उदयसिंहराजांची तब्येत कशी आहे ?.... नाही, रेसकोर्सवर फार दिवसांत भेटले नाहीत म्हणून विचारलं—

**टिटू :** ( दबक्या स्वरात ) बाबा, काऽय हे ?

**बिंदुमाधव :** ते– ते सगळं सोडून दिलंय ? बरं झालं; मी त्यांना सतत तेच सांगत होतो. हूं. इकडं बोला. ( रिसीव्हरवर हात ठेवून टिटूपुढं करीत ) एक गुगली टाकल्याबरोबर कसा लोण्याचा गोळयासारखा कॅच दिला बाईनी. ( फुदकन हसत ) घेऽऽ!

**टिटू :** –(रिसीव्हरमध्ये ) हॅलो....मी टिटू सरनोबत....नमस्ते देवीजी..हूं ... हूं....छे छे, तुमची ओळख कशी विसरेन मी ?... नाही नाही, तसं काही नाही... सारख्या मॅचेस चालल्या आहेत ना, म्हणून जमलं नाही... पण आता नक्की येईन... ऊं ?.... सर्प्राइझिंग न्यूज...? काही कल्पना चालत नाहीये माझी... हो, माझं नाव प्रपोज होणार आहे एवढंच कळलं होतं मला.... नाही नाही... बोर्डातलं पॉलिटिक्स ठाऊक आहे मला.... नबाब सिराजसाठी खूप प्रेशर आलंय असं ऐकतोय मी.... हूं....हूं... मग फायनली कोणाची निवड झाली ?.... माझीऽ? ओ, डोन्ट कट अ ज्योक....खरंच ?... तुम्हाला कसं कळलं ?.... माय गॉड.... (रिसीव्हरवर हात ठेवीत) बाबा, प्रिया, शिवाजी,– माझी कॅप्टन म्हणून निवड झाली! जस्ट वेट (पुन्हा फोनमध्ये) ही अगदी पक्की ऑफिशियल बातमी ना ?...नो नो.... डोन्ट टेक इट दॅट वे... नाही नाही... चीफसाहेबांचा मी फार ऋणी आहे त्याबद्दल...हूं... हूं....हूं.... याचा अर्थ,– देवीजी, हे सगळं तुमच्या खटपटीचं फळ आहे... आय ॲम एक्स्ट्रीम्ली ग्रेटफुल टु यू.... तुम्ही म्हणाल ते... आज तुम्ही मागाल ते देईन.... हो, मोकळाच आहे. जरूर जरूर... तासाभरात येतो मी.... ओके. पुन्हा एकदा थँक्स हं... [ फोन खाली ठेवतो. तशी बिंदुमाधवराव, प्रिया, गौरी, शिवाजी त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करतात. प्रिया–" ब्रॅहो टिटूऽऽ हिप हिप हुरा." ओरडत त्याचे हात धरून नाचते. गौरी तर ' ममी....पपाऽ ' अशी हाक मारीत आत धावते. ]

**टिटू :** आता माझा पराक्रम पहाच बाबा तुम्ही! मी या दिवसाची वाट बघत होतो डोळ्यात प्राण आणून.

**गौरी :** आता तरी प्रचीती आली ना भगवानांच्या सिद्धीची.

**प्रिया :** प्रचीती आलीय मला, पण ती तुमच्या भगवानांच्या सिद्धीची नाही. चंद्रावतीराजांच्या माझ्याबद्दलच्या आपुलकीची,– आणि त्यांच्या शब्दाला केवढं वजन आहे त्याची. बाबा, आय टेल यू, शी इज अ फॅंटास्टिक लेडी–, सच अ स्वीट अन् चार्मिंग पर्सन... तुम्हाला कल्पना आहे, ती प्रत्येक मेंबरला पर्सनली

जाऊन भेटलीय माझ्यासाठी...!

**शिवाजी** : पण म्हणजे कंट्रोलबोर्डाच्या मीटिंगमध्ये घडलं तरी काय काय?

**टिटू** : त्या डीटेल्स आज रात्री समजतील मला.

**प्रिया** : आज रात्री म्हणजे?

**टिटू** : सन् अ‍ॅड सॅण्ड्समध्ये चंद्रावतीदेवींनी डिनरसाठी बोलावलंय मला.

**प्रिया** : पण ते कसं शक्य आहे? आज आपण जाणार आहोत ना—

**टिटू** : छे छे... तो बेत आता रद्द.

**प्रिया** : बेत रद्द? टिटू ऽऽऽ —

**टिटू** : आय अ‍ॅम सॉरी प्रिया, आपण पुन्हा कधी तरी जाऊ. चंद्रावतीदेवींचं निमंत्रण म्हणजे काय साधी गोष्ट वाटली तुला? अगं इट्स अ ग्रेट इव्हेन्ट.... आय हॅव गॉट टु ऑनर इट!

**बिंदुमाधव** : अरे चंद्रावतीराजांना उद्या-परवाची वेळ दे. आज तुझ्यासाठी प्रिया इथं आलीय तर—

**शिवाजी** : मलाही वाटतं टिटू, निकाल ऑफिशियली तुला जेव्हा कळेल तेव्हाच तू—

**टिटू** : नो नो...असं कसं करता येईल? चंद्रावतीदेवींना मला नाराज करून कसं चालेल? त्यांनी माझ्यासाठी इतकं हे केलंय तर—

**बिंदुमाधव** : डोकं थंड ठेव बेटा, देहली तो बहोत दूर है.

**टिटू** : नाही बाबा, आय अ‍ॅम ऑन द टॉप ऑफ द वर्ल्ड.

**प्रिया** : बाबा, जाणाऱ्याचे पाय पकडता येतात, पण मन धरता येतं का?

**टिटू** : मला समजून घ्यायचा प्रयत्न कर प्रिया—(घड्याळात पाहात) ओ गॉड!...मला निघायच्या तयारीला लागायलाच हवं. [तेवढ्यात दारावरची घंटा वाजते. तशी—] गाडी घेऊन बहुतेक हा गोव्याच आला.

[दार उघडतो तो हार हातात घेऊन समोर तुकाराम उभा.]

हे रे काय तुकाराम?

**तुकाराम** : (त्याच्या गळयात हार घालीत) तुम्ही कॅप्टन झाल्याचं कळलं आत्ताच. सगळ्या स्टाफला आनंद झालाय. स्टाफच्या वतीनं आपलं खूप खूप अभिनंदन टिटूसाहेब—

**टिटू** : अरेऽऽ च्या! म्हणजे कमालच झाली! इतक्यात फोनवरून मला कळलं. तुला केव्हा कळलं? स्टाफला कसं समजलं?

**तुकाराम** : म्हणजे काय साहेब? फोन इथं लागतो तेव्हाच खाली साहेबांच्या केबिनमध्येसुद्धा लागतो की, तिथंच आम्ही सगळं ऐकलं.

**टिटू** : काय सांगतोस काय तुकाराम तू? या फोनवरचा सगळा संवाद ऐकला तुम्ही लोकांनी?

**तुकाराम :** तर काय ? तुम्हाला येणारे सगळे फोन ऐकण्यासाठी साहेबांनी तशी स्पेशल व्यवस्थाच करून घेतलीय की ऑफिसात.

**टिट्रू :** तुम्ही सगळे ग्रेट आहात ग्रेट !

[ तेवढ्यात कमळजाबाई पदराला हात पुसत दारातूनच डोकावून म्हणतात — ]

**कमळजा :** टिट्रू, तुम्ही दोघे थोडी मटाराची उसळ खाऊन जाल ना रे ?

**विंदुमाधव :** जाल ना ? कुठं ' जाल ना ' ?

**कमळजा :** इश्य, म्हणजे काय ? दोघं जेवायला जाताहेत ना बाहेर ?

**विंदुमाधव :** अहो आजी, कोणत्या युगात वावरताहात तुम्ही ? तो– तो त्रेतायुगातला बेत होता. लेटेस्ट बुलेटिन असं आहे की, टिट्रू एकटाच दुसऱ्या एका मैत्रिणीबरोबर जेवायला जाणार आहे.

**कमळजा :** दुसरी मैत्रीण ? कोण दुसरी मैत्रीण ?

**विंदुमाधव :** धवलगिरी संस्थानच्या राजकन्या चंद्रावतीदेवी ऽऽ !! बघतेस काय अशी ? आपला टिट्रू भारतीय संघाचा कॅप्टन झाला. चंद्रावतीराजांच्या खटपटीमुळं. त्यामुळं आज रात्री त्याच्या सन्मानार्थ हर चार्मिंग स्वीट हायनेस चंद्रावतीदेवी, जुहूच्या सन ॲन्ड सॅंडसमध्ये पार्टी देताहेत, अथवा तो त्यांना पार्टी देतोय– त्यांच्या लटपटी खटपटीप्रीत्यर्थ.

**कमळजा :** एवढंच ना ? मग प्रियाला घेऊन जा म्हणावं बरोबर.

**टिट्रू :** ( गडबडून ) छे छे, असं कसं करता येईल ?

**विंदुमाधव :** तर काय.... ते काय मेहुण जेवायला जायचंच ? आजीबाई, आजचा जमाना असा आहे की, एकेका तरुणाच्या हृदयात शेकडो तरुणी नांदत असल्या, तरी मौजमजेच्या पंगतीला, संगतीसाठी एका वेळी एकच मैत्रीण लागते. आपली प्रिया म्हणजे एक मास्तरीण. तिचा एका राजकन्येपुढं काय पाड ? टांग्याचा घोडा कधी शर्यतीच्या घोड्याबरोबर धावू शकेल ? हॅऽऽ !!

[ टिट्रू अवाक होऊन बघू लागतो. ]


**कमळजा :** अहो पण मी म्हणते—

**विंदुमाधव :** ( दरडावीत ) चुप ! काहीएक म्हणू नका. तुम्हाला ते– ते कळायचं नाही. खरंय ना टिट्रू ? ( डोळे मिचकावीत हळूच ) मला तरी कुठं कळलंय ? कारण— जनरेशन गॅप ! आपल्या बाबतीत तर दोन पिढ्यांची !

[ हसत असतानाच फ्रीज होतात – पडदा ]

## अंक दुसरा संपला

# अंक तिसरा




अंक तिसरा

# अंक तिसरा

[ सुमारे तीन महिन्यांचा काळ उलटला आहे. वेळ सकाळी दहा वाजण्याची. तोच हॉल. पण आता या हॉलमध्ये एका भिंतीवर भगवान प्रेमानंदस्वामी फुरसुंगीकर महाराजांची तसबीर लावलेली आहे. तिला चंदनाचा हार घातलेला आहे. खाली टेबलावर पूजेचं तबक ठेवलं आहे. त्यात हळद कुंकू, गंध अक्षता, कापूर उदबत्ती, फुलं इत्यादी पूजासाहित्य ठेवलं आहे. पडदा वर जातो, त्या वेळी टेप-रेकॉर्डरवर कोठल्याशा समूहानं गायलेल्या भक्तिगीताची कॅसेट लावलेली ऐकू येते आहे. क्षणभरानं आतून एका हातात पोर्टफॅटो आणि दुसऱ्या हातात रेशमी वस्त्रात बांधलेली प्रसादाची पुडी घेऊन लगबगीनं चिंतामणराव येतात आणि घड्याळात (मनगटावरच्या) नजर टाकीत लगबगीनं टेप रेकॉर्डर बंद करीत, तसबिरीची पूजा करू लागतात. त्यांची वेषभूषा पाहताच त्यांच्यात पडलेला आध्यात्मिक बदल चटकन लक्षात येतो. बुलनच्या रंगीत पँटवर त्यांनी भगव्या रंगाचा गुरू शर्ट चढवला आहे. कपाळाला भस्म, गंधाचा टिळा आणि गळयात रुद्राक्षांची माळ – या माळेत प्रेमानंदस्वामींचा फोटो असलेलं लॉकेट. पायात अर्थातच नुसतेच पायमोजे. बूट एका आसनासमोर ठेवलेले. पूजा करता करता– ]

**चिंतामणराव :** (इकडं तिकडं शोधत) सुमंगलाऽऽ

[ आतून "आल्येऽऽ" अशी ओ देत सुमंगला लगबगीनं हातात नीरांजन घेऊन येते आणि– ]

**सुमंगल :** हे नीरांजन.... ज्योत लावा.

**चिंतामणी :** अग पण गुलाबपुष्पांचा हार कुठाय ?

**सुमंगल :** बघा बाई, मला काय ठाऊक ? (पाहात) तुकाराम घेऊन यायचा विसरलेला दिसतोय.

**चिंतामणी :** हूंऽऽ! रागवायचं नाही म्हटलं तरी माणसं अगदी सत्त्वपरीक्षा पाहतात. भगवानांच्या तसबिरीला ताज्या गुलाबपुष्पांचा हार घालून पूजा केल्याखेरीज मी सकाळी बँकेत पाऊल टाकत नाही. गेल्या तीन महिन्यांपासून माझा तसा नेम आहे, हे शंभर वेळा बजावून सांगितलंय मी त्याला, तरी—

**सुमंगल :** एखाद दिवस नसला मेला गुलाबाचा हार तर त्यासाठी इतकं आकाश पाताळ एक करायची गरज आहे का ? मी म्हणते, ही फुलंसुद्धा

ताजीच आहेत, त्यावर भागवून घ्यावं आजच्या दिवस.

**चिंतामणी :** ते ओघानं आलंच आता. ( हात जोडीत तसबिरीला ) भगवान, सायंकाळपर्यंत गुलाबाचा हार येईल. तोपर्यंत या फुलावर भागवून घ्या. ( पूजा करू लागत ) मी पूजा आटोपतोय तोवर सगळ्या मंडळींना तीर्थ प्रसादासाठी बोलाव.

**सुमंगल :** सगळी मंडळी म्हणायला आहेत कुठं कोण घरात ? गोट्या, आजोबा आजींना घेऊन त्यानं काम केलेल्या सिनेमाच्या प्रीमियर शोला गेलाय. गौरी जे. कृष्णमूर्ती म्हणून कोणी जगप्रसिद्ध स्वामी आलेत मुंबईत, त्यांच्या प्रवचनाला गेलीय.

**चिंतामणी :** बस्स का ? आता भगवानांचा भाव उतरला वाटतं तिच्या हिशेबी ? छे छे छे.... ही सगळी कच्ची मडकी अशीच फुटणार. गुरू बदलून कुठं मोक्ष मिळतो का ?

**सुमंगल :** नाही मिळाला तिला मोक्ष म्हणून काही बिघडत नाही. या दुसऱ्या स्वामींमुळं गौरी पुन्हा माणसात आली, चारचौघींसारखी वागायला लागली, यात सगळं भरून पावलं.

**चिंतामणी :** आणि ते क्रिकेटपटू ?

**सुमंगल :** तो खोलीत दार लावून बसलाय. कॅप्टन झाल्याचा सगळा आनंद या मेल्या मॅचिसनी पार धुळीला मिळवला. सगळ्या मॅचेस हरला तरी निदान धावसंख्या तरी चांगली व्हायला काय हरकत होती ? एका इनिंगमध्येसुद्धा पाच सात धावांपुढं त्याला रन्स काढता आल्या नाहीत. त्याला कोणाची तरी दृष्टच लागली बघा.

**चिंतामणी :** दृष्टबिष्ट काही नाही. भगवानांशी हा मिजाशीनं वागला त्याची फळं भोगावी लागताहेत ही त्याला. खुद्द भगवान मला म्हणाले तसं. [ तेवढ्यात दारावरची घंटा वाजते. तुकाराम गुलाबाचा पुष्पहार घेऊन येतो, तशी–] बरा वेळेवर आलास तुकाराम. बघ– बघ सुमंगल, याला म्हणतात श्रद्धेचं फळ.

**सुमंगल :** काय रे हा उशीर ?

**तुकाराम :** काय करणार बाई ? अख्ख्या फुलाऱ्यांच्या दुकानांतले सगळे गुलाब विमानतळाकडे पसार केलेत पुढाऱ्यांनी. कॉंग्रेस झेडचे अध्यक्ष यायचे आहेत ना दिल्लीहून ? हातापाया पडून विनवणी केली तेव्हा एका फुलाऱ्यानं हा हार तेवढा दिला.

**चिंतामणी :** दिला ना ऽ? देणारच. ( तसबिरीला हार घालीत ) अरे साक्षात भगवानांनीच त्याला तसा आदेश दिला असणार. आता आलास तसा तीर्थ-प्रसाद घेऊन जा.

**तुकाराम :** नाही साहेब. ही पूजा आमच्या शिस्टीममध्ये बसत नाही. आमच्या

भिख्खूशिवाय दुसऱ्या कोणा स्वामीबाबांचा तीर्थप्रसाद आम्ही घेत नाही.

**चिंतामणी** : ठीक आहे. तुझी मर्जी. कोणत्याही देवाची पूजा केली तरी ती अखेर भगवानांनाच पोचते. तू गेलास तरी चालेल. [ तुकाराम जातो. ] फोन कुठाय ? टिट्टूच्या खोलीत ना ? अरे राम राम राम ! इतकी जबरदस्त आपटी खाल्ली, अगदी दुनियेभर छी थू झाली, तरी मैत्रिणींच्याकडून गुलगुलू कौतुक करून घेण्याचा सोस काही संपत नाही या पोराचा.

**सुमंगल** : अहो कौतुक कुठलं आलंय ? आता घालून पाडून शिव्या घालताहेत सगळया टवळ्या त्याला. आता म्हणतात कशा, 'तुझा फॉर्मच गेलाय.... क्रिकेटमधून तू रिटायर हो...' एकजात फाजील मेल्या !

**चिंतामणी** : हूंऽऽऽ ! त्या वेळी मोठ्या झ्याकीत फुलं वेचली, आता बसा काटे काढीत. तीर्थप्रसाद घे. [ तिला तीर्थप्रसाद देतो. अंगारा लावतो. दोघेही तसबिरीला वंदन करतात. तेवढ्यात बाहेर जायच्या पोषाखात टिट्टू येतो. येताना फोन घेऊन येतो. ]

**टिट्टू** : पपा, हा फोन. ( मशिन जागेवर लावून ठेवीत ) मला कोणाचा फोन आला तर मम्मी, मी घरात नाहीये म्हणून सांग. मी कुठं गेलोय, केव्हा येणार आहे– काही माहीत नाहीये म्हणून सांग.

**सुमंगल** : अरे पण निघाला आहेस कुठं तू ?

**टिट्टू** : जरा नाक्यावर जाऊन पेपर्स घेऊन येतो मी.

**चिंतामणी** : कशाला आणून वाचतो आहेस ते पेपर्स ? मी सांगतो, गिधाडा-सारखे तुटून पडले असतील ते तुझ्यावर. हे पेपरवाले असेच असतात; त्यांना बाराव्वं आणि बारसं दोन्ही सारखंच.

**टिट्टू** : ते मी पुरेपूर जाणून आहे. पण त्यांची मजल कुठवर जातेय ते मला पाहायचंय.

**सुमंगल** : ते पाहून काय करणार आहेस तू ?

**टिट्टू** : मी खूप काही करायचं ठरवलंय. समजेल तुम्हाला योग्य वेळी.

**चिंतामणी** : उगीच डोक्यात राख घालू नकोस, भगवानांना मनोभावं शरण जा. ते तुझं कल्याण करतील. हा अंगारा लाव आणि तीर्थप्रसाद घे.

**टिट्टू** : माझं काही अकल्याण झालेलं नाही आणि होणार नाही. तुमच्या फुरसुंगीकर महाराजांचा मला अंगारा नको की तीर्थप्रसाद नको.

**चिंतामणी** : मर्जी तुझी. इन्सिडेन्टली भगवान प्रियाला अमेरिकेच्या दौऱ्यात बरोबर नेणार नाहीयेत हे कळलं ना तुला ?

**टिट्टू** : प्रियानंच मी येणार नाहीये म्हणून कळवलंय त्या स्वामीला. ती मुळी जाणारच नव्हती. केवळ मला चिडवण्यासाठी तिनं तुमच्या स्वामीची चक्क फिरकी घेतली आणि स्वामी बनला.

**चिंतामणी :** असं म्हणू नकोस. स्वामींचं सामर्थ्य काय आहे ते तुझ्या दुसऱ्या मैत्रिणीला, राजकन्या चंद्रावतीदेवीला विचार. भगवान तिलाच घेऊन जाताहेत स्टेटसला.

**टिटू :** तेही शिवाजीनं सांगितलंय मला. तिनंच वडिलांच्या मार्फत मला पुढच्या मॅचेसच्या सीरीजमधून वगळून टाकण्याची खटपट चालवलीय, हे तुम्हांला ठाऊक आहे ?

**सुमंगल :** काय तरी बाई हा दुष्टपणा ! आणि असल्या पाताळयंत्री मुलीला तू आपली जिवाभावाची मैत्रीण समजत होतास ?

**टिटू :** ममी, सगळ्या मैत्रिणी अशाच असतात. लबाड, लुच्च्या, स्वार्थी. ( दार आपटून घेऊन आवेगानं जातो.)

**चिंतामणी :** हूं ऽऽ ! यासाठीच तुकोबाराय म्हणतात, " स्त्री ऐसी लाधवाची बेडी दुरी राखिता हेची बरे ऽऽऽ ! "

**सुमंगल :** हे सगळं म्हातारपणी समजलं एवढ्यानं बरं झालं.

**चिंतामणी :** असो-असो. आता भगवानांच्या पायाशी धरणं धरूनच या पोराची घसरलेली गाडी रुळावर आणली पाहिजे.

**सुमंगल :** टिटूच्या बाबतीत भगवान काय करणार आहेत ?

**चिंतामणी :** भगवान काय वाटेल तो चमत्कार करू शकतात. त्यांनी मला आपला खास अमृतसिद्ध प्रसाद दिल्यापासून माझ्या स्वभावात केवढा फरक पडलाय ते दिसत नाही का तुला ? प्रसादग्रहणानंतर किती हलकं, किती शान्त वाटतं.... आत्मानंदात मी तरंगत असतो. या तीन महिन्यांत माझ्यावरची किती किटाळं दूर केली भगवानांनी ! त्यांच्या सिद्धीमुळंच साडेसातशे अधिकाऱ्यांतून खाड्कन मला एकदम बढती मिळाली ! आणि—

**सुमंगल :** हे सगळं तुमचं तुम्ही मिळवलंत. त्यात भगवानांचा—

**चिंतामणी :** हा मीपणा बरा नव्हे, सुमंगल. भगवंतांच्या कृपेवाचून काहीही होऊ शकत नाही, याची प्रचीती आलीय मला. आपण त्यांच्या कसोटीला उतरलो तर भगवान ब्रह्मसाक्षात्कारसुद्धा घडवतील.

**सुमंगल :** कसोटीला उतरायचं म्हणजे भगवानांनी मागितलेले पैसे त्यांना द्यायचे, हेच ना ?

**चिंतामणी :** अग पैसे काही बक्षीस द्यायचे नाहीयेत त्यांना. भगवान अमेरिकेहून परत आले की—

**सुमंगल :** अहो पण म्हणून काय पंचवीस हजार रुपये ? एवढी रक्कम कोण देईल त्यांना ?

**चिंतामणी :** त्यात काय ? आमची बँक त्यांना कर्ज देईल !

**सुमंगल :** त्यासाठी तारण काय देणार आहेत तुमचे भगवान ?

**चिंतामणी :** माझी भक्ती. भगवान तारण काय देणार दुसरं ?
**सुमंगल :** पण तारणाशिवाय बँक कर्ज देईल का भगवानांना ?
**चिंतामणी :** हे बघ, कर्ज मी घेणार आहे. फक्त दोन अडीच महिन्यांचाच प्रश्न आहे. तुझे दागिने आपण बँकेकडं ठेवले तर—
**सुमंगल :** वाटलंच मला. ते काही चालायचं नाही हं. मी बजावून ठेवते, माझ्या दागिन्यांना हातसुद्धा लावू देणार नाही मी कोणाला.
**चिंतामणी :** ही तुमची भगवंतांच्यावर श्रद्धा. देव काय बोंबलेल तुमच्यापुढं ?
**सुमंगल :** अहो पण मी म्हणते—
**चिंतामणी :** काही म्हणू नकोस. कर्ज मी माझ्या प्रॉव्हिडंट फंडाच्या तारणावर काढतोय. दागिन्यांसाठी तुझा जीव एवढा घाबराघुबरा व्हायला नकोय. मी फक्त तुझा दिल बघितला.
**सुमंगल :** बघा बाई. मी सरळ व्यवहार सांगितला. त्यात माझा दिल कुठं हो दिसला तुम्हाला ?
**चिंतामणी :** तेच तेच.... जन्मभर तुम्ही पैसाअडका आणि दागदागिने यातच तडफडणार. अरे जरा मन मोठं करा.... मन मोठं कराऽऽ.... देवाला दाखवलेला नैवेद्य खायला प्रत्यक्ष देव येत नाही म्हणूनच ठीक आहे. एरवी तू नैवेद्याचं बिल करून देवाकडे धाडायला कमी करायची नाहीस.
[ तोच दारावर घंटा वाजते. चिंतामणराव दार उघडतात, तो दारात भडकलेला गोट्या उभा. त्याच्या मागं सदा येवलेकर, बिंदुमाधवराव आणि कमळजाबाई. ]
**गोट्या :** (दारातूनच खवळून) हरामखोर ! बदमाश ! चारसोवीस साले !
**चिंतामणी :** आ ? अरे अरेऽ.... कोणाला शिव्या घालतो आहेस तू ?
**बिंदुमाधव :** (त्याला आत ढकलत) शिव्या घालायला हरकत नाही पण बाहेर जिन्यात नको. आत येऊन हव्वा तो आरडाओरडा कर. (कमळजाबाईंना) चला हो आत या तुम्ही. [ कमळजाबाई आणि सदा येवलेकर आत येतात.
**सुमंगल :** पण झालं काय ? कोणाला शिव्या घालतोय हा ?
**सदा :** प्रोड्यूसर सोमू नाथवानी, फोटोग्राफर केसवानी, डायरेक्टर बद्रीकेदार.
**गोट्या :** तेवढेच नाही. तो एडिटर मीर कासीम, स्क्रिप्ट रायटर पंडित चंद्रभूषण, आणि हीरो मदनकुमार, सगळे– सगळे सिनेमावाले हलकट आहेत. पक्के डाकू आहेत ! गँगस्टर्स आहेत, उलट्या काळजाचे मांग आहेत मांग.
**चिंतामणी :** हां हांऽऽ.... ही शेवटची शिवी अंमळ जातिवाचक झाली. तिला बंदी आहे. त्याऐवजी त्यांना नराधम म्हण.
**सुमंगल :** पण केलं काय त्यांनी ? गोट्याचा सिनेमा चांगला होता ना बाबा ?
**बिंदुमाधव :** हां, सिनेमा बरा होता तसा...म्हणजे ढिशांव ढिशांव–वालाच, वीरश्रीयुक्त. पण त्यात गोट्या कुठंच नव्हता.

**सुमंगल** : अगबाई ! गोट्या कुठंच नव्हता ? म्हणजे ऽ ?

**कमळजा** : त्याचंही बरोबरच आहे ग सुनबाई. एवढं राबराब राबला, अभ्यास संभाळून शूटिंग केलं पोरानं—

**चिंतामणी** : तसं काही नाही, शूटिंग संभाळून अभ्यास केला म्हणा.

**सुमंगल** : पण केला ना ?

**सदा** : तेवढंच नाही ममी, शूटिंगच्या वेळी आमच्या कंपनीनं पडतील ती कामं केली. अगदी पान सिगारेट आणण्यापासून तो सोड्याच्या बाटल्या फोडण्यापर्यंत.

**कमळजा** : आज प्रीमिअरला गोट्याचे सगळे सीन्स कापून टाकले की ग मेल्यांनी.

**गोट्या** : म्हणजे ट्रायलच्या वेळा होते. नंतर त्या बेवड्याचं डोकं फिरलं !

**चिंतामणी** : कोण बेवडा ?

**गोट्या** : तो दीडदमडीचा हीरो मदनकुमार. त्यानं हट्ट धरला म्हणून या वैलोबांनी माझे सगळे सीन्स कापून टाकले. अगदी डान्सचा सीनसुद्धा ठेवला नाही.

**सदा** : हो हो, निदान तो डिस्को डान्सचा सीन तरी ठेवायलाच हवा होता. पपा, काय नाचलाय गोट्या त्या सीनमध्ये...एकदम टॉप. मदनकुमारचा तर पार पाला करून टाकला होता त्या एका दृश्यात.

**चिंतामणी** : डिस्को डान्स म्हणजे ?

**सुमंगल** : अहो गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीत गोट्या नाचताना पाहिला नव्हता का तुम्ही ?

**चिंतामणी** : तो तो... कंबर लचकवण्याचा नाच ? तो नाच सिनेमात घातला होता ?

**सदा** : आमची सगळी कंपनीच नाचली होती की त्या सीनमध्ये.

**चिंतामणी** : धन्य आहात. मग तो सीन कापून टाकला असला तर काही बिघडलं नाही त्यात.

**गोट्या** : तुम्ही असं म्हणणार हे ठाऊकच होतं मला. पण बाबा, तुम्ही तरी तो नाच पहायलाच हवा होता एकदा.

**बिंदुमाधव** : त्यात काय, आपण पुन्हा पाहू. इथं घरीच कार्यक्रम होऊन जाऊदे एकदा कधी तरी !

**सदा** : कधी तरी कशाला ? आत्ताच होऊन जाऊ दे. यार जरा झलक तो दिखाव. माउथ ऑर्गन आहेच माझ्यापाशी.

**गोट्या** : काय बाबा ?

**बिंदुमाधव** : हां हां, जरूर झलक दिखाव.

**गोट्या** : ( अनमान करीत ) पण पपा....

**चिंतामणी :** परांची कशाला काळजी करतोस ? प्राइम मिनिस्टरनी हिरवा कंदील दाखवल्यावर चीफ मिनिस्टरला कोण विचारतो ?

[ त्याबरोबर सदा माउथ ऑर्गन काढून तोंडाला लावतो आणि त्या संगीताच्या साथीत गोट्या नाच करू लागतो. बिंदुमाधवराव, कमळजाबाई, सुमंगल कौतुकानं रमतात. फक्त चिंतामणराव मात्र क्षणाक्षणाला कासावीस होतात. अखेर असह्य होऊन—] बास, बास पुरे. भरपूर झलक दिसली. उरलेला कार्यक्रम मी दूरवर गेल्यावर उरका.

**गोट्या :** खऱ्या गुणांची कदरच उरली नाही कोणाला.

**चिंतामणी :** तुझ्यात गुण नाहीत असं मी म्हणत नाही गोट्या, पण मला त्या डिस्कोफिस्कोत रस नाही.

**बिंदुमाधव :** अरे रस घेतला म्हणजे गोडी कळते, काही नाही गोट्या... झकास... मजा आणलीस तू.

**चिंतामणी :** मला तुमचं नवल वाटतं बाबा—

**बिंदुमाधव :** मला तुझं नवल वाटतं चिंतामणी, अरे परवा महाशिवरात्रीला आश्रमात भगवानांच्या बरोबरीनं 'हरे कृष्ण हरे राम' करीत तू नाचला होतास आणि आता आज—

**चिंतामणी** 'ती भक्तीची समाधी' होती बाबा.

**बिंदुमाधव :** तशी ही नृत्याची धुंदी आहे. अरे अंगात रग असलेल्या या पोरांनी नाचायचं नाही तर मग काय या वयात या आजीला घेऊन मी टणाटण उड्या मारायच्या ?

**कमळजा** : मारालसुद्धा. पुन्हा आजोबा तेवढे टाण, आणि पाठीचा मणका मोडून आजी कायमची आडवी !

**बिंदुमाधव :** मुद्दयाची गोष्ट एवढीच आहे गोट्याजीपंत, तुमच्या वाट्याला जो अनुभव आज आला त्यावरून धडा घ्यायचा. अरे प्रत्येकाला व्यवसायाच्या प्रारंभी हेच सोसावं लागतं. घास घास घासल्याशिवाय पात्याला धार येत नाही बाळा. बेटर लक् नेक्स्ट टाइम !

**गोट्या :** नेक्स्ट टाइमची भाषाच करू नका. या फील्मवाल्यांचं मी पुन्हा तोंड पाहणार नाही कधी.

**चिंतामणी** : तूर्त हा निर्णय काही वाईट नाही. बाजारशास्त्राचा एक नियम असा आहे गोट्या, आपला माल घेऊन तुम्ही लोकांच्या मागं धावलात की ते तुम्हाला असाच अंगठा दाखवणार. मालच आपण असा चोख बनवावा की लोकांनी त्यासाठी झुंबड केली पाहिजे.

**बिंदुमाधव :** शाब्बास ! हा खरा बँकर बोलला. तरी पण चिंतामणराव, तुम्ही

इतक्या थंड डोक्यानं पुत्राला प्रेमोपदेश करताहात म्हणजे एक चमत्कारच आहे.
**चिंतामणी :** ही भगवंतांची कृपा.
**बिंदुमाधव :** भगवंतांना मारो गोली. ही कोण्णाची कृपाबिपा नाही. ही तुझीच साधना आहे. आपले हट्ट सोडले की खरं शहाणपण उमलायला लागतं.
**चिंतामणी :** माझा हट्ट म्हणाल तर एकच होता बाबा. या मुलानं अभ्यास चोख करावा, मग त्याला हवं ते करू दे. या वर्षी गोट्यानं परीक्षेच्या आधी उत्तम अभ्यास केला, आता—
**सुमंगल :** इतक्यात कौतुक करू नका त्याचं. अजून परीक्षेचा निकाल लागाय-चाय त्याच्या.
**चिंतामणी :** त्याचा निकाल मला समजलाय. तेव्हा गोट्या तुला नाटकाची आवड असेल तर राज्य नाट्यस्पर्धेत—
**गोट्या :** आं ऽ? पपा तुम्हाला माझा निकाल कळलाय? [ ते स्मित करतात, तशी–] माझी टोटल किती झाली तेवढंच सांगा. पपा ऽ प्ली ऽ ज...
**चिंतामणी :** छे छे.... आता काही सांगणार नाही. कॉन्फिडेन्शियल आहे ते. पण तू राज्य नाट्यस्पर्धेवर सध्या लक्ष केंद्रित कर.
**गोट्या :** तरी पण परसेंटेज तरी सांगा...फक्त परसेंटेज... निदान—
**चिंतामणी :** नो. नेव्हर. सांगितलं तेवढं फार झालं. आणिक हे आता बाहेर जाऊन बोंबलू नको कुठं. नाही तर....
**गोट्या :** पण तुम्हाला निकाल एवढ्यात कसा कळला? कोणी सांगितला?
**बिंदुमाधव :** तेही टॉप सीक्रेट आहे. बवतोस काय असा? तुला प्रिलिमिनरी परीक्षेच्या वेळी भूगोलाचा पेपर कसा कळला? तसंच हे आहे.
**चिंतामणी :** नो नो. तसं काही नाही हं बाबा. माझ्या एका बँकेतल्या कस्टमरनं आपण होऊन फोन केला होता मला.
**बिंदुमाधव :** अरे व्हाय आर यू सो अपॉलोजॅटिक? आपल्या देशात कोणत्याही कचेरीत कुठंही, कधीही, काही गुप्त राहू शकतं का? झालं तर!
**चिंतामणी :** बाबा, मी बँकेत जाऊन लंच टाईमला येतो.
**कमळजा :** अहो इतिहासाचार्य, आज मुक्काम हालवायचाय आपल्याला. लक्षात आहे ना तुमच्या?
**चिंतामणी :** मुक्काम हालवायचा? इतक्यात?
**कमळजा :** इतक्यात म्हणजे? दोन महिन्यांसाठी आलो त्याचे चार महिने झाले. कालपासून राजारामाचे दोन वेळा आणि ठकूचे तीन वेळा पाल्यांहून फोन येऊन गेले.
**बिंदुमाधव :** ठीक आहे; जेवण करून जाऊ.
**गोट्या :** नाही नाही, बाबा; इतक्यात आम्ही नाही सोडणार तुम्हाला.

**बिंदुमाधव :** अरे बाबा, गेलो नाही आज तिकडं तर तुझे काका-काकू, ठकू आणि मंडळी पकड वॉरंट घेऊन येतील इथं.

**सुमंगल :** इश्श, म्हणून काय झालं ? एवढी दिवाळी करून जायचं.

**बिंदुमाधव :** सूनबाई आमची मागची दिवाळी इथंच झाली. तिकडंही माझीच मुलं नातवंडं आहेत.

**गोट्या :** तरीसुद्धा आज, आत्ता तर नाहीच जायचं.

**कमळजा :** दरवर्षीचा झगडा आहे हा. मिटवा तुमचा तुम्हीच.!

[ कमळजाबाई आत जातात. तेवढ्यात फोनची घंटा वाजते. चिंतामणराव फोन घेतात. दरम्यान—]

**बिंदुमाधव :** गोट्या, आमच्या जाण्याराहण्याची बात मामुली आहे. पण तुझ्या वडिलांना तुझा निकाल कळतो आणि तू तसाच ? अरे काही शिताफी दाखवशील की नाही ? कशाला दोस्ताना जमवलास एवढा ?

**गोट्या :** यार नानू, बाबा म्हणतात त्यात एक पॉइंट आहे. आव मेरे साथ.... अभी आता हू बाबा. [ गोट्या आणि नानू पसार होतात. इकडे फोनमध्ये ]—

**चिंतामणी :** हू... हू.... माझं लोनचं प्रपोजल सँक्शन होऊन आलं ना ?... हू.... त्या फॉर्मेलिटीज मी येऊन उरकतो खाली... तुम्ही शंभराच्या नोटांत रक्कम तयार ठेवा... ओ. के. (फोन खाली ठेवतो, तेवढ्यात)

**सुमंगल :** बाबा, बँकेतून पंचवीस हजार रुपये कर्ज काढताहेत हे.

**बिंदुमाधव :** आ ? कर्ज ? पंचवीस हजारांचं कर्ज कशासाठी ?

**सुमंगल :** भगवानांना देण्यासाठी हातउसने म्हणून.

**बिंदुमाधव :** हातउसने म्हणून पंचवीस हजार रुपये ? अरे तू काय रिझर्व बँकेचा गव्हर्नर-बिवर्नर झालास का काय ?

**चिंतामणी :** बाबांना कशाला गोवता त्यामध्ये ? सगळा व्यवहार मी माझ्या जिम्मेदारीवर करतो आहे.

**बिंदुमाधव :** ते ठीकच आहे. पण तुझ्या जिम्मेदारीत घरादाराचाही वाटा आहेच की थोडाफार. भगवानरावना कशासाठी हवीय एवढी मोठी रक्कम ?

**चिंतामणी :** भगवान अमेरिकेला जाताहेत. दोन-अडीच महिन्यांत परतल्यावर ते सगळी रक्कम मला परत देतील.

**बिंदुमाधव :** आणि त्यांनी नाही दिली तर ?

**चिंतामणी :** तसं होणार नाही. माझी श्रद्धा आहे त्यांच्यावर.

**बिंदुमाधव :** अवघ्या तीन महिन्यांत इतकी गाढ श्रद्धा बसली तुझी भगवानांच्यावर ?

**चिंतामणी :** महिन्यांचा काय सवाल आहे बाबा ? भगवान एक परम-साक्षात्कारी सिद्ध पुरुष आहेत याची प्रचीती मिळालीय मला.

**बिंदुमाधव :** मला तुझं आश्चर्य वाटतं चिंतोबा ! तू इतका सूज्ञ, बुद्धिमान, विचारी, धोरणी आणि कर्तबगार माणूस—असा काय चमत्कार घडला की तू एकाएकी इतका भोळाभाबडा, अंधश्रद्धाळू आणि दैववादी झालास ? अरे दोन संकटं अंगावर कोसळली आणि एखादी गोष्ट मनासारखी घडली की लागलीच तुझ्यासारख्यानं कोणत्याही भगवी कफनीवाल्यापुढं भुईसपाट व्हायचं ? अरे तुम्हा लोकांना काही कणा आहे की नाही ?

**चिंतामणी :** बाबा, तुमची मतं मला ठाऊक आहेत. या एका बाबतीत मला तुमच्याशी वाद घालायचा नाहीये.

**बिंदुमाधव :** मग प्रश्नच संपला. शहाणपणाला सीमा असते, पण मूर्खपणाचा तळच लागत नाही— म्हणतात ते काही खोटं नाही. [ चिंतामणराव मनगटी घड्याळात पाहात लगबगीनं आत जातात. तेवढ्यातच दारावरची घंटा वाजते. सुमंगल पुढं होऊन दार उघडते. बाहेरून हसऱ्या मुद्रेनं गौरी ' हाई ममी... हाई बाबा ' म्हणत आत येते. पाठोपाठ शिवाजीही येतो. गौरीच्या वेशभूषेत आता क्रांतिकारक बदल. आता आधुनिक तरुणीसारखी थाटामाटात आहे. त्यामुळं रूपही झळझळून दिसायला लागतं. ]

**सुमंगल :** ये ग माझी बाई. ( गौरीला जवळ घेऊन कुरवाळत ) त्या मेल्या भगवानांचं भूत मानगुटीवरून उठल्यापासून किती सुरेख दिसायला लागली माझी बाबी.

**बिंदुमाधव :** भूत तिच्या मानगुटीवरून उठलं पण आता तुझ्या नवऱ्याच्या मानेवर बसलंय त्याची काय वाट ? तो आत्ताच निम्मा-शिम्मा बैरागी झालाय. आता भगवंतांनी डोक्यावरून पुरता हात फिरवला की कंप्लीट गोसावीच ! काय शिवाजीराजे, तुमच्या स्वामीमहाराजांची काही तरी दखल घ्यायला हवी.

**शिवाजी :** आमच्याकडून सगळी सिद्धता आहे बाबा, पण स्वामी कुठं तरी सापडायला हवा. सापडेल... कधी तरी कुठं तरी सापडेलच.

**बिंदुमाधव :** तसा तो सहजासहजी सापडायचा नाही. त्याला पकडायलाच हवा.

**शिवाजी :** तेही करता येईल. पण थोडा तरी पुरावा मिळायला हवा ना ? तसं स्वामी हे फार बडं प्रस्थ आहे बाबा.

**बिंदुमाधव :** बघू. तूर्त तुम्हा दोघांची अध्यात्मसाधना कोठपर्यंत आलीय ?

**शिवाजी :** बेताबेतानं चालू आहे.

**गौरी :** बाबा, आज शिवाजीला मी जे. कृष्णमूर्तींच्या व्याख्यानासाठी मुद्दाम घेऊन गेले होते. काय फॅंटास्टिक बोलतात हो कृष्णमूर्ती—

**सुमंगल :** हा कोण कृष्णमूर्ती काढला आहेस ग नवा ?

**गौरी :** अय्या ऽऽऽ, तुला जे. कृष्णमूर्ती ठाऊक नाहीत ? आन्तरराष्ट्रीय कीर्तीचे

केवढे गाढे विद्वान आणि विचारवंत आहेत ते. तू त्यांना एकदा ऐकायलाच हवंस ममी. काय त्यांचे एकेक स्फोटक विचार... एकदम अँटी एस्टॅब्लिशमेन्ट आणि रेव्होल्युशनरी. नाही रे शिवाजी ?

**शिवाजी** : तर काय ? भलतेच !

**गौरी** : "पाहाऽऽ....अनुभव घ्या.... विचार करा...चिंतन करा....कशातही इन्व्हॉल्व्ह होऊ नका. मेडिटेशन हीच सेल्फ रीयलायझेशनची गुरुकिल्ली आहे." जे. कृष्णमूर्तींनी हे सगळं इतकं सुंदर....इतकं सुंदर समजावून सांगितलं म्हणतेस मम्मी—

**सुमंगल** : अग पण भेटले कुठं तुला हे जे. कृष्णमूर्ती ?

**गौरी** : इश्य, म्हणजे काऽय ? बाबाच तर किती दिवसांपासून सांगत होते मला त्यांच्याबद्दल. कृष्णमूर्तींची पुस्तकं दिली त्यांनी आणि पहिल्या व्याख्यानाला-सुद्धा तेच घेऊन गेले होते मला.

**बिंदुमाधव** : आजचं लेक्चर कशावर दिलं ग कृष्णमूर्तींनी ?

**गौरी** : कशावर...कशावर म्हणजे...म्हणजे ( गडबडून ) असंच जनरल.... प्रेम म्हणजे काय...काय तेजःपुंज आहे माणूस म्हणून सांगू ममी... बोलतात-सुद्धा इतके गोड—

**बिंदुमाधव** : पण आजचं त्यांचं व्याख्यान फारच प्रभावी झालं असेल, नाही ? कारण 'प्रेम' हा त्यांचा खास आवडता विषय आहे.

**गौरी** : म्हणजे काय ? दोन-अडीच तास श्रोते अगदी मंत्रमुग्ध होऊन बसले होते. नाही का रे शिवाजी ?

**शिवाजी** : ऊं... ? हो ना.... मंत्रमुग्ध म्हणजे किती ऽ !

**गौरी** : काय त्यांची भाषा, काय त्यांचे एकेक दाखले, दृष्टान्त... आणि मध्येच विनोदाचा शिडकावा... आजच्यासारखं त्यांचं भाषणच मी ऐकलं नाही यापूर्वी. नाही का रे शिवाजी ?

**शिवाजी** : नक्कीच.

**बिंदुमाधव** : तरी पण, आजच्यासारखं त्यांचं भाषण तू ऐकलं नाहीस ही थोडी अतिशयोक्ती होतेय असं मला वाटतं.

**गौरी** : छे छे, मुळीच नाही बाबा. अगदी खरं खरं सांगतेय मी.

**बिंदुमाधव** : नाही, आजच्यासारखं कृष्णमूर्तींचं भाषण पूर्वी कधी झालं हे एका अर्थानं खरंच आहे. म्हणजे आज त्यांचं भाषणच झालं नाही.

**गौरी** : अय्या, म्हणजे काऽय ?

**बिंदुमाधव** : म्हणजे असं की, सर्दी खोकल्यानं जे कृष्णमूर्ती आजारी आहेत. म्हणून त्यांचे सगळे कार्यक्रम आज रद्द झालेत. सकाळच्या पेपरमध्येच अनौन्स-मेन्ट आलीय आजच्या.

**गौरी :** ( अंगावर धावून त्यांचे हात पकडून घुसळत ) बाबा ऽ ऽ ऽ तुम्ही इतके द्वाड आहात—

**बिंदुमाधव :** ( सोडवून घेत ) अगं पण हो... हो.... काही बिघडलं नाही फारसं. तुम्ही दोघांनी 'प्रेम' या विषयावर चर्चा केलीत ना— कृष्णमूर्तींना काय म्हणायचं याबद्दल ?

**शिवाजी :** तरी मी तुला सांगत होतो गौरी, की—

**गौरी :** तुझं पुरे झालं. काउच्या लेक्चरची कॅसेट ऐकायची आहे की नाही तुला ? चल. आधी आत चल. ( गडबडीनं ती शिवाजीला आत घेऊन जाते. तशी— )

**सुमंगल :** बाबा, ही गौरी आता कृष्णमूर्तींची शिष्या होऊन त्यांच्या पंथात शिरली म्हणजे आगीतून सुटून फुफाट्यात पडली, असं तर—

**बिंदुमाधव :** तसं काहीएक होणार नाही सूनबाई. कृष्णमूर्तींचा पंथ नाही आणि ते कोणाला शिष्य करून घेत नाहीत. मी काय केलंय ते तुला ठाऊक आहे का ? गौरीच्या पायात रुतलेला प्रेमानंदस्वामींचा काटा, कृष्णमूर्तींच्या साहाय्यानं हळूच काढला. आता ती आपल्या पायावर चालेल तशी चालू दे.

**सुमंगल :** आपल्या पायावर नव्हे, ती आता त्या शिवाजीच्या पावलावर पाऊल ठेवून चाललीय.

**बिंदुमाधव :** चालू दे. काही बिघडणार नाही. शिवाजीनंच तिला प्रेमानंद-स्वामींच्या जोखडातून सोडवलीय.

**सुमंगल :** पण हा शिवाजी कोण आहे, काय करतो ? नाही, तो टिटूचा मित्र आहे, क्रिकेट खेळतो हे माहीत आहे मला. पण—

**बिंदुमाधव :** तुला म्हणून सांगतो. बोलू नकोस इतक्यात कुठं, पण सी. आय. डी. मध्ये इन्स्पेक्टर आहे तो.

**सुमंगल :** ( थक्क होत ) अगबाई ! सी. आय. डी. इन्स्पेक्टर ? पण भगवानांचा शिष्य म्हणून —

**बिंदुमाधव :** फुरसुंगीकरमहाराजांच्या आश्रमात शिष्य म्हणून तो जो घुसला आहे तो काही मोक्ष मिळवण्यासाठी नाही. तुला काही तर्क करता येतो की नाही सूनबाई ?

**सुमंगल :** अहो पण म्हणजे —

**बिंदुमाधव :** ( नाकावर बोट ठेवीत ) शूऽऽक ! तुका म्हणे चुप्प राहावे ! जे जे होईल ते ते पाहावे. [ तेवढ्यात दारावरली घंटा वाजते. सुमंगल दार उघडते. प्रक्षुब्ध मुद्रेनं खूपशी वर्तमानपत्रं घेऊन टिटू येतो. त्याच्या बरोबरच प्रियाही येते. त्याच वेळी आतून बँकेत जाण्याच्या तयारीनं सुटाबुटात पोर्टफोलिओ घेऊन चिंतामणराव येतात आणि या दोघांना बघून थबकतात. ]

**प्रिया :** बरे भेटलात बाबा तुम्ही. आता तुम्हीच काही तरी सांगा या टिटूला.

**टिटू :** त्याआधी (टेबलावर वर्तमानपत्रांचा गठ्ठा आपटत). हे सगळे क्रीडा-समीक्षक काय काय म्हणतात ते वाचा, बाबा; आणि मग बोला, पपा, मी खाली बँकेत तुमची वाट पाहात थांबलो होतो. शेवटी कंटाळून वर आलो. (खिशातून एक पाकीट काढून देत) हा माझा नोकरीचा राजीनामा.

**चिंतामणी :** आं ऽऽ? नोकरीचा राजीनामा? म्हणजे?

**सुमंगल :** वेड लागलंय की काय तुला टिटू! नोकरीचा राजीनामा देऊन तू काय करणार आहेस पुढं? घरी का बसणार आहेस?

**चिंतामणी :** आणि क्रिकेटचं काय करणार आहेस तू?

**टिटू :** भारतीय क्रिकेट टेस्ट मॅचिसमधून निवृत्त होणार आहे मी.

**सुमंगल :** क्रिकेटचा खेळ सोडून देणार? छे छे, असं कसं करता येईल?

**टिटू :** मी 'भारतीय टेस्ट मॅचिसमधून' म्हटलंय. क्रिकेटचा खेळ हा माझ्या बाबतीत नुसता खेळ राहिला नाहीये. माझा प्राण आहे त्या खेळात.

**चिंतामणी :** तू जरा स्पष्ट बोललास तर नीट समजेल आम्हाला.

**प्रिया :** पपा, इंग्लंडमध्ये एका कौंटी क्लबनं कोच म्हणून टिटूला बोलावलं. तो तिकडं जायचं ठरवतोय.

**चिंतामणी :** कायमच्या वास्तव्यासाठी?

**टिटू :** हो. पॅकर मॅचिस योजना पुन्हा आकार धरतेय यू. के. मध्ये. तसं झालं तर मी पॅकरमधून खेळेन.

**चिंतामणी :** छाऽन! इकडं भारतात त्याची काय प्रतिक्रिया होईल याची कल्पना आहे तुला?

**टिटू :** त्या पेपर्सवरून ती कल्पना पुरेपूर आलीय मला. पण एकदा देशान्तर केल्यावर इकडं काय होणार आहे त्याची मला परवा करायचं काय कारण—?

**सुमंगल :** तुला आपली माणसं, आपले सगे-सोयरे यांच्यात रहावंसं नाही वाटत?– इतके आम्ही सगळे तुला नको झालोय का?

**टिटू :** ममी, खिशात पैसे असले तर लंडनहून मुंबई हा काही तासांचा प्रवास आहे. पण पैसेच नसले तर पुण्याहून मुंबईदेखील वर्ष-सहा महिने दूर आहे.

**चिंतामणी :** अरे तुला काही देशाभिमान, देशप्रेम आहे की नाही?

**टिटू :** त्या फारच जुन्या-पुराण्या कल्पना झाल्या. मी स्पेस एजमधला तरुण आहे. सगळीकडची माती मला सारखीच. मी फक्त माझा खेळ मानतो. आय बिलाँग टु माय गेम.

**चिंतामणी :** मग बोलणंच खुंटलं म्हणायचं. आता यावर काय बोलणार बाबा!

**बिंदुमाधव :** स्पष्ट सांगू? तुम्ही दोघेही बापलेक एका माळेचे मणी आहात.

दोघंही भ्याड आणि पहिल्या प्रतीचे पळपुटे.

**चिंतामणी :** बाबा—मी आध्यात्मिक मुक्तीचा प्रयत्न करतोय.

**बिंदुमाधव :** तसाच तो ऐहिक मुक्तीसाठी धडपडतोय. तुला जसं वाटतंय की नंदनवनात तुझ्यासाठी खास राजमहाल उभा राहणार, सेवेसी अप्सरा येणार, प्रवासाला गरुडाचं विमान मिळणार आणि सगळा आनंदकल्लोळ होणार! तसंच त्यालाही वाटतंय की यूरोप–अमेरिकेत त्याच्यासाठी गुलाबाच्या पायघड्या घातल्या आहेत.... जिकडे तिकडे त्याचा जयजयकार होणार आणि एकूण जन्मभर चंगळ चालणार. तुम्हाला आपली मुळं कुठं रुजली आहेत हे कोण सांगणार? वस्तुस्थिती पत्करावी लागते, अपयशं सोसावी लागतात, आणि संकटांशी धीटपणं मुकाबला करावा लागतो, हेसुद्धा छत्रपतींच्या भूमीत जन्मलेल्या मराठी माणसांना सांगायची वेळ आलीय का?

**टिटू :** पण बाबा—

**बिंदुमाधव :** हे बघ तू ऐकण्याच्या मनःस्थितीत असलास आणि तुला तेव्हा वेळ असला तर आपण बोलूया. पण मी आता बाहेरून आलोय. जरा हातपाय धुवून कपडे बदलून येतो मी. चालेल?

**टिटू :** ( दुखावत ) या शब्दांनी मला हिणवायलाच हवं का बाबा? बाकी ठीकच आहे. पराभूत क्रिकेटवीर हा पराभूत योद्धाच असतो. घरी आणि दारी फक्त अवहेलनाच त्याची वाट पाहात असते.

**बिंदुमाधव :** हे बघ, तू फार हळवा झाला आहेस म्हणून साधे साधे शब्दसुद्धा तुला नको त्या अर्थानं झोंबायला लागलेत. तक्रार खरं म्हणजे मी करायला हवी. दौऱ्याहून परत येऊन इतके दिवस झाले तुला. एकदासुद्धा आपल्या म्हाताऱ्या दोस्ताशी मन मोकळं करून बोलावंसं तुला वाटलं नाही. आता इथल्या आमच्या मुक्कामाचा हा शेवटचा दिवस. काही तासच म्हण. तेवढ्यात कुठं निघून गेलास—

**टिटू :** ( आवेशानं ) नाही नाही, बाबा. मी थांबतो इथं. पण तुम्ही मुक्काम हालवायचा नाही इतक्यात. मला तुमची फार गरज आहे. आय रियली नीड यू इन् धिस मोमेन्ट ऑफ क्रायसिस!

**बिंदुमाधव :** अरे अरे....तू तर कायमचं देशान्तर करायला निघालास. तिकडं तर यापेक्षाही जबरदस्त मोमेन्ट ऑफ क्रायसिस येतील. त्या वेळी कोठला आजोबा उभा करणार आहेस? ( हसतात. मग ) ठीक आहे. आपण थंड डोक्यानं सगळ्याच गोष्टींचा विचार करू. देशान्तर करण्याचं बोललास म्हणून एक गोष्ट सांगतो. तू देशान्तर केलंस आणि तुझा बाप हिमालयात पसार झाला तरी इथं काही कोणाचं अडणार नाही. तसं जगात कोणाचंही कोणावाचून अडत नाही. अरे– 'रामकृष्णही आले-गेले। त्याविण जग का ओसचि पडले?' आपल्यातले जे उत्तमोत्तम

आहे ते जगाला द्यावं– या सेवाभावातून संत, कलाकार आणि क्रीडापटू घडतात. ' जग केवळ आपल्याला पंचारती ओवाळण्यासाठीच आहे '– या मस्तीतून फक्त हुकूमशहा निर्माण होतात. पाण्याचा एकच थेंब... पण तो जलाशयात असतो, तेव्हाच सुरक्षित असतो. एरवी तो जमिनीवर पडला तर मातीत मुरून जाईल आणि खडकावर पडला तर सुकून जाईल. थिंक अबाउट इट्, माय बॉय. चला सुमंगलादेवी, आम्हाला फक्कडसा चहा द्या, या पोराला बर्फ घातलेलं थंडगार सरबत करून पाठवा, आणि चिंतोबासाठी भगवानांचं तीर्थ असलं तर पाठवा. (हसत जाऊ लागतात, तोच–)

**चिंतामणी :** (टिटूच्या खांद्यावर हात ठेवीत) अविचार करू नकोस; थोडा सज्ञपणानं वाग.

**बिंदुमाधव :** (वळून चिंतामणरावांच्या खांद्यावर हात ठेवीत) मी तुलाही तेच सांगतोय चिंतोबा— अविचार करू नकोस; थोडा सूज्ञपणानं वाग. एक सूचना करतोय. टेक इट ऑर लीव्ह इट. प्रेमानंदस्वामींना द्यायचे पैसे तू वर माझ्याकडं पाठवून दे. मी त्यांच्याशी प्रथम बोलतो आणि मग त्यांना पैसे देतो.

**चिंतामणी :** ठीक आहे, तसं होऊ द्या. ब्रीफ केसमध्ये पैसे घालून तुकारामाबरोबर वर पाठवतो मी.

[ दार उघडून जाण्यासाठी वळतात. तोच गोट्या आत येतो. अंमळ पडलेल्या मुद्रेनं, तशी– ] काय झालंय रे ?

**गोट्या :** काही नाही. [ चिंतामणराव जातात. मग दार बंद करीत ] बाबा, दोन टक्के मार्क कमी पडले मला.

**बिंदुमाधव :** पास व्हायला ?

**गोट्या :** नाही यार, फिफ्टी परसेंटची टोटल गाठायला !

**बिंदुमाधव :** आच्छा आच्छाऽऽ! म्हणजे तुझ्या-माझ्यातल्या कराराबद्दल बोलतो आहेस तर ! हूंऽऽ.... ( वाईट मुद्रा करतात. )

**गोट्या :** पण बाबा, पुढल्या परीक्षेत—

**बिंदुमाधव :** नट होणार म्हणतो आहेस नाही का तू पुढं ? चलो, आव मेरे साथ अंदर. एक कामगिरी सांगतो तुला. पार पाडलीस तर दोन टक्के मार्कांची कसर माफ तुला.

[ गोट्याला घेऊन बिंदुमाधवराव आत जातात. पाठोपाठ सुमंगलही जाते. दरम्यान टिटू एक पेपर उघडून वाचतो आहे. प्रिया त्याला न्याहाळते आहे. टिटू पेपर आपटतो आणि– ]

**टिटू :** ( वैतागानं ) सर्कशीतल्या कसरतपटूपेक्षा क्रिकेटपटूंना या देशात काडीमात्र जास्त किंमत उरली नाहीये. कसरत साधली की टाळ्या, फसली तर हुर्रेवडी !

**प्रिया :** लोकांनी अपयशावरसुद्धा फुलंच उधळायला हवीत का ?

**टिट्टू :** अरे फुलं नका उधळू, पण माणुसकी म्हणून थोडी तरी सहानुभूती दाखवाल ? परवा परवापर्यंत एकेका इनिंगमध्ये मी दोन दोन शतकं काढून, हरणारी मॅच खेचून विजयश्री मिळवून दिलीय, याचा लोकांना एवढ्यात विसर पडावा ?

**प्रिया :** जनरीती ही अशीच असते टिट्टू. पब्लिक मेमरी इज व्हेरी शॉर्ट. चार मॅचेस हरल्या आणि फारशा रन्स काढता आल्या नाहीत म्हणजे काही एकदम आकाश कोसळलं नाही तुझ्यावर. इतकी भडकाभडकी कशासाठी आणि कुणावर ? तू काय लोकांच्यासाठी क्रिकेट खेळायला सुरुवात केलीस ? लहानपणापासून तू क्रिकेट खेळतो आहेस. त्या वेळी तर घरातसुद्धा तुला कोणाचं प्रोत्साहन नव्हतं. तरी ध्यास घेऊन या खेळात तू रमला आहेस. कोणाचा राग तू कोणावर काढतो आहेस ?

**टिट्टू :** लोकांचं एक सोडून दे. पण माझ्या सगळ्या मैत्रिणींनी फोनवरून आणि समक्ष भेटून मला काय काय सुनावलंय त्याची तुला कल्पनाच येणार नाही.

**प्रिया :** त्याचं कारण, टिट्टू, तुला ' फॅन्स ' आणि ' फ्रेंण्डस् ' यातलं अंतरच कधी समजलं नाही.

**टिट्टू :** खरंय. आज ते समजतंय. हातपाय पुरेपूर पोळल्यावर.

**प्रिया :** ज्यांना तू मैत्रीण मानीत होतास, त्या तुझ्या मैत्रिणी नव्हत्या; तू मिळवलेल्या यशाच्या त्या मैत्रिणी होत्या. यशानं तुझ्याकडं पाठ फिरवल्याबरोबर त्यांनीही तुझ्याकडं पाठ फिरवली. टेक इट स्पोर्टिंगली अँड फर्गेट इट.

**टिट्टू :** ते इतकं सोपं आहे का प्रिया ? फार जबर किंमत द्यावी लागलीय मला त्यासाठी.

**प्रिया :** तू खरी कोणती जबर किंमत दिली आहेस, त्याची अजूनही तुला पुरती जाण आलेली नाहीये. एक काळ असा होता की क्रिकेटशिवाय अहोरात्र तुझ्या डोक्यात दुसरा विषय नव्हता. हळूहळू यशाच्या नशेबरोबर क्रिकेटची जागा तुझ्या नव्या नव्या मैत्रिणींनी घेतली. परिणाम काय झाला ? तुझी एकाग्रता ढळली. त्याबरोबर तू खेळातलं हुकमी यशही गमावलंस आणि मैत्रिणीही गमावल्यास. यात चूक कोणाची होती ?

**टिट्टू :** ( विचारमग्न होत ) येस येस.... आय अंडरस्टँड !

**प्रिया :** ( हसून, चटकन विषय बदलीत ) ते जाऊ दे. मी काय विचारतेय, आज आपण पिक्चरला जाऊ या का ? स्ट्रँडला पुन्हा ' रोमन हॉलिडे ' लागलाय.

**टिट्टू :** नको. तिथं पुन्हा कोणी तरी ओळखीचे भेटणार आणि मग ' हे असं कसं झालं ' चा चुकचुकाट सुरू होईल. आय ॲम सिंपली फेडअप् वुइथ इट्. मला कुठं तरी अनोळखी ठिकाणी चार दिवस जाऊन राहावंसं वाटतंय.

**प्रिया :** ठीक आहे. माझ्या थीसिसच्या कामासाठी मला वाईजवळ मेणवलीला नाना फडणिसांच्या वाड्यात जायचंय. माझ्याबरोबर येतोस तू ?

**टिटू :** आणि राहायचं कुठं ?

**प्रिया :** का ? आपण पाचगणीला हॉटेलमध्ये राहू.

**टिटू :** पाचगणीला हॉटेलमध्ये ? तू आणि मी ? छाऽऽन ! काय विचार काय आहे तुझा ? आधीच माझ्याबद्दल इतक्या स्कँडल्स पसरल्या आहेत, त्यात पुन्हा—

**प्रिया :** माझं नाव तुझ्याशी जोडलं जाईल, एवढंच ना ? मी त्याला स्कँडल समजत नाही. तुझ्याबद्दलच्या इतर स्कँडलबद्दलही मला पुरेपूर ठाऊक आहे.

**टिटू :** काय ठाऊक आहे तुला ?

**प्रिया :** खाणं थोडं आणि मचमच फार. नाही नाही, खाणं नाहीच, नुसतीच मचमच. त्यातलं काही एक खरं नाहीये.

**टिटू :** हे कशावरून ? काय पुरावा आहे तुझ्याजवळ ?

**प्रिया :** माझा तुझ्यावरला विश्वास, हा पुरावा पुरेसा नाहीये ?

**टिटू :** ( भारावून तिचे दोन्ही हात हाती घेत ) खरंच, तुझा माझ्यावर एवढा विश्वास आहे, प्रिया ?

**प्रिया :** किती वर्षांपासून मी तुझ्यावर प्रेम करते आहे, हे तू विसरलास का ?

**टिटू :** नाही नाही, मी काहीएक विसरलो नाही, पण—

**प्रिया :** माझ्या विश्वासाचं आणखी एक रहस्य सांगते तुला. भले दोन तीन डझन मैत्रिणी, तू माझ्या नाकावर टिच्चून मिरवीत होतास तरी मी थोडीसुद्धा अस्वस्थ झाले नव्हते. कारण मला खात्री होती की माझ्याशिवाय तू कोणावरही इतकं गाढ प्रेम कधी केलं नाहीस आणि कधी करू शकणार नाहीस !

**टिटू :** फँटास्टिक.

**प्रिया :** आणिक सांगते. स्त्री-पुरुषसंबंधाबद्दलची तुझी बेबंद मतं, हा एक तुझ्या पोकळ मैत्रिणींच्या प्रमाणंच नुसता मिरवायचा पोकळ डोलारा आहे; अपयशाचा एक फटकारा बसला की तो कोसळणार, हेही मला ठाऊक होतं.

**टिटू :** खरंच सांगतेस ?

**प्रिया :** म्हणून तर मी तुझ्या अपयशाची वाट बघत होते.

**टिटू :** काय बोलतेस काय तू प्रिया ? सिंपली फ्रँबरगास्टिंग ! तू... तू माझ्या अपयशाची वाट पाहात होतीस ?

**प्रिया :** तर काय ? त्याशिवाय तुला जाग कशी येणार ? आणि माझी किंमत तरी कशी कळणार ? मी काही तुझी फुलपाखरी मैत्रीण नाहीये,— अपयश आलं की भुर्रकन उडून जायला. मी इतकी वर्षं कशासाठी अविवाहित राहिलेय अशी कल्पना आहे तुझी ?

**टिट्र** : कशासाठी ?

**प्रिया** : यशाच्या उत्सवात तुझ्याबरोबर मिरवून घ्यायला नव्हे, अपयशात तुझ्या पाठीशी ठामपणं उभी राहण्यासाठी;— तुझी बायको म्हणून.

**टिट्र** : आय ॲम फ्लॅटर्ड प्रिया. हूऽ! मग आताऽ ?

**प्रिया** : आता काय ? मी तुला विचारतेय, आपण पाचगणीला बरोबर जाऊ या का ?

**टिट्र** : एवढंऽच ?

**प्रिया** : मग आणखी काय ?

**टिट्र** : किती खट्याळ, किती द्वाड, किती दुष्ट आहेस ग ? आपण लग्न कधी करायचं ते विचारणार नाहीस ?

**प्रिया** : ते मी नाही विचारणार. आपल्याकडं मुली फक्त स्थळ म्हणून सांगून जातात. लग्नाची मागणी नवरदेवांनीच घातली पाहिजे. (हसते.)

**टिट्र** : (हसत) महा-चॅनेल, वात्रट! अगदी अर्क आहेस तू ! [ दोघेही हातात हात घेऊन खळखळून हसू लागतात, तोच आतून टाळ्या वाजवीत "वेल डन् मुली, वेल डन्! या टिट्रला आज तू क्लीन बोल्ड घेतलास!" असं म्हणत बिंदुमाधवराव येतात. अगदी मघा होते तसे आणि त्याच वेशात. तशी– ]

**टिट्र** : हे हो काय बाबा ? तुम्ही कपडे बदलून येणार होतात ना ?

**बिंदुमाधव** : छे छे, कसं शक्य होतं ते ? जीव सगळा इकडं लागलेला. ही पोर एकूण सिच्युएशन कशी काय हाताळतेय ते दाराशी उभा राहून बघत ऐकत होतो. शी हॅज वंडरफुली डन् वेल. तू आता मुळी बोलूच नकोस. तुला काही केसच उरली नाही.

**प्रिया** : ( उत्साहानं ) पण बाबा, तुम्ही सांगितलेले एकूण एक मुद्दे बरोब्बर कव्हर केले ना मी ?

**बिंदुमाधव** : अगं अगं अगंऽऽ....हे कशाला बोललीस ?

**टिट्र** : ( थक्क होत ) "तुम्ही सांगितलेले एकूण एक मुद्दे ?" म्हणजेऽऽ ? ( टयूब लागत ) ...आंऽऽऽ ? बाबा तुम्हीऽऽऽ ? तुम्ही हिला—

**बिंदुमाधव** : छे छे छे, तसं काही नाही मित्रा. ईश्वरसाक्ष सांगतो टिटोबा, अरे मुद्दे तिचे, भावना तिच्या, शब्दही तिचेच. मी अंमळ फक्त डायरेक्शन केलं.... किंचित किंचित !

[ तेवढ्यात आतून गोट्या येतो, तशी– ] रेडी ?

**गोट्या** : एकदम तयार !

**बिंदुमाधव** : घोटाळा करू नकोस. आणि मी सांगितलेली वस्तू आणायला विसरू नकोस.

**गोट्या** : तुम्ही बघतच राहा यार, गोट्या ही काय चीज आहे ती.

[ दार उघडून गोट्या लगबगीनं जातो, तशी — ]

**टिटू** : हा लगबगीनं कुठं गेला ?

**प्रिया** : त्याला काय आणायला सांगितलंत बाबा ?

**बिंदुमाधव** : हार तुरे गुच्छ... तुमचा सत्कार करायला नको का ?

**प्रिया** : इश्य ऽऽ! काही तरीच काय हो तुमचं बाबा ?

**बिंदुमाधव** : ( हाकारत ) कमळजादेवी, सूनबाई, गौरी, पटापट बाहेर या.

[ तेवढ्यात घंटा वाजते. प्रिया दार उघडते. ब्रीफकेस घेऊन तुकाराम येतो आणि— ]

**तुकाराम** : साहेबांनी ही ब्रीफकेस आपल्याला द्यायला सांगितलीय. हेड ऑफिस-मधून तातडीनं बोलावणं आलं म्हणून साहेब थोरल्या साहेबांना भेटायला गेले आहेत. माझी वाट पाहू नका म्हणालेत.

**बिंदुमाधव** : ( ब्रीफकेस घेत ) ठीक आहे. तू एक काम कर झटपट.

[ खिशातून पाकीट काढून पैसे काढू लागतात. दरम्यान कमळजा, सुमंगला आणि गौरी येतात. ]

**कमळजा** : एवढ्या घाबऱ्या घाबऱ्या आम्हाला कशाला बोलावलंत ?

**बिंदुमाधव** : सांगतो. सूनबाई, ही ब्रीफकेस तुमच्या लॉकरमध्ये नीट बंदोबस्तानं ठेव. [ सुमंगल ब्रीफकेस घेते. ] तुकाराम, बाजारात जा आणि उत्तम पेढे ताबड-तोब घेऊन ये. जा पळ. [ तुकाराम पैसे घेऊन जातो. ]

**सुमंगल** : अहो पण पेढे कशासाठी ?

**बिंदुमाधव** : अरे आज केवढा मोठा महत्त्वाचा दिवस, आणि—

**कमळजा** : काही तरी गोडधोड हादडायची इच्छा झालेली दिसतेय.

**बिंदुमाधव** : अलबत ! शिरापुरी— दुसरी तिसरी बात नाही. केशर, वेलदोडे, बदाम, मुख्य म्हणजे साखर घातलेला उत्कृष्ट शिरा पाहिजेल. स्वीटेक्स वापराल तर खबरदार.

**सुमंगल** : एवढंच ना ? मी शिरापुरी करते आज.

**गौरी** : पण कशासाठी पेढे न् शिरापुरी ते सांगा की बाबा ?

**बिंदुमाधव** : काय सांगावं महाराज— आज शिवाजीराजांच्या लग्नाचा साखर-पुडा ! आहात कुठं ? विसरलात ?

**गौरी** : ( लाजून ) इश्य ऽऽऽ ! भलतीच कसली ही थट्टा बाबा ?

**बिंदुमाधव** : ए गौराई, अग तुला एवढं लाजायला काय झालं ? मी तुझ्या शिवाजीबद्दल बोललो नाही. बघा ऽऽ, माणसं आपण होऊन अशी एक्सपोज होतात. मी छत्रपती शिवाजीमहाराजांच्याबद्दल सांगत होतो. आज सत्तावीस एप्रिल. अवघ्या तीनशे त्रेचाळीस वर्षांपूर्वी, याच दिवशी शिवाजीराजांची, वयाच्या दहाव्या वर्षी, सईबाई निंबाळकर, वय वर्षे पाच, हिच्याशी एंगेजमेन्ट झाली.

पुढं सोळा मेला विवाह पार पडला. बघताय काय असे आ वासून. तुम्ही सगळे स्वतःला मराठ्यांच्या इतिहासाचे अभिमानी म्हणवता, आणि महाराजांच्या पहिल्यावहिल्या लग्नाच्या साखरपुड्याचा दिवस विसरता? थूः तुमच्या जिनगानीवर! यामुळंच महाराष्ट्राचं वाट्टोळं झालंय. तुम्ही लोक विसरलात तरी हा दिवस मी सिलेब्रेट केल्यावाचून राहणार नाही.

**कमळजा :** कळतात हो...तुमच्या सगळ्या युक्त्या ठाऊक आहेत मला. कसे वस्ताद आहेत ते बघून ठेव सूनबाई. अग हा काही आजचा प्रकार नाही. लहर लागली बाजारातून गोडधोड घेऊन यायचं आणि दारापासूनच ओरडायचं— "आज महाराजांनी अफजुलखानाला मारला- पेढे खा." आज काय, "महाराजांनी शाहीस्ताची बोटं छाटली—जिलेबी खा..." आज काय, "महाराज आग्र्याहून सुटले ते सुखरूप रायगडावर पोचले—श्रीखंड खा!" सगळा लुच्चेपणा मेला. काही गोडधोड करायचं नाही सूनबाई, सांगून ठेवते.

**बिंदुमाधव :** ठीक आहे. नका करू. टिट्टू, प्रिया, बघून ठेवा तुम्ही एवढं विचारपूर्वक निर्धारानं लग्न ठरवलंत, पण या आजीबाईला आहे का काही त्याचं कौतुक?

**सुमंगल :** ( आनंदानं ) अगबाई, खरंच सांगता की काय?

**गौरी :** ( धावून जाऊन हात धरीत ) होय ग प्रियाऽ... अभिनंदन, खूप खूप अभिनंदन. शिवाजीला सांगायलाच हवं. तो बसलाय वाय. कृष्णमूर्तींची कॅसेट ऐकत. शिवाजीऽ ( हाक मारीत आत पळते. )

**कमळजा :** हा मेल्यांनो, मग तसं सरळ सांगायला काय होतं हो? तोंडात साखर पडो तुमच्या.

**बिंदुमाधव** छे छे, काही तरीच काय? तुमच्या हातून साखर कसची पडतेय? स्वीटेक्सचे चार थेंब टाकाल तुम्ही माझ्या तोंडात.

**कमळजा :** बघ बघ कसे बोलताहेत ते. जशी काही मीच दुष्टपणानं यांच्या गोड खाण्याच्या मुळावर आलेय. आज सगळे गोड पदार्थ करून वाढ ग सूनबाई यांच्या पानात. वाढू दे ब्लड शुगर.

**बिंदुमाधव :** कमे, तू अगदी खरोखरीच मठ्ठ आहेस. अग आता ब्लडशुगर कितीही वाढली तरी काय मोठासा फरक पडणार आहे? बहात्तर वर्षांचं आयुष्य तर मजेत, सुखासमाधानात जगलो? आता चारदोन वर्षांसाठी मरणाला भिऊन घाबरून मी वागू म्हणतेस? तो आपल्या ठरवलेल्या वेळापत्रकाप्रमाणं येईल आणि मला घेऊन जाईल. मी त्याची चिंता करीत नाही. पण—

**कमळजा :** आणि तुमच्या माघारी माझं काय होईल याचा काही विचार?

**बिंदुमाधव** तो तू करायचास. केव्हा ते सांगू? रोज सकाळ संध्याकाळ, डॉक्टरांनी मनाई केली असताना भाताचा डोंगर पानात घेऊन बसतेस ना

जेवायला— ( हसू लागतात तशी— )

**कमळजा :** तुमच्याशी मुळी बोलण्यातच अर्थ नाही. (प्रियाला जवळ घेत) माझी गुणाची पोर... कशी गोड आहे.... शोभशील हो नातसून म्हणून मला.

**बिंदुमाधव :** तिथंही आपलं घोडं पुढं आहेच. म्हणजे लग्न कोणाचं, ते ठरवलं कोणी आणि त्यासाठी आपल्याच टिऱ्या कोण बडवून घेतंय बघा.

**कमळजा :** तुम्ही मध्ये बोलू नका. चल सूनबाई, चल प्रिया. शिरापुरी काही आकाशातून पडायची नाहीये. आता बरिक ठकूताईचा फोन आला तर काय सांगायचं ते तुमचं तुम्हीच बघा. [ कमळजा आणि सुमंगल प्रियाला घेऊन आत जातात. तेवढ्यात दारावरची घंटा वाजते. टिटू दार उघडतो तो ' सच्चिदा-नंद ! " उद्गारत प्रेमानंदस्वामी आत येतात. तशी— ]

**बिंदुमाधव :** या या भगवानभाई... बसा... बसा.... निचिंतीनं बसा.

**प्रेमानंद :** निचिंतीनं बसण्याइतकी सवड नाही आम्हाला सरनोबत. आम्ही एक विश्वशान्ती यज्ञ आरंभिला आहे. तिकडं मंडळी वाट पाहताहेत आमची.

[ तेवढ्यात आतून शिवाजी आणि गौरी येतात. ]

**शिवाजी :** काँग्रॅट्स टिटू, शेवटी प्रियानं तुला गुंडाळलं तर ?

**गौरी :** नाही तर तिच्याशिवाय ' असला धोका ' कोण पत्करणार ?

**टिटू :** बरं बरं... तुझा धोका कोण पत्करतोय ते बघतोच आहे मी.

**प्रेमानंद :** शिवाजी, अरे सकाळपासून पत्ता काय तुझा ?

**शिवाजी :** भगवान, आपण सांगितलेल्या कामगिरीवरच फिरतोय मी.

**प्रेमानंद :** किती रक्कम जमा झाली ?

**शिवाजी :** तशी आश्वासनं पुष्कळ मिळाली आहेत, पण रोख रक्कम—

**प्रेमानंद :** आग लागो त्या आश्वासनांना. ( गौरीला पाहात ) अरे अरे अरे ! काय हा शृंगारसाज, काय हे अधःपतन ! साधकावस्थेपर्यंत पोचली होतीस तू—

**बिंदुमाधव :** पण पाय घसरला आणि जिन्यावरून ती गडगडत गेली ती थेट पुन्हा बद्धावस्थेच्या चिखलात रुतून पडली. भगवान, तिचा नाद द्या आता तुम्ही सोडून. तिचा उभा जन्म लग्न, संसार, मुलंबाळं, दागदागिने आणि किंमती साड्या यातच वाया जाणार.

**प्रेमानंद :** असो, असो. इतिहासाचार्य, आम्ही कशासाठी आलो आहोत हे आपण जाणता.

**बिंदुमाधव :** तुमचं काम चिंतामणीनं करून ठेवलंय. एका तातडीच्या कामा-साठी तो हेड ऑफिसात गेलाय.

**प्रेमानंद :** जाताना फोनवरून सांगितलंयन् त्यांनी ते आम्हाला. तेवढी रक्कम आमच्या स्वाधीन करा आणि आम्हाला मोकळं करा.

**बिंदुमाधव :** रक्कम तयार आहे भगवानजी, फक्त आपण तारण द्यायला हवं

आणि एक जामीन. तेवढं झालं की—

**प्रेमानंद** : मला वाटतं काही तरी समजुतीचा घोटाळा होतोय. सरनोबतसाहेबांनी तुमच्याकडून फक्त रक्कम घेऊन जायला आम्हाला सांगितलेय.

**विंदुमाधव** : पण मला इन्स्ट्रक्शन्स वेगळ्या आहेत. तारण आणि जामीन मिळाल्याशिवाय एवढी मोठी रक्कम तुमच्या हाती कशी द्यायची ?

**प्रेमानंद** : का ? भगवानांच्या शब्दावर तुम्ही विश्वास ठेवीत नाही ?

**विंदुमाधव** : मी संपूर्ण निर्गुण निराकार भगवंतांच्यावर विश्वास ठेवतो. पण त्या भगवंतांना मुळी रुपयेच लागत नाहीत. तुम्ही अंशमात्र भगवान आहात. तेव्हा तुमच्यात आणि सामान्य माणसात, पैशाबाबत मला कसा फरक करता येईल ?

**प्रेमानंद** : (कळवळून) इतिहासाचार्य, मला रक्कम अगदी निकडीनं हवीय म्हणून मी तुम्हाला एवढी गळ घालतोय.

**विंदुमाधव** : शक्य आहे. पण भगवानजी, रक्कम बँकेची आहे, सरनोबतांची नाही. आणि बँकेनं भगवंत मंडळीसाठी काही स्पेशल सवलतीचे नियम केलेले नाहीत.

**प्रेमानंद** : इतिहासाचार्य, तुम्ही मला काय एक भामटा समजलात ?

**विंदुमाधव** : मी तुम्हाला विचारतो भगवान, तुम्ही काय मला एक बावळट समजलात ?

**प्रेमानंद** : करोडो रुपयांची माझी मालत्ता आहे.

**विंदुमाधव** : स्वतःला ' भगवान ' म्हणवता, त्या मानानं क्षुद्रच आहे. तरी-देखील पंचवीस हजारासाठी सरनोबतांना कशाला वेठीला धरताय ? तुमच्या आश्रमातलं कोणतंही झाड नुसतं हालवलं गदगदा तरी—

**प्रेमानंद** : पक्के वस्ताद आहात तुम्ही, इतिहासाचार्य. अगदी अर्क आहात !

**विंदुमाधव** : बरोबर ! म्हणूनच सुचवतो, भगवानराव, तुमच्यासारख्या खाप-शिडीचा जुगार खेळणाऱ्यानं बुद्धिबळं खेळणाऱ्याच्या वाटेला जाऊ नये.

[ तेवढ्यात फोनची घंटा वाजते. शिवाजी फोन घेतो. ]

**शिवाजी** : ( फोनमध्ये ) हॅलो ऽ.... हो सरनोबतांचं घर आहे हे.... मी शिवाजी. आपण ?... कोण शिवानंद... हो इथंच आहेत भगवान. का ?....

**प्रेमानंद** : ( घाबऱ्या घाबऱ्या धावून फोन हिसकावून घेत ) मीच बोलतोय... हूं....हूं....केव्हा ? कधी ?....हूं...हूं...हूं काय ? काय सापडलं ? हूं...हूं...इनफ इनफ....म म मी येतोच आहे तिकडं....ध्यानाच्या कुटीकडं कुणाला जाऊ देऊ नका....आणि पुन्हा कुठं फोन करू नका मला....[बोलता बोलता भगवानांची मुद्रा कमालीची तंग होते. हातपाय थरथरू लागतात. त्यांना घाम फुटतो. फोन कसाबसा खाली ठेवून ते लगबगीनं म्हणतात—] शिवाजी, तू इथंच थांब. माझ्याबरोबर कोण्णी येऊ नका....म म मला जायला हवं....

**शिवाजी** : तिकडं आश्रमात काही विशेष गडबड उडालीय का ?

**प्रेमानंद** : ( घाम पुसत ) गडबड ?...गडबड अशी काही नाहीये...छे छे, काहीच नाहीये...बराय, भेटूच आपण पुन्हा....

**बिंदुमाधव** : अहो भगवान, तुम्हाला एवढं घाबरायला काय झालं ? तुमच्या आश्रमावर पोलिसांची धाडबीड तर पडली नाही ना ?

**प्रेमानंद** : छे छे... कोणी सांगितलं ?.... तसं काही नाहीये...येतो मी. [ लागबगीनं जाऊ लागतात. तोच घंटा वाजते. तशी प्रेमानंद दचकून मागं सरतात. बिंदुमाधवराव दार उघडतात तो तुकाराम पेढ्याची पेटी घेऊन येतो. त्याला बाजूला सारून प्रेमानंदस्वामी बोल बोल म्हणता पसार होतात. ]

**शिवाजी** : अरे म्हणजे कमाल झाली. स्वामींची एवढी गाळण का उडाली ते पळाले कसे इथून ?

**टिट्टू** : पोलिसांनी खरंच धाड घातली नसेल आश्रमावर ?

**शिवाजी** : शक्यच नाही. माझ्या अगदी क्लियर इन्स्ट्रक्शन्स होत्या दौलतरावना की मी ग्रीन सिग्नल दाखवल्याखेरीज— [ तोच फोन वाजतो. शिवाजी झडप घालून उचलतो आणि — ] हॅलो.... हां बोला दौलतराव, मी शिवाजी... हा काय प्रकार आहे ? कोठून बोलताहात तुम्ही ?... आश्रमातून ? म्हणजे रेड टाकली तुम्ही ?....हूं....हूं.... हो, पण तुम्हाला फोन करून खबर दिली कुणी ? शिवानंद ?... हूं....हूं...हूं.... काय काय सापडलं ? हूं...हूं.... माय गॉड ! दीड मण अफू ?.... दॅट एक्स्प्लेन्स एव्हरीथिंग.... स्वामी इतका वेळ इथंच होते... पण त्याच शिवानंदानं फोन करून त्यांना अलर्ट केलं, तशी ते गडबडीनं पळाले... पण हा शिवानंद कोण ?.... ओके....ओके... मी येतोच तिकडं... स्वामींची काळजी करू नका. माझी माणसं आहेत त्यांच्या पाठीवर. ओके... ? ( फोन ठेवीत ) भगवानांचा खेळ खलास झाला गौरी. भगवान पुराव्यानिशी सापडला. पण हा दुसरा शिवानंद कोण ? [ कमळजा, प्रिया, सुमंगल येतात. ]

**बिंदुमाधव** : का ? शिवानंदानं काय केलं ?

**शिवाजी** : अहो त्यानं तिकडं पोलिसांना खबर दिली आणि धाड पडल्यावर इकडं स्वामींना फोनवरून दणका दिला.

**टिट्टू** : पण धाडीत काय काय सापडलं ?

**शिवाजी** : बरंच काही सापडलंय. मुख्य म्हणजे भरपूर अफू सापडली.

**प्रिया** : बाप रे ! अफूचं काय करायचा हा स्वामी ?

**टिट्टू** : अगं अफूपासूनच हिरॉइनच्या गोळ्या तयार करतात. पण याचा अर्थ शिवाजी, हा काही नुसता बुवाबाजीचा प्रकार नव्हता.

**शिवाजी** : एक्झॅक्टली ! प्रसादातून हा स्वामी खास शिष्यांना गोळ्या देतो आणि ते एकदा व्यसनी झाले की पैसे उकळतो, अशी मला शंका आलीच होती.

**सुमंगल :** अगबाई, म्हणजे यांना प्रसादातून तो मला तसल्या गोळ्या का चारत होता ?

**शिवाजी :** त्या आधी गौरीवर प्रयोग चालले होते. तिला एकदा दिलेला प्रसाद मी खाल्ला तेव्हाच माझी खात्री पटली. पण तसा तो स्वामी वस्ताद होता. पुन्हा त्याच्या प्रसादात मला काही आक्षेपार्ह मिळालं नाही. पण हा शिवानंद कोण ?
[ तेवढ्यात घंटा वाजते. प्रिया दार उघडते. तशी घाबऱ्या घाबऱ्या चिंतामणराव येतात आणि— ]

**चिंतामणी :** भगवान आले होते ?

**सुमंगल :** येऊन गेले की.

**चिंतामणी :** आणि रकमेचं काय केलंत ?

**बिंदुमाधव :** काय केलंत म्हणजे ? तुझ्या सांगण्याप्रमाणं जशीच्या तशी भगवानांना दिली !

**चिंतामणी :** ( किंचाळत ) दिली ऽ त ? ( कपाळावर हात मारून मटकन् बसत ) हरे राम ! बुडालो, पार निकाल लागला !

**बिंदुमाधव :** अरे पण झालं काय एवढं कपाळ बडवायला ?

**चिंतामण :** आता काय सांगणार तुम्हाला ? अहो बाबा तो भगवान म्हणजे एक पक्का बदमाश, लफंग्या आहे. त्याच्या आश्रमावर पोलिसांनी धाड टाकून बरंच काही पकडलंय म्हणे. केवढा गाढवपणा केला मी. पंचवीस हजाराला हातोहात फसलो.

**बिंदुमाधव :** अरे पण हे तुला सांगितलं कोणी ?

**चिंतामणी :** आमच्या पोचखानवाला साहेबांनी. त्यांना थोड्या वेळापूर्वी फोन आला होता.

**शिवाजी :** कोणाचा ?

**चिंतामणी :** कोणी शिवानंद म्हणून स्वामींचा शिष्य होता म्हणे एक.

**शिवाजी :** पुन्हा शिवानंद ?

**चिंतामणी :** पैशापरी पैसे गेले, आणि आता सगळीकडं छी थू होणार !

**कमळजा :** ( जवळ जात ) काही घाबरू नकोस चिंतू. यांनी काही त्या भामट्याला पैसे दिले नाहीत !

**चिंतामणी :** ( थक्क होत ) खरंच ? खरंच सांगतेस तू आई ?

**बिंदुमाधव :** तू म्हणजे अशी आहेस—

**कमळजा :** उगीच काय मेलं एखाद्याचा अंत बघायचा ? आधीच तो आजारी.

**चिंतामणी :** पण म्हणजे खरंच पैसे दिले नाहीत ना बाबा तुम्ही त्याला ?

**सुमंगल :** नाही, नाही, नाही ! सगळे पैसे आपल्या लॉकरमध्ये अगदी सुरक्षित आहेत.

**चिंतामणी :** ( सुटकेचा निःश्वास टाकीत बसत ) सुटलो ! देवानंच खैर केली !

**विंदुमाधव** : खैर देवानं नाही केली. खैर केली शिवानंदानं.

**चिंतामणी** : त्या स्वामीच्या आश्रमात दीड मण अफू सापडली म्हणे ! म्हणजे तो शिवानंदच साहेबांना सांगत होता.

**शिवाजी** : ऐका. अगदी आकडादेखील तोच. हा शिवानंद कोण, त्याचा तपास केलाच पाहिजे.

**चिंतामणी** : म्हणजे हा लफंग्या प्रसादातून मला अफू घालीत असला पाहिजे. प्रसाद ग्रहण केल्यावर मला कसं हलकं हलकं, अगदी हवेत तरंगल्यासारखं वाटायचं. छे छे छे, काय एका भयंकर स्वप्नातून जागा झालो मी. तुकाराम, त्या बदमाशाची ती तसबीर काढ.... आधी भिंतीवरून काढ, आणि दे बाहेर कचऱ्याच्या पेटीत फेकून !

**तुकाराम** : (उत्साहाने तसबीर काढता काढता) देतो फेकून साहेब. पण तेवढा गुलाबाचा हार काढून घेऊ का साहेब ? नाही म्हणजे, आमच्या युनियनतर्फे संध्याकाळी कॉंग्रेस झेड.च्या अध्यक्षांचा सत्कार आहे, त्या वेळी उपयोगाला येईल.

**चिंतामणी** : खुशाल घेऊन जा. पण आत्ता इथं जे पाहिलंस आणि ऐकलंस ते खाली बँकेत जाऊन बोंबलू नकोस.

**तुकाराम** : छा छाऽ भलतंच ? वेड का काय ? पाय घसरला तरी आपल्या माणसाच्या अब्रूवर पांघरूण घालायलाच हवं की !

**चिंतामणी** : (रागानं) तुक्याऽऽ [ तुकाराम पटकन जातो. ]

**शिवाजी** : (विचारात पडत) या शिवानंदानं थोड्या थोड्या अंतरानं प्रथम पोलिसांना, मग पोचखानवालासाहेबांना आणि शेवटी इथं नेमका फोन कसा केला ?

**विंदुमाधव** : यावरून मला शंका येतेय शिवाजी, की त्यांतला एक शिवानंद कोणी तरी घरातलाच लुच्च्या माणूस असला पाहिजे.

**शिवाजी** : आणि तो तुम्हाला माहीत असला पाहिजे.

[ तेवढ्यात घंटा वाजते. टिट्टू दार उघडतो. तशी गोट्या विजयोत्साहानं नवी कोरी बॅट घेऊन येतो. आल्या आल्या— ]

**गोट्या** : बोला बाबा, कामगिरी फत्ते ?

**शिवाजी** : थांबा बाबा. तुम्ही बोलू नका. गोट्या, शिवानंद या नावानं पोलिसांना आणि पोचखानवालासाहेबांना फोन कोणी केले ?

**गोट्या** : मीच केले की ! का ?

**चिंतामणी** : आपल्या स्वतःच्या बुद्धीनं ?

**गोट्या** : तुमची तरी कमालच आहे. इतकी तल्लख बुद्धी असती मला तर सिनेमात का आमची दांडी उडाली असती ? बाबांनी जसं जसं पढवलं त्या बरहुकूम नाटक केलं.

**शिवाजी** : बोला बाबा, आताऽऽ ?

**बिंदुमाधव** : आता काय ? अरे स्वामीच्या आश्रमावर धाड टाकायला तू पुराव्याची वाट बघत थांबलास. इकडं फास आमच्या गळ्याला लागायची वेळ आली होती. तेव्हा म्हटलं एक गुगली बॉल टाकून पाहू या. एका बॉलमध्ये स्वामीचा त्रिफळा उडाला, तुला शिकार सापडली, चिंतोबाचं घबाड सुरक्षित राहिलं. काही वाईट तर झालं नाही ना कोणाचं ? नाटक गोट्यानं झकास वठवलं. माझं फक्त डायरेक्शन !

**शिवाजी** : ( वाकून त्यांच्या पायाला हात लावीत ) ग्रेट आहात बाबा तुम्ही. चुकून तुम्ही इतिहास संशोधक झालात. खरं म्हणजे आमच्या इंटेलिजन्स ब्यूरोचे डायरेक्टरच व्हायचे तुम्ही !

**बिंदुमाधव** : छे छे, चुकलात राजे. इतिहास संशोधक म्हणजे गुप्तपोलिसच की. पुराव्यासाठी तुम्ही वर्तमान उकरता, आम्ही इतिहास खोदतो. पण आपण-तुपण एकाच जातीचे !

**गोट्या** : ही बॅट. टिट्टूला आवडगारी. ( बॅट देतो. ती घेत– )

**बिंदुमाधव** : चिंतामणराव, ( बॅट देत– ) ही बॅट आपल्या लाडक्या लेकाला आपल्या हातानं बक्षीस द्या. टिट्टूचं लग्न ठरलंय.

**चिंतामणी** : आं ऽ ? टिट्टूचं लग्न ? ठरलंसुद्धा ? कोगाशी ? शमा नझीर अली, मारी मास्करन्हेस की मीना धर्टिंगण ?

**बिंदुमाधव** : छी छी छी ! कसली नावं घेतो आहेस तू चिंतोबा ? अरे ते राक्षसपार्टी तू आता विसर. प्रिया, अगं या सासरोबाला पेढे देऊन नमस्कार कर.

**चिंतामणी** : प्रिया ! वा वा वा ! म्हणजे ते देशान्तर, क्रिकेट सोडून देणं वगैरे संपला ना ? उत्तम. [ प्रिया पेढे देऊन नमस्कार करते, तशी– ] उदंड आशीर्वाद आहेत मुली तुला. जन्मात या पोरानं माझ्या मनासारखी एवढी एकच गोष्ट केली. टिट्टू ही बॅट घे. पुन्हा क्रिकेटमधून निवृत्त व्हायची भाषा बोलायची, ती यशाच्या शिखरावर असताना. ( बॅट देतो. )

**टिट्टू** : थॅंक्यू पपा... थॅंक यू व्हेरि मच.

**चिंतामणी** : तुला सांगायची गंमत म्हणजे, क्रिकेटमध्ये मला अगदीच रस नाही असं समजू नकोस. माझ्या केबिनमध्ये टेबलाच्या एका खणात मी मिनी टी. व्ही. ठेवलाय. तुझा सगळा पराक्रम मी कौतुकानं बघितलाय त्या टीव्हीवर.

**टिट्टू** : काय म्हणता बाबा ? फॅंटॅस्टिक ! आज सगळं भरून पावलं.

**बिंदुमाधव** : कसं सोन्यासारखे शब्द बोललास चिंतोबा. वा रे वा. गड्या तुला नेमकं मर्म गवसलं. तरुण मुलांच्या आवडीत रस घ्यायला सुरुवात केली की पिढीपिढीतल्या सगळ्या भेगा कशा फटाफट बुजून जातात. पिकलास... आज तू खरा म्हातारा म्हणून पिकलास.... अगदी मुरांब्यासारखा मुरलास. एक रहस्य सांगतो तुला, म्हातारपणी हात नेहमी 'असा' ( उजव्या हाताचा पंजा

देण्याच्या पावित्र्यात दाखवीत ) असावा. कधीही ( पंजा पसरून ) कोणापुढंही असा पसरायचा नाही. घरात सून आली की सगळ्या किल्ल्या तिच्या अंगावर भिरकावून द्याव्या, आणि आपल्याच घरात आपण पाहुणं व्हावं. अरे, म्हातारपण म्हणजे दुसरं बालपण नाही. म्हातारपण म्हणजे दुसरं स्वच्छंद तरुणपण. मनसोक्त उनाडण्याचं खरंखुरं वय. टिटोबा, मॅन ऑफ द मॅच म्हणून तुला यापूर्वी खूप बक्षिसं मिळली असतील, आणि पुढंही मिळतील. पण आज तुझ्या बापाकडून मिळालेली ही बॅट म्हणजे एक अपूर्व देणगी आहे. पुढं कधीकाळी तुझी मुलं मोठी होतील तेव्हा या बॅटीची आठवण ठेव.

**टिटू** : थँक यू बाबा... हा दिवस मी कधीही विसरणार नाही.

[ खुशीत बॅट पाहू लागतो, तेवढ्यात फोन वाजतो. गौरी रिसीव्हर उचलीत–]

**गौरी** : ( फोन मध्ये ) हॅलो.... हां थांब हं. बाबा, ठकुताईचा फोन.

**कमळजा** : काय म्हणावं या ठमाईला ? आता काय सांगणार तिला ?

**बिंदुमाधव** : दुसरं काय सांगणार ? ( वेडेवाकडे गातात.)

रचिला ज्याचा पाया त्याची बरी उभारणी झाली.
काम संपता निघणे इथुनी भले योग्य या काळी.

[ असे म्हणत रिसीव्हर उचलतात; तशी–]

**प्रिया** : छे छे, इतक्यात कसं जाता येईल बाबा तुम्हाला ? माझा थीसिस पुरा व्हायचाय ना अजून.

**बिंदुमाधव** : ( रिसीव्हरवर हात ठेवीत ) थीसिसको मारो गोली ! चिंतोबाला नातू हवाय, या आजीबाईंना पणतू हवाय... सोन्याची फुलं कधी उधळली जातील याची म्हातारी वाट बघतेय कधीची आशेनं...

**कमळजा** : कोण मी–? बघा बाई....!

**प्रिया** : ( लाजून ) इश्य, काही तरीच काय बोलताय हो बाबा ? माझा प्रबंध...

**बिंदुमाधव** : तुझा प्रबंध... एक फँटास्टिक कल्पना सुचली बघ मला. तुला बछडा होईल तेव्हा त्याचं नावच आपण ' प्रबंध ' असं भारदस्त ठेवूया., तेव्हा प्रबंध पुरा करू नकोस. प्रबंधाला जन्म दे. [ सगळे हसतात. प्रिया लाजून आत पळते. पाठोपाठ टिटू जातो. दरम्यान रिसीव्हरमध्ये बोलू लागतात. दोन्हींकडचे संवाद ऐकू येतात ] ( घोगऱ्या आवाजात ) ठकूताई, मी कोण आहे ते ठाऊक आहे का ? मी अल्लादिनाच्या कंदिलातला राक्षस !

**ठकू** : नाहीच मुळी. उगीच घोगरा आवाज काढू नका. मला आहे माहीत. तुम्ही आजोबाच आहात.

**बिंदुमाधव** · नाहीऽऽ मी राक्षस आहे. बोल, तुला काय हवंय ?

**ठकू** : सांगू ? राक्षसा, तिथं आमचे आजोबा आणि आजी आहेत ना, त्यांना

एकदम उचलून आमच्या घरी आणून ठेव. आम्ही इथं त्यांची कित्ती कित्ती वाट बघतोय.

**बिंदुमाधव :** हूं ऽऽऽ! आजोबा म्हणतात जेवण झाल्यावर येतो.

**ठकू :** नाही नाही; हे हो काय ? जेवायला आमच्यात नाही का यायचं ?

**बिंदुमाधव :** आजोबा विचारताहेत, तुमच्यात आज काय काय केलंय ते सांग, मग ठरवतो.

**ठकू :** नाही नाही. आधी तुमच्यात काय केलंय ते सांगा.

**बिंदुमाधव :** आमच्यात शिरापुरी चाललीय.

**ठकू :** आमच्यात तर श्रीखंड पुरी आणि जिलबी चाललीय.

**बिंदुमाधव :** आमच्यात वाडगा भरून ताजं ताजं लोणी चाललंय.

**ठकू :** आमच्यात तर वाटीभर घट्ट साय, साखर घालून बरं का, तयार आहे अगदी.

**कमळजा :** ऐका ऐका, चिटुकल्या नातवंडांनीसुद्धा तुमची सगळी मोजमापं काढून ठेवलीत.

**ठकू :** तोंडाला पाणी सुटलं ना ? आणि आमच्यात एक जंमत पण आहे ती तुमच्यात कुठाय ?

**बिंदुमाधव :** कोणती ग जंमत ?

**ठकू :** ठकूताईचा गोड गोड पऽऽ...

**बिंदुमाधव :** आलो ऽऽऽ ठकूताई, धावत पळत येऊ का लंगडी घालीत येऊ ?

( सगळे हसत असतानाच पडदा )

अंक तिसरा संपला

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. 20805 नों. दि 7.21.8.58
वि. ना टक क्र. ..................

IRBK-0120405